
साप्ताहिक

# माणूस

१६ फेब्रुवारी ८५/२ रुपये

## शस्त्रविक्री-युध्द

हाच त्यांचा धंदा







# झुंज?

साप्ताहिक

# माणूस

¤

**वर्ष : चोविसावे**
**अंक : अडतिसावा**

¤

**१६ फेब्रुवारी १९८५**

**किंमत : दोन रुपये**

¤

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

¤

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**
**मेधा राजहंस**

¤

वार्षिक वर्गणी

**साठ रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**: पत्ता :**

**साप्ताहिक माणूस**
**१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०**
दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

राजू देशपांडे

# पुणे : 'सकाळ'चे मुणगेकर

शनिवारी संध्याकाळी पुण्यातील 'सकाळ' चे संपादक श्री. ग. मुणगेकर गेल्याचे कळले. ही बातमी फारच धक्कादायक वाटली. कोणाच्याही आकस्मिक निधनाची वार्ता ही नेहमीच धक्कादायक असते; परंतु जी व्यक्ती एखादे संस्थात्मक जीवन जगत असते तिच्या जाण्याचा धक्का मनामध्ये पोकळी निर्माण केल्याशिवाय रहात नाही. डॉ. ना. भि. परुळेकर यांच्यानंतर 'सकाळ' या दैनिकाची धुरा श्री. मुणगेकर यांनी फार यशस्वीपणे सांभाळली होती. ना. भि. परुळेकर यांच्या 'सकाळ' चा आत्मा कायम ठेवून मुणगेकर यांनी काहीही गाजावाजा न करता, अगदी शांतपणे 'सकाळ'चे रूप जपले होते.

पुण्याची जी काही ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि राजकीय व्यक्तिमत्त्वे आहेत, त्यामध्ये 'सकाळ' चे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. पुण्याच्या असंख्य नागरिकांच्या जीवनाचा 'सकाळ' हा एक अविभाज्य भागच झालेला आहे. परुळेकरांनंतर मुणगेकरांनी या प्रतिमेची फार जबाबदारीने जपणूक केली. इतकेच नव्हे तर परुळेकरांच्या काळात 'सकाळ' चे जे बाह्य रूप होते, ते तेवढेसे सुंदर नव्हते किंवा आकर्षकही नव्हते. वर्तमानपत्राचा टाईप, त्याचा ले-आउट, बातम्यांचे मथळे, त्यांचे औचित्य लक्षात घेऊन त्यांची केलेली मांडणी, शुद्धलेखनाबद्दलची जागरूकता इत्यादी महत्त्वाच्या गोष्टींकडे पूर्वी जे दुर्लक्ष केले जात होते, त्याकडे मुणगेकर यांनी अत्यंत जागरूकपणे लक्ष दिलेले होते. 'सकाळ' चे बाह्य सौंदर्य मुणगेकर यांनी निश्चितच वाढविले होते हे कबूल करावे लागेल.

मुणगेकरांचा स्वभाव शांत होता आणि त्यांची वृत्ती अबोल होती. तसेच ते अनाग्रही होते. आता वर वर पाहिले तर वर्तमानपत्राच्या जगात हे गुण न ठरता दोषच ठरावेत. साधारणत: स्वातंत्र्यापूर्वीची आणि नंतरचीही पत्रकारिता पाहिली तरी आवेश आणि खळबळ याच वैशिष्ट्यांनी आजची पत्रकारिता उदयास आलेली आहे असे दिसते.

मुणगेकरांच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये या दोन्ही वैशिष्ट्यांचा अभाव होता. तरीही जनमानसावर 'सकाळ' ची पकड घट्ट आहे. याचे कारण काय असावे? मला वाटते कोणत्याही एका पक्षाचा, विचाराचा, तत्त्वांचा झेंडा घेतल्यानंतरच आग्रह, अतिरेक संभवतो. परुळेकरांप्रमाणेच मुणगेकर हे कोणत्याही पक्षाचे, एका विशिष्ट तात्त्विक विचाराचे किंवा पंथाचे नव्हते. म्हणून त्यांनी 'सकाळ' चे स्वरूप एखाद्या मतपत्राचे न ठेवता नेहमीच वृत्तपत्राचे ठेवले आणि म्हणूनच 'सकाळ' ची आजवर वैचारिक कोंडी कधीही झालेली नाही. याला अपवाद फक्त एकच आणि तोही परुळेकरांच्या काळातला. आणि तो म्हणजे 'संयुक्त महाराष्ट्राच्या' चळवळीचा.

मुणगेकरांनी अग्रलेखांमधून आपले विचार मांडले; परंतु त्या विचारांचा तोल त्यांनी कधी ढळू दिला नाही. उठसूठ राजकीय पक्षांवर किंवा राष्ट्रीय महत्त्वाच्या व्यक्तींवर कधीही टीका केली नाही आणि असे करीत असतानादेखील, तात्त्विक भूमिकेवरून वाद घालण्यास त्यांनी कधी मागेपुढे पाहिले नाही. आणि हे वाददेखील त्यांनी वैयक्तिक कडवटपणापासून नेहमीच दूर ठेवले.

मुणगेकर संपादक कसे होते या संदर्भातील एक प्रसंग आठवतो तो असा. पुण्यामध्ये मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी प्रा. गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे आणि प्रभाकर पाध्ये हे तीन उमेदवार निवडणूक लढवीत होते. त्यांच्या प्रचारसभा चालूच होत्या. तिघेही तुल्यबल साहित्यिक तर होतेच, शिवाय त्यांची साहित्यजगतातील, जनमानसावरदेखील जबरदस्त पकड होती. तरी पण निवडणूक म्हणजे प्रचार आलाच आणि सर्व प्रकारची प्रचारमाध्यमे हाताळणेही आलेच. त्या संदर्भात पुण्याच्या वर्तमानपत्रात प्रा. गाडगीळ यांची साहित्यविषयक प्रतिमा

जनमानसासमोर शब्दरूपाने यावी असे त्यांच्या चाहत्यांना वाटत होते. म्हणून गाडगीळ यांच्यावरील एक लेख घेऊन त्यांच्या चाहत्यांपैकी एक 'सकाळ' कचेरीत गेले आणि श्री. मुणगेकर यांना भेटून त्यांनी निवडणुकीची सर्व माहिती सांगितली. ती त्यांनी अगदी शांतपणे ऐकून घेतली आणि त्यानंतर त्यांची चर्या बराच वेळ विचारमग्न दिसली. अखेर चेहऱ्यावर साहित्यिक हसू आणीत ते अगदी हळुवारपणे म्हणाले,

'ते तिन्ही साहित्यिक त्यांच्या त्यांच्या प्रांतातील महनीय व्यक्ती आहेत. जनमानसाशी तसेच सकाळशीही त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. मी व्यक्तिशः तर त्या तिघांनाही फार मानतो; परंतु निवडणुकीच्या संदर्भात जेव्हा त्यांच्याविषयी मनात विचार येतो, तेव्हा सकाळने, या तिघांमध्येही कसलीही तुलना होऊ नये अशा प्रकारची भूमिका घ्यावी असे मला वाटते आणि या माझ्या विचारांशी सर्वजण व सकाळचे वाचक सहमत होतील असे मला वाटते...'

नंतर थोडा वेळ थांबून ते म्हणाले,

'तेव्हा एकट्या गाडगीळांविषयीच आणि त्यांच्या निवडणुकीच्या संदर्भात लेख सकाळमध्ये येऊ नये असे मला वाटते. राहिलेल्या दोघांचेही लेख सकाळकडे आले तर ते तिन्हीही छापण्यात मला आनंद वाटेल!'

यावरूनही ते वृत्तपत्र व्यवसायाकडे कोणत्या दृष्टीने पहात होते यावर चांगलाच प्रकाश पडतो.

आज पुण्याची जी काही थोडीफार वैशिष्ट्ये शिल्लक राहिलेली आहेत त्या वैशिष्ट्यांपैकी 'सकाळ' हे एक आहे. त्या 'सकाळ' ची धुरा, त्याचे वैशिष्ट्य कायम ठेवून, त्यांनी बारा वर्षे सांभाळली याबद्दल पुण्यातील आणि पुण्याबाहेरील सकाळचा असंख्य वाचकवर्ग सदैव त्यांचा ऋणीच राहील.

—वि. शं. पारगावकर

विशेष वार्तापत्र : दिल्ली

# तिकिटवाटप-जत्रा आणि नंतर

फेब्रुवारीच्या आरंभी दिल्लीत संध्याकाळी झारदार थंडी पडते. लांबच-लांब गेलेल्या रस्त्यावरून धुकं साकळलेलं, त्यात संधीप्रकाश मिसळलेला. अशा वेळी मूडमध्ये येऊन तबियतीत पायजमा, कुर्ता, त्यावर जाकिट व शाल पांघरून टहलण्यासाठी बाहेर पडावं— तो बाजूने पाचसहाजण थेट असाच पोषाख करून खुसुरपुसुर करत झपाझप निघालेले असतात. एकजण माझ्याकडे पाहतो न् जोरात विचारतो,

'कैसा है भाई, टिकटबिकट का चक्कर?'

हबकलोच. या सर्वांनी अगदी राजीव गांधींसारखा शालदार पोषाख केलेला. सगळे युवक! एखाद दुसरा बुजुर्ग बिचारा बिचकतोय. त्या आठवड्यात पूर्ण दिल्लीत या राजीव छापांनी वर्दळ माजविली होती. उत्तरप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश, महाराष्ट्र राज्यांची भवनं, तीन मूर्ती रोड, साऊथ, नॉर्थ अव्हेन्यू, ईस्टर्न–वेस्टर्न कोर्ट, संसदमार्ग, मीना बाग, कॉन्स्टिट्यूशन क्लब अशा नाही नाही त्या ठिकाणी या टोळ्या वावरत होत्या. यू. पी. भवनमध्ये तर पाय ठेवायला जागा नव्हती. अगदी ग्रामपंचायत सदस्यापासून जि. कॉं. क.च्या पदाधिकाऱ्यांपर्यंत तालुक्या-तालुक्यातील मंडळी आपल्या लटांबरांसकट इथे उतरली. चाणक्यपुरीतल्या यूथ होस्टेलमध्येसुद्धा ही मंडळी घुसली. माझ्याचशेजारी कर्नाटकच्या धारवाडचा, बिहारमधील पटना, दरभंगा, आरा, आंध्रातील असे अनेक 'उमेदवार' होते. ही मंडळी रोज आपल्या आपल्या भवनात, पार्लमेंटरी बोर्डच्या मीटिंगला चक्कर मारत. रात्री परत येत. हालहवाल काय आहे असं विचारावं तर 'आज थोडा काम हुआ', 'अमुक–तमुक भेटला', 'थोडी फार प्रगती', 'मिळण्याची सुचिन्हं' असे संकेत मिळायचे. उत्तरप्रदेशातील इच्छुकांनी तर वातच आणला. तिथले कॉंग्रेसच्या तिकिट विक्रीचे प्रमुख विश्वनाथप्रताप सिंग यांचा अक्षरशः पिच्छाच पुरविला गेला. बिचारे सिंगसाहेब श्रमपरिहाससाठी गुपचुप एका पार्कमध्ये गेले तर तिथेही ही मंडळी हजर. कर्नाटकातून सुमारे दहा हजारजण या मोहिमेवर होते. यूपीतून, महाराष्ट्रातून त्या त्या प्रमाणात. सामान्यतः प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी पाच–सहा इच्छुक, प्रत्येकाबरोबर किमान पाच माणसं असा हिशेब होता.

महाराष्ट्रातील माणसं कमी नव्हती. महाराष्ट्र सदन, महाराष्ट्र भवन, खासदार–मंत्र्यांची घरं तर ठेचून भरलेली. शिवाय इंद्रप्रस्थ, जनपथ अशा पंचरंगी हॉटेलपासून पहाडगंजमधली हॉटेलेही भरगच्च होती. ही मंडळी रात्री तीनपर्यंत जागत. पहाटे तयार होऊन परत कामगिरीवर. 'दादा जोर लावतात', 'गाडगीळांनी नेट धरला', 'साठेंचं-चव्हाणांचं वाजलं' अशा हलक्या आवाजातील परवलीच्या शब्दातून माहितीची देवाण घेवाण करीत. 'तीस तारखेला रात्रीच लीस्ट फायनलाइज' झाली असं रायभान जाधव सांगतात, तर तीन तारखेची यादी चारला परत 'रिओपन' करणार असल्याची वार्ता मिळते. आदल्या रात्री खुशीत असलेले पुण्याच्या कॉंग्रेस (आय) चे मोहन जोशी दुसऱ्या दिवशी तुटक बोलतात. शिवाजीनगर-कसब्याच्या जागांबद्दल बोर्डाच्या मीटिंगमध्ये वाद चालू आहे असं कळताच आता गप्पा मारत असलेले प्रकाश ढेरे हळूच बेपत्ता होतात. नागपूरच्या हिंगणघाटकडचे राजेंद्र चंदेल नावाचे शिक्षक तर आपली कर्मकहाणी दिसेल त्याला सांगायचे. (त्यामुळे आमचा ढाबावाला मलाही 'टिकटवाला' समजू लागला. 'भई, असेंबली का नहीं तो, बस–ट्रेनका टिकट तो मिलही जायेगा' अशी समजूत काढायचा.)

व्ही. पी. हाऊसवर पंढरपूर जिल्ह्यातल्या एक उमेदावर श्रीमती आवुटे या चिंतित होऊन गुरुमहाराजांचे पाय धरीत होत्या. भोकरदनचे विलास थोरात, जालन्याचे ज्ञानेश्वर भांदरगे यांना आपण युवक असल्याने तिकिट मिळेल अशी आशा. या तिघां-

नाही यश मिळाले. मात्र तत्पूर्वी हे इतके बेचैन होते. गुरुदास कामतनं प्रत्येक जिल्ह्यातून एक युवक कॉंग्रेसवाला पाहिजे हा हेका धरल्याचा भरवसा त्यांना वाटत होता. त्याचबरोबर शंकरराव, साठे, बाळासाहेब पवार, तिरपुडे, सर्वात जास्त गुलाम नबी आझाद हे गॉडफादरही हवे होते. 'पक्षाचं काम केलं.!मरेस्तोवर प्रचार केला, ते नुसते गुलाम म्हणून का ? ' असा संतप्त सवाल ही मंडळी विचारायची.

तिकिट मिळालं नाही तर बंडखोरी वगैरे करण्याची भाषा मात्र हे इच्छुक बोलत नव्हते. कारण मग निदान कॉर्पोरेशन, म्युनिसिपाल्टी तरी सुरक्षित असावी हा त्यांचा विचार. उमेदवार निवडताना कॉंप्युटरचा वापर, स्क्रीनिंग, असल्या गोष्टींवर या नव्या इच्छुकांचाही विश्वास नव्हता. आपापल्या धर्मपित्यावर प्रत्येकाची श्रद्धा होती.

हे चालू असाना ' सिटिंग मेंबर्स 'ची पार धावपळ उडाली. राज्यातले कोणीच आपले वाली नाही हे पाहून ते मग हरकिशनलाल भगत, तारिक अन्वर आदींच्या मागे लागले. अब्दुल अझीम, पांडुरंगराव डिगरे,यशवंतराव मोहिते यांची निराशा जाणवतच होती. यशवंतराव मोहित्यांना लोकसभेचं किंवा विधानसभेचं तिकिट मिळालं नाही. त्यामुळे ते आता संन्यासाची भाषा बोलत होते. ' माणसानं जेवढं मिळवायचं तेवढं मिळवलं की थांबावं,'... ' आता जाताना कुणावर दुगाण्या झाडू नये.' ' I don't want to serve those who do not want my service.'– अशा त्यागाने ते बोलत होते.

### निवडणुकीतील गैरप्रकार

एकदा याद्या जाहीर झाल्यावर तर पुन्हा प्रचंड धावपळ. आठ तारखेच्या रात्रीपर्यंत बैठका, अर्जविनंत्या चालू होत्या. अरुणसिंग, अरुण नेहरू, जी. के. मूपनार, शंकरराव चव्हाण इत्यादींना ' अपील ' चालू होती.

एवंच या सेनेनं दोन आठवडे दिल्लीला व्यापलं होतं. त्यांना कुठं कुठं जायचं हे रिक्षेवाल्यांनाही ठाऊक झालं. सारी दिल्ली त्यांना ओठ मिटून फिदीफिदी हसत होती. (आम्हीमुद्धा ' तो ' ड्रेस बदलून जीन घातली. शॉल तर कटाक्षानं टाळली. खूप हाल झाले; पण ' संभावितस्य चा कीर्तिर्मरणाद '...)

एकीकडे हे घडत असताना भारतीय जनता, जनता व कॉंग्रेस ( एस् ) च्या कार्यालयात सामसूम होती. यांची नेतेमंडळी तर सोडाच. टेलिफोनवरची वा सेवकमंडळीही गायब. एखाद्या उद्ध्वस्त अवशेषांसारखी यांची अवस्था व्हायची. सहा वाजतात न वाजतात तोच कार्यालयांना कुलूप. अपवाद फक्त चरणसिंगांच्या दलित मजदूर किसान पार्टीचा. कॉंग्रेस कार्यालयाच्या निम्म्याने त्यांच्या अशोकरोडच्या कार्यालयात गर्दी असायची. पक्षाचे हिरवे झेंडे, पोस्टर्स यांचं वाटप चालू होतं. त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वासही भरपूर जाणवत होता. या वेळी कॉंग्रेस (आय) नं प्रचंड प्रमाणात ' बूथ कॅपचरिंग ' केलं, ' जाली वोटस ' टाकले अशी त्यांची तक्रार. (या प्रकारांना आळा घालण्यासाठी बिहारात दमकिपच्या कार्यकर्त्यांनी विनापरवाना बंदुका, दारूगोळा जमा करावा असं आवाहन कर्पुरी ठाकुरांनी पंधरा दिवसांपूर्वी केलं होतं.)

लोकसभेच्या वेळी मतदान केंद्रे ताब्यात घेणे, खोटे मतदान यासारख्या तक्रारी विरोधी पक्ष करतात. त्यात तथ्य आहे. एका अनुभवी व जबाबदार पत्रकाराने माहिती दिली. 'की कॉंग्रेसला लोकसभेत ४०० च्यावर जागा मिळणार असं राजीव गांधी छातीठोकपणं कसं सांगायचे ? वस्तुतः कॉं. (आय) ला अतिशय प्रतिकूल असलेल्या सुमारे १७२ मतदारसंघातील निकाल आपल्या बाजूला वळवायची कॉंग्रेसनं फार पद्धतशीर व Sophisticated योजना आखली. यातील बहुतेक सर्व मतदारसंघ हिंदी बेल्टमधील होते. मतदानकेंद्रावरील रिटर्निंग ऑफिसर, प्रिसायडिंग ऑफिसर यांनी तक्रार केल्याशिवाय निवडणूक आयुक्त तक्रारींची दखल घेत नव्हते ! अनेक मतदानकेंद्रात रातोरात मतपेट्या पळविल्या गेल्या. त्याच्या जागी दुसऱ्या ठेवल्या गेल्या. मतपत्रिकांचे गठ्ठेच्यागठ्ठे सुबकपणे अशा मतपेट्यात रचून ठेवले होते. अर्थात कॉंग्रेस (आय) नंच हे प्रकार केले असं नाही. ज्याला जिथे, जसं जमेल तिथे त्या उमेदवारानं, पक्षानं अशी कामगिरी


अब्राहम लिंकन
फाळणी टाळणारा महापुरुष
• वि. ग. कानिटकर
भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित झालेली पहिली डिलक्स आवृत्ती. मोठा क्राऊन आकार. पृष्ठे: ४००, किं. १५० रु.

राजहंस ऑगस्ट ८४ योजनेत सहभागी व्हा.
सविस्तर योजनापत्रक मागवा.
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

केली. काँग्रेस (आय) ला जास्त ठिकाणी ते जमलं. मात्र यामुळे जागांची संख्या एकदम 'स्विंग' झाली.'

विरोधी पक्षांनी आधीपासूनच अशा तऱ्हेच्या प्रकारांवर या वेळी दक्षतेनं पहारा करावा असा इशाराही त्यांनी या वेळी दिला. दिल्लीतील शीख व मुसलमानांना टायटलर व भगत यांच्या हस्तकांनी उघड धमक्या दिल्या होत्या. 'त्यांचं कसं झालं ते पाहिलंत ना! तुमचंही तसं होईल!'—अशा

विधानसभा निवडणुकीतही असाच प्रकार होईल असं त्यांचं मत पडलं.

अर्थात ही कारणं बाजूला ठेवली तरी सर्वच विरोधी पक्षनेते एकदमच ढासळल्यासारखे, त्राग्याने बोलत होते. जनता व भाजपचं काही जमत नव्हतं. निवडणुकीपुरता समझोता करायचा पण आपल्या पक्षाचा पाया व्यापक करण्याचं आपलं ध्येय असल्याचं लालकृष्ण अडवाणी म्हणाले. उन्नीकृष्णन्, सुरेंद्र मोहन ही मंडळी पार ढेपाळलेली दिसली. राजीव गांधींच्या पक्षांतरविरोधी कायद्यानं तर त्यांना पार चेमटून टाकलं होतं. वाजपेयी, चंद्रशेखर ही मंडळी तर बोलायचंच टाळत होती. यावेळी काही जास्त जागा मिळतील एवढाच त्यांचा आशावाद होता. विरोधी पक्षांची—पर्यायी पक्षांची संभाव्य बांधणी कुठेही त्यांच्या बोलण्यात नव्हती.

त्याउलट मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे लोक नॉर्मल दिसले. प. बंगालमधली हार त्यांनी आत्मशोधाच्या दृष्टीतून स्वीकारली आहे. शहरी भागात आता कामाला, प्रचारालाही त्यांनी सुरुवात केली. मात्र आपल्याकडच्या कम्युनिझमला आता खास भारतीय स्टेटस्को (जैसेथेवादी) रंग येत असल्याचं वारंवार जाणवत रहातं. युरोकम्युनिझम प्रमाणेच सांसदीय लोकशाहीच्या, निवडणुकीच्या मार्गाने जाणारा हा इंडोकम्यूनिझम विकसित होत असावा!

सहज म्हणून पार्क स्ट्रीटवरच्या मेनका गांधींच्या 'संजय विचार मंच'च्या कार्यालयात पाहिलं. फक्त पानगळ आणि शुकशुकाट!

काँग्रेस कँपमध्ये तिकिटासाठी झुंबड, बंडखोरो वगैरे असली तरी, त्यात विजयाचा आत्मविश्वास दिसत होता. यावेळी लोकसभेपेक्षा जास्त मोठा विजय मिळेल अशी त्यांची अपेक्षा आहे. दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, हरयाणा, मध्यप्रदेश; पंजाबीहिंदू — इथला प्रत्येक सामान्य माणूस एकमुखानं काँग्रेसच्या मागे दिसला. आमच्या ढाब्यावर बिहारीचा एक गट आला होता. त्यांना विरोधक, कर्पूरी ठाकूर वगैरेंचा इतका वीट आलेला दिसला. त्यांना बिहार काँग्रेसमधल्या लाथाळीचा संदर्भ दिला. तर प्रत्येकजण म्हणतो कसा की, त्यांचा काही संबंध नाही. आमची राजीव गांधींवर आशा आहे.

उत्तरप्रदेश, दिल्ली इथल्या लोकांना तर राजीव गांधीच सतत दिसत होते. आम्ही विचारपूर्वकच मतदान केलं आहे. असेंब्लीलाही तेच करणार असं ही माणसं म्हणत होती. लोकसभेप्रमाणे Sympathy wave वगैरे यावेळी नव्हती. यावेळी राजीव गांधींनं उचललेली (दिखाऊ का असेना) पावलं, हेरगिरी प्रकरण, कडक कारभार इत्यादींचा फार मोठा परिणाम करून जाणार आहेत. या 'राजीव गांधी'नं सर्व आमदार-खासदारांवर, मंत्र्यांवर खूफिया (जासूस) ठेवले आहेत. या अफवेचा तर जबर परिणाम होतो.

दिल्लीहून परतताना तर एका मंत्र्यालाच अटक करून ठेवल्याची अफवा अर्ध्या दिल्लीत पसरली. हा मंत्री दिल्लीतूनच निवडून आलेला आहे व अत्यंत भ्रष्टाचारी आहे, असे म्हणतात. त्याच्या घरावरच्या धाडीतनं ४ कोटी रुपये, १६ किलो सोनं जप्त केलं, असं त्याच्या कोठीसमोरचा दुकानदार सांगत होता. 'खुद सीबीआय अफसरोंने मुझे बताया. और अब यह सिलसिला जारी रहेगा। अब सब बाहर आयेगा. वो कुछ नहीं रखता—' अशी भावना!

विरोधी पक्षांना लढा द्यायचा आहे अशा भावनेविरुद्ध आणि हे कसं करायचं ते त्यांना अजूनही उमगलेलं नाही. चांगुलपणाचं शस्त्र करून राजीव गांधी त्यांना खिंडीत गाठत आहे. त्याला कसं उत्तर द्यायचं?

अशावेळी Solace म्हणून भारतातला मतदार कधीच सुजाण नव्हता, यावेळी लोकसभा निवडणुकासुद्धा लाटेनं किंवा जाणकारीनं जिंकल्या गेल्या नाहीत, तर नेहमीच्या बूथ कॅपचरिंग, रिगिंग, पैसावाटप, जातीचं आवाहन अशा नेहमीच्या पद्धतीनं जिंकल्या गेल्या. त्यामुळे यात काही आगळं घडलं नाही असा Anti-view दिल्लीतील एक ज्येष्ठ पत्रकार मो. ग. तपस्वी मांडतात. विरोधी पक्षांना या गोष्टींचं आकलन झालं नाही. इंदिरा हत्या, सहानुभूती, राजीव गांधी, अशा घटकांव्यतिरिक्तही देशभरात विरोधकांची मतदानाची सरासरी ५१ टक्के होती. त्यात स्त्रिया, युवक सर्वच होते. मग या ५१ टक्क्यांचा फायदा का घेता आला नाही? आणि समजा विरोधकांनी एकास-एक उमेदवार उभे केले असले तरी त्यांना यश मिळाले नाही! याची कारणे काय ते अगदी करडेपणान बघायला हवं असं ते म्हणतात.

'सेमिनार'चे संपादक रोमेश थापर तर या पूर्ण प्रकारावर तुटून पडले. राजीव गांधी म्हणे बदल करतोय? त्याला इथली माती, पाणी, दुष्काळ माहीत आहे का? सहा महिन्यात त्याच्या पक्षातले लोक त्याच्याविरुद्ध उठतील असं भाकित ते वर्तवितात.

सरतेशेवटी आता घोडा-मैदान जवळच आहे वगैरे. बिहारी ढाबावाला, करोलबागचा पंजाबी दुकानदार खरा ठरतो, असं आता तरी वाटत आहे. अडवानी, रणदिवे, चंद्रशेखर, रोमेश थापर या मंडळींना परत एकदम त्राग्याने बोलायची पाळी येईल असं दिसतं! ती येऊ नये यासाठी ते काहीच करत नाहीत!

—संजय संगवई




निवडक निवडणूक । शिरीष सहस्रबुद्धे

# दादा–पवार
# दोघांच्या भवितव्याचा हिशेब मांडणारी निवडणूक

यशवंतराव चव्हाणांचा सहभाग ज्यात अजिबात नाही अशी महाराष्ट्र राज्य विधानसभेची ही पहिलीच निवडणूक !

अर्थात त्यांच्या निधनाची छाया वगैरे या निवडणुकीवर पडलेली नाही. इंदिराजींच्या हत्येचा जो फायदा लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेसला मिळाला, तसा काही महाराष्ट्रात चव्हाणसाहेबांच्या निधनामुळे मिळणार नाही. एक तर साहेबांचं वय झालं होतं आणि नैसर्गिक दुखण्यानं त्यांना मरण आलं. दुसरं, गेल्या पाच वर्षात त्याचं राजकीय वजन इतकं तोळामासा उरलं होतं की, ते जिवंत असते तरी त्यांचा प्रभाव निवडणुकीवर फारसा पडला नसता. हे सगळं लक्षात घेतलं की, कॉंग्रेस काय किंवा पुलोद काय, कुणीच मतदारांना भावनिक आवाहन करण्यासाठी यशवंतरावांना वापरण्याची शक्यता वाटत नाही. वापरलंच तर फार तर कऱ्हाड–सातारा भागात. असं असताना इथं त्यांचा उल्लेख कशासाठी ?

यशवंतरावांची आठवण व्हायचं कारण असं की, त्यांचा राजकीय वारसा कुणाकडे जाणार याचं उत्तर या निवडणुकीतून मिळणार आहे. महाराष्ट्राची जी सुभेदारी त्यांनी सुमारे दोन दशकं सांभाळली आणि गाजवली, ती त्यांच्या राजकीय अस्तानंतर, म्हणजे पाच–एक वर्षांपूर्वीपासनंच रिकामी पडली होती. इंदिरादरबारात हुजरेगिरी करण्यात सगळ्या पुढारीमंडळींची चुरस असल्यानं स्वतंत्र कर्तृत्वाचा मानकरी कुणी दिसत नव्हता. ही पोकळी भरून निघायची शक्यता आता निर्माण झाली आहे आणि त्यासाठी यशवंतरावांच्या तालमीत तयार झालेल्या पहिल्या पिढीचे प्रतिनिधी वसंतदादा एक इच्छुक आहेत तर तिसऱ्या पिढीतले शरद पवार त्यांचे प्रतिस्पर्धी आहेत. स्वतंत्र बळ आणि व्यक्तिमत्व कमावण्यासाठी दोघांचीही तयारी गेली दोन–तीन वर्षं तरी चालू आहे. दोघांचीही आपापली बलस्थानं आहेत नि उणिवाही आहेत. महाराष्ट्राच्या निवडणुकीतल्या पक्षीय चुरशीवर एक नजर टाकली तरी असं दिसतं की, वरवर दोन किंवा तीन आघाड्या दिसल्या आणि बहुसंख्य मतदारसंघात तिरंगी–चौरंगी लढती होणार असल्या तरी प्रत्यक्षात वसंतदादा नि शरद पवार या दोघा मल्लांमधलीच ही लढत आहे. झुंज ईर्ष्येची अन् प्रतिष्ठेची आहे आणि दोघांच्याही वैयक्तिक नि राजकीय भवितव्याच्यादृष्टीनं ही कदाचित शेवटचीच, निकाली लढत ठरणार आहे. उमेदवार दोनहजार असले तरी निवडणुकीचा गाभा आहे तो एकास एक या वसंत–शरद लढतीचा आणि म्हणूनच दोन्ही लढवय्यांच्या ताकदीचा नि डावपेचांचा अभ्यास करणं जरुरीचं आहे.

## धूर्त नि अनुभवी दादा

रयत शिक्षण संस्थेसारख्या प्रचंड पसारा असलेल्या संस्थेच्या अध्यक्षपदी नुकतीच वसंतदादांची निवड झाल्याचं वाचलं तेव्हा त्यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीतले अनेक चढउतार आठवले. हेही लक्षात आलं की, त्यांच्याआधी वीस वर्षं रयतचे अध्यक्ष होते यशवंतराव चव्हाण. तेव्हा चव्हाणांच्या अनुयायांपैकी काहीजणांना तरी वसंतदादाच त्यांच्याजागी त्यांच्यानंतर यायला लायक दिसतात हे उघड आहे.

वसंतदादांना मोठा फायदा मिळतो तो त्यांच्या ज्येष्ठतेचा. म्हणजेच पर्यायानं अनुभवाचा. स्वातंत्र्यलढ्यापासूनच राजकारणात असलेले दादा त्यातल्या डावपेचात चांगले मुरलेले आहेत. विरोधक पक्षातले असोत की पक्षाबाहेरचे, त्यांना पाठ केव्हा दाखवावी आणि अंगावर केव्हा घ्यावं या रणनीतीचे धडे त्यांनी यशवंतरावांबरोबर दीर्घकाळ गिरवले आहेत. दोघांमधला फरक दाखवायचा तर वसंतदादा पक्षांतर्गत विरोधकांच्या बाबतीत यशवंतरावांपेक्षा जास्त अनुदार नि आक्रमक असतात असं म्हणता येईल. अर्थात ही शेवटी प्रतिक्रिया आहे. वसंतदादांना पक्षातनं होणारा विरोधही पूर्वी यशवंतरावांना झालेल्या विरोधापेक्षा अधिक कडवा असतो हे खरंच आहे. अंतुले, आदिक नि बाबासाहेब भोसले ही याची चांगली उदाहरणं. या दोघांच्या कारकीर्दीत वनवासात दिवस कंठावे लागल्यानंतर गेल्या दोन वर्षात दादांनी त्यांच्यावर कशी मात केली हा इतिहास आपल्यासमोर आहेच. या तिघांची डिनर डिप्लोमसी काय किंवा त्यांना कधी छुपा पाठिंबा तर कधी उघड संरक्षण देण्याचे पक्षश्रेष्ठींचे डावपेच काय, दोन्ही हाणून पाडण्यात दादा वेळोवेळी यशस्वी झाले. भ्रष्टाचारविरोधी कायद्यातली अंतुलेतारक दुरुस्ती काय किंवा रामरावांचे हॅनोव्हर प्रकरण काय एखाद्या नेमक्या नि हुकमी उतारीनं दादांनी डाव जिंकले आणि प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम केले.

महाराष्ट्राचं मुख्यमंत्रीपद तीनदा उपभोगणाऱ्या दादांनी नव्या राजवटीतसुद्धा आपलं आसन स्थिर तर ठेवलंच पण आपला केंद्रावरचा प्रभाव वाढवलाच. विधानसभेची तिकिटं वाटताना त्यांनी सफाईदारपणे पक्षांतर्गत विरोधकांचे पत्ते कसे काटले आणि नको झालेल्या डझनभर मंत्र्यांच्या खुर्च्या किती चलाखीनं हिसकावल्या याचे किस्से आता हळूहळू बाहेर येताहेत. ज्यांची तिकिटं दादांमुळे गेली त्यांची करियरच खलास होईल असं नाही, पण दादाविरोधी कारवाया उजळमाथ्यानं केल्याबद्दल एवढा जबर फटका बसला हे मात्र त्यांना चांगलं चरचरून जाणवेल यात शंका नाही. लोकसभा निवडणुकीत दादांवर कुरघोडी करून आणि केंद्रीय नेतृत्वाशी थेट संपर्क साधून आपली माणसं खासदारकीवर बसवणाऱ्या बळिराम हिऱ्यांची आमदारकीच दादांनी काढून घेतली. असं ऐकलं की, त्यासाठी दादांनी राजीवकडे हमखास यशस्वी होणारा उपाय वापरला. अलिकडेपर्यंत हिऱ्यांच्या ताब्यात असलेल्या गिरणा

सहकारी साखर कारखान्यातल्या भ्रष्टाचाराचे वृत्तांत आणि असेच इतर आरोप !

थोडक्यात काँग्रेसची उमेदवारी यादी बव्हंशी दादांची यादी आहे. दादांचे धूर्त हिशेब नि राजीवजींची मार्गदर्शक सूत्रं यांचा मेळ बसल्यामुळे भल्याभल्यांच्या टोप्या अस्मानात उडाल्या. त्यातल्या काहींच्या पोराबाळांना नि नवऱ्यामेव्हण्यांना तिकिटं देऊन त्यांचा बंडखोरीचा मार्गही दादांनी बंद करून टाकला. आता कसोटी लागेल ती त्या मंडळींना निवडून आणण्यात. विशेषत: ज्या मतदारसंघात अगदी नवे चेहरे आहेत, जिथे विद्यमान आमदारानं बंडखोरी करून अर्ज भरला आहे, तिथे काँग्रेस आय् अडचणीत येऊ शकेल. मात्र अशा मतदारसंघांची संख्या डझन–दीड डझनाहून जास्त भरणार नाही. कारण असंतुष्टांची संख्या अन् नाराजी कितीही वाढली तरी सरसकट नि धाऊक बंडखोरी होणार नाही. पक्षाचं कुंकू पुसलं आणि इंदिराजींकी याद नि राजीवजीका साथ यांचा आधार तुटला म्हणजे बॅ. अंतुलेसारख्या जबर जिद्दीच्या नि गवर थैलीच्या माजी मुख्यमंत्र्याचीसुद्धा कशी दैना होते हे लोकांनी ताजच पाहिलंय् तेव्हा गयारामांचा बाजार फार गरम व्हायचा नाही. एवढंच की त्या त्या असंतुष्ट पुढाऱ्याशी निष्ठावंत असलेले कार्यकर्ते फार तर प्रचारात कुचराई करतील किंवा अलिप्तच राहतील; पण त्यांचाही उपद्रव निवडणुकीच्या एकंदर निकालावरच परिणाम करण्याइतका मोठा व्हायचा नाही. त्याउलट तरुणांना, नव्यांना संधी दिली हा प्रचार बहुसंख्येनं असणाऱ्या चाळिशीच्या आतल्या मतदारांना काँग्रेसकडे वळवू शकेल. परंपरेनं काँग्रेसवादी असणारे विदर्भ, मराठवाडा, खानदेश नि पश्चिम महाराष्ट्रातले इतर ग्रामीण भाग दादांच्या उमेदवारांच्या पदरात भरघोस यश टाकतील असं खात्रीनं वाटतं.

## दादाच पुन्हा मुख्यमंत्री?

महाराष्ट्राचं मुख्यमंत्रीपद दादा चौथ्यांदा मिळवू शकतील का हा एक समस्त ज्योतिषी वर्गाला विरंगुळा म्हणून उपयोगी पडण्यासारखा सवाल आहे. दादांनी 'होय' असं उत्तर आपण होऊनच देऊन टाकलं. शरद पवारांनी लगोलग त्याचा प्रतिवादही केला आणि हा निर्णय राजीवच्या मर्जीवर अवलंबून आहे, दादांच्या नव्हे, अशी कोपरखळीसुद्धा मारली. उमेदवार यादीवरचा दादांचा प्रभाव विचारात घेतला, तर खुली निवडणूक झाल्यास दादा निवडून येतील यात शंका नाही; पण ते पाच वर्षांची मुदत पुरी करतील हे शक्य वाटत नाही.

दोन–तीन ठळक अडचणी दिसतात. एक तर दादांनी तिकिटं वाटपात ज्या पक्षांतर्गत विरोधकांवर भरपूर सूड उगवून घेतला आहे ते नि त्यांचे दिल्लीतले पाठीराखे दादांना सतावल्याखेरीज राहणार नाहीत. दुसरी गोष्ट, नव्या जमान्यातल्या आदर्श नेतृत्वाचा साचाही नवा आहे. दादा त्यात बसत नाहीत. राजीव गांधी आज दादांना पाठिंबा देत असले तरी दोघांच्या प्रकृती मुळात एक नव्हेत. दादांचं शिक्षण यथातथा, हिंदीची पंचाईत आणि इंग्लिशचा अंधार. तेव्हा गणकयंत्राच्या युगाशी त्यांचा सूर जुळणं कठीण. तिसरी गोष्ट दादांचं वय झालं आहे आणि रक्तदाब–मधुमेह वगैरे पाहुण्यांनी शरीरात जम बसवला आहे. काठी टेकत ते राजकारणातल्या खेळी झकास करू शकतात हे खरं; पण दैनंदिन कारभारात त्यांची कार्यक्षमता अभावानंच दिसते. देशातल्या पहिल्या क्रमांकाच्या राज्याला सतत पुढे नेण्यासाठी हवं तसं गतिमान नेतृत्व दादा यानंतर देऊ शकतील असं वाटत नाही. त्यामुळे एक शक्यता अशी दिसते की, निवडणुकीनंतरचे सहाएक महिने दादा मुख्यमंत्री होतील आणि पक्षांतर्गत विरोध नि शरद पवारांचं आव्हान थंडावल्यानंतर आपल्या विश्वासातल्या सुशीलकुमार शिंदे किंवा सुधाकर नाईक यांच्यापैकी एकासाठी आपणहोऊन जागा करून देतील. कदाचित अशी काही आखणी उभयपक्षी ठरल्यानंतरच दादांना दिल्लीचा भरघोस पाठिंबा मिळाला असेल. एवढं मात्र नक्की की एकेकाळी यशवंतरावांनी मुंबई नि दिल्ली दोन्हीकडे जसा प्रभाव गाजवला तशाच पवित्र्यात आज दादा आहेत आणि यात त्यांच्या चाणाक्षपणा सावधपणा, हिशेबी आक्रमकता आणि अनुभवानं आलेली परिपक्वता या गुणांचा वाटा परिस्थितीच्या अनुकूलतेच्या वाट्यापेक्षा जास्त आहे.

## पवार : अस्तित्वाचाच प्रश्न

अर्थात राजकारणी माणसाच्या या वैयक्तिक गुणांचाच विचार करायचा झाला, तर शरद पवार यांचं पारडं दादांपेक्षा थोडंसं जडच भरेल. पवार पंचेचाळिशीत आहेत. म्हणजे राजीव गांधींच्याच पिढीचे प्रतिनिधी! अर्थात तरीही राजकारणाचा त्यांचा अनुभव पंचवीसएक वर्षांचा तरी आहे. तरुण वयातच त्यांना यशवंतरावांकडून राजकारणाचे धडे मिळाले आहेत. त्यांनी ते चांगले घटवलेही आहेत. पदवीशी त्यांनी झटपट केलेली आहे आणि हिंदी–इंग्रजीही ते जरा बरं बोलू शकतात. मुख्यमंत्रीपदाची त्यांची कारकीर्द खुर्चीखाली वेगवेगळ्या पक्षांचे पाय असूनही लंगडत नव्हे तर चांगल्या ऐटीनं चालली होती. दादांपेक्षा शरदराव जास्त पाताळयंत्री आहेत, गतिशील आहेत आणि भल्या–बुऱ्याचा विवेक जास्त सहजपणे खुंटीला टांगू शकतात. प्रशासकीय कौशल्य आणि नोकरशाहीकडून काम करून घ्यायची हातोटी या दोन्ही कसोट्यांवर पवार आज तरी दादांपेक्षा वरचढ आहेत. पैशाची सुबत्ताही त्यांच्याकडे आहे (असं ऐकतो !) आणि आपली लोकप्रियता महाराष्ट्रापुरती तरी लोकसभा निवडणुकीत त्यांनी निर्विवाद सिद्ध केली आहे. पत्रकारांशी त्यांचा दादांपेक्षा जास्त मेळ आहे. एकीकडे अर्थ–उद्योग, व्यापार क्षेत्र आणि दुसरीकडे सांस्कृतिक–साहित्यिक वर्तुळं, या दोन्हीत त्यांची उठ-बस दादांपेक्षा कैकपटीनं अधिक आहे. एकंदरीत यशवंतरावांच्या गुणवैशिष्ट्यांचा वारसा शरदरावांकडे दादा किंवा इतर कुणापेक्षाही जास्त आला आहे.

इतकी गुणवत्ता असूनही पवारांचं भवितव्य आज डळमळीत का ? मला वाटतं की, परिस्थितीची प्रतिकूलता आणि काही चुकीचे निर्णय यांचा हा संयुक्त परिणाम म्हटला पाहिजे. एरवी, सत्तेच्या आश्रयानं झपाट्यानं वाढलेल्या पवारांना, ऐन उमेदीत करियर असताना, लहान-मोठ्या पक्षांच्या चिंध्या गोळा करून, गोधड्या शिवून गुजराण करायची वेळ का यावी ? विरोधक म्हणून दीर्घकाळ राजकारण करायची पवारांना सवय नाही, क्षमता नाही आणि इच्छा त्याहून नाही. तरीही ते त्यांच्या नशिबात आलं आहे. ही कोंडी फोडायचा शेवटचा निक-

राचा प्रयत्न म्हणजे पुलोद १९८५ !

पुलोदमध्ये सामील होण्यावाचून जसा विरोधी पक्षांना पर्याय नव्हता, तसाच पुलोद उभी करण्यावाचून पवारांना नव्हता. त्यांच्या समाजवादी कांग्रेसची वेगळी चूल तर विझ-तच आली आहे. त्या पक्षाकडे ना साधनं, ना संघटना, ना नेते, ना कार्यकर्ते. अखिल भार-तीय पातळीवरचं एकही व्यक्तिमत्व नाही. शरद पवारांची अखिल भारतीय प्रतिमा निर्माण व्हायला कैक दशकं लागतील. राष्ट्रीय पातळीवर तर पक्ष साफ धुवून निघालाच आहे. आता त्याचा प्रादेशिक आधार महाराष्ट्रापुरता टिकवायचा झाला तरी चारचौघांशी तडजोडी करून अनेकरंगी लढती टाळायलाच हव्यात, म्हणून पुलोदची गरज. सुदैवानं सगळ्या विरोधी पक्षांची हालत, गरज नि मजबूरी एकच आहे; त्यामुळे पवारांना प्रतिसाद चांगला नि लव-कर मिळाला. काहीशा अनपेक्षितपणेच तब्बल दोनशेपंच्याऐंशी जागांवरचा नाटय-पूर्ण समझोता पवार, कांग्रेसच्या यादीच्या बऱ्यापैकी आधी जाहीर करू शकले. काही प्रमाणात त्यातही बंडखोरी होईल असं गृहीत धरूनसुद्धा कांग्रेसी तिकिटवाटपातल्या दिरंगाई नि गोंधळाच्या पार्श्वभूमीवर, पुलोदचा आरंभीचा 'परफॉर्मन्स' तरी मत-दारांवर चांगली छाप पाडू शकला. कांग्रेस-वाल्यातल्या नाराजीचा नि गटबाजीचा फायदाही थोडाफार पुलोदला मिळू शकेल. एकूण कांग्रेसच्या इतर मुख्यमंत्र्यांपेक्षा जास्त धारदार आव्हान पवारांनी दादांसमोर उभं केलं यात शंका नाही आणि म्हणूनच ही निवडणूक 'कॅरॅक्टराइज' होणार आहे ती दादा–पवार या दोन ताकदीच्या व्यक्तित्वा-तल्या ईर्ष्येमुळं नि झुंजीमुळं,असं मला वाटतं. दादा तर पवारांवर खार खाऊन आहेतच. पक्षातल्या विरोधकांचे हिशेब त्यांनी बहुतेक चुकते केले आहेत. पवारांनी अठ्ठ्याहत्तर साली दगलबाजी करून दादांना मुख्यमंत्री-पदावरून खाली खेचलं होतं. त्याचा बदला घ्यायची खुमखुमी दादांच्या काठीत नक्कीच आहे. पवारांना या निवडणुकीत नामोहरम करून कायमचं राजकारणातून उठवता आलं तर दादांना आवडेलच. पवारांचा दादांवर व्यक्तिगत राग नसला तरी त्यांचा खुर्चीवर डोळा आहेच. ऐंशी साली खुर्ची खाली करावी लागली होती, त्याचाही सल मनात असणारच. कांग्रेसची यादी जशी दादांची आहे तशी पुलोद ही पवारांची निर्मिती आहे. कांग्रेसच्या बाजूनं सगळी जबाबदारी दादांवर आहे तशी पुलोदची सगळी मदार शरदरावांवर आहे. कांग्रेसच्या विजयामुळे दादांची शान वाढणार आहे तर पुलोद जिंकल्यास पवारांना राजकारणात नुसतं जीवदानच नव्हे तर मानाचं स्थानही लाभ-णार आहे. याचा व्यत्यासही खरा आहे. म्हणजे कांग्रेस हरली तर अगोदरच लांबव-लेली कारकीर्द गुंडाळली जाणार आहे आणि पुलोद पराभूत झाल्यास पवारांची राजकीय कारकीर्दच अपयशाच्या गर्तेत संपणार आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल दोन नेत्यांच्या कारकीर्दी नि भवितव्याशी इतका एकरूप झाल्याचं उदाहरण यापूर्वी सापडणार नाही.

## आता शेवटची लढत !

पवारांच्या राजकीय भविष्याचा विचार थोडा बारकाईनं करायला हवा. अगोदरच पाच वर्षं विरोधात राहून त्यांनी आपली दमछाक करून घेतली आहे. आणखी पाच–दहा वर्षं विरोधातच रहायला मतदारांनी त्यांना फर्मावलं तर चिवटपणे झुंजत राहणं त्यांच्या प्रवृत्ती नि प्रकृतीला मानवणारं नाही. यशवंतरावांप्रमाणेच सत्तेच्या आधारानंच फुलणारं आणि सत्तेविना निस्तेज होणारं हे व्यक्तिमत्व आहे. मात्र कांग्रेस आयमध्ये सामील होऊन सत्तेच्या जवळपास राहण्याचा आणि योग्य संधी शोधण्याचा राजमार्ग पवा-रांनी आपल्या हातानं बंद करून घेतला आहे. अशा निदान दोन-तीन मुहूर्तवेळा तरी त्यांनी चुकवल्या. दादांनी त्यांना शेवटची संधी इंदिराजींच्या निधनानंतर देऊ केली होती, तीही त्यांनी दवडली. त्यामागे तत्व-निष्ठा नाही हे नक्कीच. मग आहे काय ? तर कांग्रेसवासी होण्याआधी मुख्यमंत्रिपदाचं आश्वासन मिळालं पाहिजे असा आडमुठा हट्ट–असं ऐकिवात आहे ! अशी अट कांग्रेस-नेते सध्याच्या त्यांच्या उच्चीच्या दिवसात मानण्याची काहीच शक्यता नाही. राज-कारणी माणसाचे सगळेच डावपेच नि हिशेब आपल्याला उमजत नाहीत हे मात्र खरं. एरवी कोणत्या आधारावर पवार आपला आशावाद टिकवून कांग्रेसबाहेर राहिले आहेत हे एक कोडंच आहे. काही असो; पण इतक्या गाड्या चुकवणारा प्रवासी मुक्कामा-वर कधी पोचू शकेल का, याबद्दल मला जबरदस्त शंका आहे.

आपला उरलासुरला फौजफाटा गोळा करून पवार लढायला उभे ठाकले आहेत. एकशेसत्तर–ऐंशी जागा जिंकण्याचा दावा लिहायबोलायला सोपा आहे. पण इतकं झुकतं माप त्यांच्या पदरात घालायची मतदारांची मानसिक तयारी आहे असं वाटत नाही. कांग्रेस आयचे काही असंतुष्ट आमदार अठ्ठ्याहत्तर सालासारखे गठ्ठ्यानं फोडता येतील हा एक आडाखा त्यांच्या मनाशी असेलही कदाचित; पण त्यावर विसंबता येणार नाही. एक तर पक्षांतरबंदी विधेयकावर राष्ट्रपतींची सही झाल्यानंतर त्याचा बडगा बसायची शक्यता; दुसरं, कांग्रेसमधनं फुटणा-ऱ्यांचं भवितव्य हळूहळू कसं धूसर होत जातं हे डझनावारी उदाहरणांवरनं शिकलेले आम-दार, सहजपणे पवारांमागे जाणं मुष्किल ! पवारांचे पुलोदमधले साथीदारही लटपटीतच आहेत. भाजपाकडे राज्यपातळीवरचे नेतेच नाहीत, तर जनतापक्षाकडे नेते भरपूर पण कार्यकर्ते कुठायत् ? शेकापचा प्रभाव जेमतेम आठ-दहा ठिकाणी शिल्लक आहे. हे पक्ष आपापली हुकमी पॉकेटस् जिंकू शकतील, पण पवारांच्या सिंहासनाच्या पायऱ्या घड-वण्याइतकी ताकद त्यातनं निर्माण व्हायची नाही. या घटकेला तरी पुलोदची हमखास बेरीज पाउणशे ते शंभरादरम्यानच घोटाळते आहे. आणि तसं झालं तर जिद्दी शरदरावां-पुढे दोनच पर्याय शिल्लक राहतील–दाती तृण धरून राजीवजींच्या दरवाजात उभं राहणं किंवा प्रादेशिक पातळीवरचा विरोधी नेता म्हणून हळूहळू विझत जाणं. हा अर्था-तच अंदाज. विधिलिखित नव्हे. तेव्हा चतुर राजकारणी ते चुकवू शकतो; पण त्यासाठी परिस्थितीची साथ हवी. आज ती दादांना आहे, पवारांना नाही. आणि दादासुद्धा अड-गळीत पडले होते ते परिस्थिती पालटल्या-नंतरच 'फॉर्मात' आले. पवारांना अनुकूल दान कधी पडेल ही उत्सुकता आहे आणि त्यामुळेच कांग्रेस म्हणजे दादा आणि पुलोद म्हणजे पवार यांची ही लढत अटीतटीची होणार हे निश्चित. यशवंतरावांचा मानसपुत्र म्हणून एकेकाळी शरदरावांचं नाव घेतलं जायचं. आजचं चित्र तसं नाही. यशवंत-रावांच्या राजकीय स्थानाचा नि कर्तृत्वाचा वारसा कुणाकडं जाणार हे या लढतीतनं ठरणार आहे. आज दादांची बाजू वरचढ असली तरी दोघांच्याही करियरच्या दृष्टीने ही निर्णायक लढत शेवटचीच ठरेल असं आवर्जून वाटतं. □

हवेली (पिंपरी–चिंचवड महानगर) निवडणूक वार्तापत्र

# पुलोदकडे झुकणारा मतदारसंघ

गिरीश प्रभुणे

एकंदरीत 'पुलोद'ने सर्वांनाच धक्का दिला. उमेदवार कोणतेही वाद न होता जाहीर झाले आणि त्या पार्श्वभूमीवर कॉंग्रेस (आय) ची अवस्था बिकट वाटू लागली. लोकसभेच्या विजयाच्या एका धुंदीत पक्षनेतृत्व वावरताना दिसत आहे आणि उमेदवार निवडीत साठ टक्के नव्यांना वाव देण्याच्या धोरणामुळे पक्ष यंत्रणाच जवळजवळ नेस्तनाबूत होतेय की काय अशी अवस्था झालीय. सहा तारखेला पहाटे म्हणजेच पाच तारखेला रात्री दिल्लाहून उमेदवारांची लॉटरी फुटली आणि सर्वत्र एकच हलकल्लोळ माजला.

हवेली विधानसभा मतदार संघातील कॉंग्रेस आयच्या उमेदवारीच्या शर्यतीतले उमेदवार मोतीराम पवार, उषाताई चौधरी, सुरेश सोनवणे, टी. ए. तिरूमणी, गो. प्र. पानसरे; पण ही सर्व नावे बाजूला फेकली गेली आणि या शर्यतीत पहिल्यापासून नसलेले असे नाव पुढे आले ते म्हणजे अशोक तापकीर यांचे !

अशोक तापकीर या युवक कॉंग्रेसच्या हवेली तालुका अध्यक्षाला उमेदवारी मिळाली आणि भलेभले कॉंग्रेसवाले तोंडात बोट घालून पहात राहिले आणि मग लक्षात आले, हा चमत्कार कॉम्प्युटरचा नाही !

त्याकरिता पुणे शहरातील शिवाजीनगर मतदार संघाकडे पहावे लागेल. खासदार गुरुदास कामत यांनी शिवाजीनगरमधून मोहन जोशी यांना तिकिट मागितले होते. परंतु अण्णा जोशींच्या जबरदस्त उमेदवारीला तोंड देण्यासाठी मोहन जोशींची उमेदवारी कच्ची होती. मग त्यांचा विचार इतरत्र कुठे होईल हे पहाता पहाता हवेली डोळ्यासमोर आले. अशोक तापकीर यांना मुळशीतून उमेदवारी हवी होती. कारण मुळशी म्हणजे 'घरी बसूनही निवडून येणार' असा खास मतदारसंघ; पण गुरुदास कामतांच्या गटाचे म्हणून मोहन जोशींच्या ऐवजी हवेलीत अशोक तापकीरांना अचानक तिकिट मिळाले. हवेलीतल्या 'आय'च्या गटात सर्वत्र सुन्न वातावरण पसरले.

अशोक तापकीर हे पिंपरी–चिंचवड महानगरच्या सीमेवरील चऱ्होली गावचे ग्रामीण भागातील युवक कार्यकर्ते. थेऊरच्या साखर कारखान्यातील माजी संचालक तसेच साखर कामगार आघाडी-(किशोर पवार प्रणित) चेही कार्यकर्ते, पश्चिम महाराष्ट्र युवक कॉंग्रेसचे सरचिटणीस इ. ठिकाणी पदाधिकारी असणारे अशोक तापकीर हे पिंपरी–चिंचवडला कितपत मंजूर होतील याबद्दल शंका आहे. आज माजी आमदार मोतीराम पवार यांनी जरी उमेदवारी अर्ज भरलेला असला तरी ते मागे घेतील! सर्वात मोठा नाराज गट अध्यक्ष तिरूमणी यांचा. हा सुद्धा बंडखोरी न करता शांत राहील. आपले अस्तित्व दिसावे इतपत प्रचार आघाडी ही मंडळी सांभाळतील; पण त्यात जोर दिसणार नाही. युवक कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये मात्र उत्साह संचारला असून ते प्रचारात आघाडीवर रहातील. अशोक तापकीर यांना ग्रामीण भागातील मतदान होईल; परंतु त्यांच्या विरोधात 'पुलोद' तर्फे जनताचे बाळासाहेब लांडगे हे आहेत.

## जनताचे बाळासाहेब लांडगे

पुलोद आघाडीने जरी बाळासाहेब लांडग्यांना तिकिट दिले असले तरी पुलोद अंतर्गत सर्वच पक्षात नाराजीचे वातावरण आहे. जनता पक्षातच बाळासाहेब लांडगे यांना समाजवादी गटाच्या विरोधाला तोंड द्यावे लागत आहे. जनता पक्षातील समाजवादी गटाचे जी. ए. इनामदार यांना उमेदवारी मागितली होती. इनामदार हे अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधी. कामगारांतही त्यांचे काम आहे. भाडेकरू पंचायत, झोपडपट्टी पंचायत यांचंही ते सुरुवातीपासूनचे कार्यकर्ते. माजी नगरसेवक जॉर्ज फर्नांडिस गटाचे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इनामदारांना उमेदवारी न मिळाल्याने समाजवादी गट नाराज असून कार्यकर्त्यांनी अपक्षाला पाठिंबा द्यायचे ठरविले आहे. जनतापक्षाचे कार्यकर्ते श्री. मानव कांबळे हे इनामदारांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. दोन्ही पायांनी अपंग असलेले कांबळे हे तरूण वर्गात लोकप्रिय असून त्यांचा असा एक चाहता वर्ग आहे. चिंचवड जनता नेते धोंडुतात्या चिंचवडे यांचे चिरंजीव अशोक चिंचवडे हे मानवचे समर्थक आहेत. मानव माघार घेणार नाही असे आज तरी वाटते. यामुळे खुद्द जनता पक्षातल्या दुहीचा परिणाम बाळासाहेब लांडगेंच्या प्रचारावर होईल.

विरोधी पक्षियांना या मतदार संघात पुलोदचा लाभ न होण्याची अनेक कारणे आहेत. एकतर जनतापक्षातील ही भांडणे, त्याचबरोबर खुद्द जनतापक्षाचे निवडणुकीशिवाय या भागात तसे काहीच कार्य नाही. समाजवाद्यांच्याच नेत्यांच्याप्रमाणे इथेही गट आहेत. जनतामधील संघटना कॉंग्रेसवाले उमेदवारी मिळविण्यात जरी विजयी झाले असले तरी बाळासाहेब लांडगे यांचा येथील कार्यकर्त्यांशी, पक्ष यंत्रणेशी कोणताच संपर्क राहिलेला नाही. दिसायला जरी ते स्थानिक उमेदवार असले तरी त्यांचे कायम वास्तव्य पुण्यालाच असते. मागच्या निवडणुकीतही जनताचे हेच उमेदवार होते. त्यावेळी त्यांना तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती. त्यानंतर त्यांनी आत्ताच या भागाशी संपर्क साधला असल्याने, कार्यकर्त्यांच्या अभावाने त्यांना प्रत्यक्ष प्रचारकार्य जड जाणार आहे.

लांडगे हे कुस्तीचे पंच असल्याने त्यांचे गावागावातील तालमींशी जवळचे संबंध आहेत. नात्यागोत्यांचे जाळेही त्यांच्या कामास येईल. संभाजीराव काकडे, शरद पवार यांच्या युतीचा त्यांना लाभ होईल.

पुलोद आघाडीतील घटकपक्ष भाजपा हा इथला सर्वात प्रबळ आणि संघटित पक्ष. प्रत्येक वॉर्डात कार्यकारिणी असलेला एकमेव पक्ष ! हवेलीची जागा लढविण्याची तयारी सूत्रबद्धपणे गेली पाचवर्षे भाजपाने केली होती. पुलोदमुळे जनताला ही जागा गेल्याने भाजपा नाराज आहे. उमेदवार जनताचा आणि कार्यकर्ते भाजपाचे अशी आता इथली अवस्था झाली आहे. भाजपाच्या माजी नगरसेविका सौ. प्रतिभा लोखंडे यांनी फॉर्म भरला आहे. परंतु त्या माघार घेतील. भाजपाचे एक युवक कार्यकर्ते मधुसूदन जाधव यांनीपण उमेदवारी अर्ज भरला आहे. परंतु त्यांचा प्रभाव नसल्याने पक्षाची मते त्यांना पडण्याची शक्यता कमी.

बाळासाहेब लांडग्यांना विजयी होण्यासाठी

भाजपाचीच आवश्यकता इथे भासणार. शरद पवारांच्या प्रचारयंत्रणेत या भागात भाजपाचे मधु जोशी, तुकाराम जवळकर, चेतनदास मेवाणी, अशोक पारखी आघाडीवर होते. याही वेळेस ही मंडळी कसून कामे करतील.

समाजवादी काँग्रेस हा पुलोदचा महत्त्वाचा घटक पक्ष. परंतु पिंपरी-चिंचवडमध्ये त्यांचे म्हणावे तितके काम नाही. मागच्या ८० च्या निवडणुकीत अशोक म्हस्के यांना दोन क्रमांकाची मते पडली होती.आताही ते उभे आहेत. जर त्यांनी माघार नाही घेतली तर बाळासाहेब लांडग्यांचीच मते ते खेचणार आहेत. मागच्या वेळेस मोतीराम पवारांच्या विरोधात इंदिरा काँग्रेसचीही मते त्यांना पडली होती.

पिंपरी-चिंचवडमधील अपक्षांमध्ये ज्यांचा बोलबाला अधिक असे एन्. आर. शिंदे यांनी अपक्ष म्हणून आपली उमेदवारी जाहीर केली आहे. पूर्वीचे आय् काँग्रेसचे, नगरपालिकेतील माजी मुख्याधिकारी, अण्णासाहेब मगर यांचे सहकारी, तरुण धडाडीचे कार्यकर्ते, सध्या एस काँग्रेसमध्ये असलेले. यांच्या धरसोड वृत्तीमुळे त्यांचा याही निवडणुकीत विशेष प्रभाव पडणार नाही. परंतु आय् काँग्रेसची मते ते घेतील. पिंपरी-चिंचवडच्या समस्यांची चांगली जाण असणारी व्यक्ती म्हणून त्यांचा लौकिक आहे.

पुणे आणि मुंबई यांना सांधणारी पिंपरी-चिंचवड महानगरी मध्यमवर्गीय, कामगार-झोपडपट्टी, उद्योगपती, ग्रामीण भाग इ. कारणाने वेगवेगळी रूपे धारण करणारी. मुंबईप्रमाणे तिचा 'कामगार' वर्गाचा तोंडावळा नाही किंवा पुण्याप्रमाणे 'मध्यमवर्गीय सांस्कृतिक' तोंडावळाही नाही. पिंपरी-चिंचवडचा तोंडावळा अद्यापही समिश्र आहे. उद्याच्या संस्कृतीची जडणघडण इथे होतेय. त्रेपन्न झोपडपट्यातून जवळजवळ लाखावर मतदान इथे आहे. दलितांचे वीस ते पंचवीस हजार समर्थक आहेत. अल्पसंख्यांक या मतदार संघात आजतरी अल्पच आहेत. बहुजन समाज, जो विशेषत: सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर-उस्मानाबादकडून उद्योगधंदा-नोकरीच्या निमित्ताने इथे येऊन स्थाईक झालाय, तो मोठ्या प्रमाणात आहे. मध्यमवर्गीय वस्ती चिंचवडला मोठ्या प्रमाणात असून पिंपरी पेनिसिलीनच्या परिसरातही मध्यमवर्गीयांचे बळ मोठे आहे. प्राधिकरण या नव्या वसाहतीत मध्यमवर्गीयांचाच भरणा अधिक आहे. पिंपरी कॉलनी ही सिंधी वसाहत. या भागात सर्वत्र भाजपचे कार्य असल्याने त्याचा फायदा पुलोदला होईल. बहुजन समाजाची मते तापकीर आणि लांडगे यांना समप्रमाणात पडतील.

## कामगार आघाडीत फूट

प्रामुख्याने कामगारवर्गाची वस्ती असणाऱ्या या भागात दुर्दैवाने कामगारांच्यात प्रभावी ठरेल असे कोणत्याच पक्षाचे अथवा कामगार संघटनेचे काम नाही. डाव्या विचारसरणीच्या पक्षाचे, पक्ष म्हणून काम शून्य असून कामगार क्षेत्रातही फुटकळ काम आहे. रूपमय चतर्जी यांच्या अपघाती मृत्यूनंतर येथील कामगार क्षेत्रातील पोकळी भरून काढू शकेल असे कामगार-नेतृत्व पुढे येऊ शकले नाही. दत्ता सामंत यांच्या प्रभावाखाली हा भाग न आल्याने त्यांच्याही युनियन्स कमीच आहेत. क्लोराईड इंडियात गेले सव्वावर्ष झालं, दत्ता सामंतप्रणित युनियनने संप पुकारला असून कामगार एकजुटीने संपावर आहेत. या निवडणुकीत कामगार आघाडीत दोन तट पडले आहेत. फॉरवर्ड ब्लॉकप्रणित रूपमय चतर्जींच्या कामगार संघटनेतर्फे बी. आर. भालेराव उभे आहेत तर कामगार आघाडीतर्फे अशोक मनोहर उभे आहेत. डाव्यांमधील ही फूट येथील कामगारवर्गाची मते खेचण्यात अयशस्वी ठरणार. एकतर सर्वमान्य होईल असा उमेदवार आज नाही. शिवाय कामगारांवर प्रभाव पडेल असे कोणत्याच कामगार संघटनेचे काम नाही. अशोक मनोहर यांच्या प्रचारासाठी दत्ता सामंतांनी यायचे मान्य केले आहे असे बोलले जाते. दत्ता सामंतांच्या पक्षाने अंतुलेंच्या पक्षाशी केलेल्या हात मिळवणीमुळे त्यांचा या भागात तसा प्रभाव पडणार नाही. सुभाष सरीन जर उभे राहिले असते तर कदाचित कामगारांमधील ही फूट टळली असती.

शिवसेनेने हवेलीतली जागा लढविण्याचे ठरविले असून माजी नगरसेवक गजानन बाबर हे उभे आहेत. झोपडपट्टीपासून मध्यमवर्गीय कामगारांपर्यंत कार्यकर्ते असलेली शिवसेना या खेपेला मैदानात उतरली आहे. गजानन बाबर यांनी नगरसेवक असताना केलेल्या कामांमुळे त्यांच्याविषयी लोकमत तसे प्रतिकूल नाही. शिवाय पक्षोपपक्षांच्या या रुसव्याफुगव्यात अनेक नाराज गट गजानन बाबरांचे काम करण्याच्या मनस्थितीत आहेत. कामगार क्षेत्रातही शिवसेनेची कामगारसेना जम धरून आहे. झोपडपट्टीतील काँग्रेस आयची मते खेचण्यात शिवसेना यशस्वी ठरेल.

प्रकाश आंबेडकरांच्या रिपब्लिकनपक्षातर्फे सेवा विकास बँकेतील संचालक ओव्हाळ उभे आहेत. गेल्या काही वर्षातील प्रकाश आंबेडकरांचा या भागातील संपर्क पहाता आणि स्वत: ओव्हाळ यांचे दलित समाजातील कार्य लक्षात घेतले तर त्यांना चांगली मते पडतील. दलित समाजातील या उगवत्या नेतृत्वाने लोकसभेच्या निवडणुकीत मुंबई आणि विदर्भातून दोन ठिकाणाहून निवडणूक लढविली. आणि विदर्भात केवळ २० हजारांनी पराभव पत्करावा लागला. त्यांचा प्रभाव या भागातील दलितांवर अधिक असल्याने त्यांची शक्ती दुर्लक्षिण्याजोगी नाही. गवई आणि खोब्रागडे युतीचे पांडुरंग जगताप उभे आहेत. ७८ च्या निवडणुकीत यांना काँग्रेस आयतर्फे तिकिट मिळाले होते. कै. इंदिरा गांधी त्यांच्या प्रचारासाठी आल्या होत्या. लोकसभेच्या वेळेला शरदपवारांचा प्रचार यांनी केला. या निवडणुकीत यांच्यासारखे आणखिन दोन अन्य उमेदवार आहेत.

पिंपरी-चिंचवडच्या या सर्व चित्रामध्ये पिंपरी-चिंचवडचा असा खास म्हणावा असा एकही उमेदवार नाही की जो सर्व भागात सर्वमान्य होईल. त्यामुळे लोकसभेच्या वेळेला महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेणाऱ्या या मतदार संघातील ही निवडणुक अत्यंत नीरस होणार आहे. आणि त्यामुळेच येथील निकाल अनपेक्षित लागण्याची शक्यता आहे.

विधानसभेपाठोपाठ येणाऱ्या महानगर पालिकेच्या निवडणुकीमुळे आज जरी सर्व पक्षात अंतर्गत लाथाळ्या असल्या तरीही सर्वच पक्ष आणि कार्यकर्ते, कुठेना कुठे राहून, पण काम करणार. कारण महानगरपालिकेची ही एक प्रकारे पूर्व तयारीच असेल. त्यामुळे पक्ष संघटनांचा फायदा या ठिकाणी काँग्रेस आय बरोबरच पुलोदलाही होईल !

आज तरी पुलोद आघाडीच्या बाळासाहेब लांडगे यांचे पारडे तुलनेने जड असून आपल्या पैलवानी पेशावर ते अशोक तापकीर यांना चीतपट करतील असे वाटत असले तरी ही लढत वाटते तितकी त्यांना पक्षातील अंतर्गत भांडणांमुळे सोपी जाणार नाही. □

राजधानी दिल्ली

# ' डेसू ' : एक अजब संस्थान

मध्यरात्रीच्या गाढ झोपेतून अचानक जाग आली. काहीतरी वेगळं घडत आहे, हे जाणवले. झोपेमुळे बधीरलेल्या संवेदना एका क्षणात भानावर आल्या. आवाज आणि प्रकाश यांची एकदमच जाणीव झाली. दिल्लीतल्या कडाक्याच्या थंडीमुळे दारे-खिडक्या लावलेल्या होत्या. पण त्यांच्या फटींतूनही दिसत होते, की बाहेर लखलखीत प्रकाश उजळलेला आहे आणि आवाज येत होते दिवाळीतल्या मोठ्या फटाक्यांची सर लावल्यासारखे. धडपडत उठून दार उघडून पाहिले. आमच्या घराजवळचा कोपऱ्यावरचा खांब उभाच्या उभा मशालीसारखा लखलखत होता. फटाक्यासारख्या प्रत्येक स्फोटागणिक त्यातून विद्युत्प्रकाशाचा लोळ बाहेर पडत होता.रात्रीच्या निबिड सन्नाटयामध्ये ते दृश्य विलक्षण थरारक दिसत होते.

ललिता आणि मुलेसुद्धा आपापल्या अंथरुणातून धडपडत बाहेर आली. विजेच्या तारेतून सरकत सरकत आगीचा लोळ केव्हाही घरापर्यंत येण्याची शक्यता होती. पटकन् मेनस्विच बंद करून अंधारातून जिन्यावरून चाचपडत आम्ही सगळे खाली आलो. रस्त्यावर आलो.

ह्या वेळपर्यंत आजूबाजूच्या सगळयाच घरांतले लोक बाहेर पडले होते. धोका सगळयांनाच होता. सर्वजण रस्त्याच्या दुसऱ्या कोपऱ्यावर गोळा होऊन भयचकितपणे खांबाकडे पहात होते. थंडीचा कडाका विलक्षणच होता.सर्वांनीच ड्रेसिंग गाऊन किंवा शाली अगदी अंगाबरोबर लपेटून घेतल्या होत्या, तरी देखील थंडी अंगात शिरशिरी उठवतच होती. आणि समोर खांबावर तो तेजोत्सव धुमधडाक्याने चाललेला. मुले तर थरथरतच जीव मुठीत घेऊन उभी होती. फायर ब्रिगेडला फोन केलेला होताच. त्यांनी गाडी पाठवतो म्हणून सांगितलेच होते; पण प्रत्यक्षात गाडी येईपर्यंत दुसऱ्या कोपऱ्यावरच्या खांबावरदेखील लोड आले आणि तिथेही तारेतून ठिणग्या पडू लागल्या. तेवढयात आगीचा बंब आलाच. त्या भागातली वीज ताबडतोब बंद करण्यात आली. खांबावरचे स्फोट थांबले आणि मग जळत्या खांबावर बंबवाल्यांनी पाण्याचे झोत सोडून आग विझवली. वीज गेलेलीच होती. परत सगळेजण अंधारातून चाचपडत आपापल्या घरी गेले. त्या विलक्षण अनुभवाने थरारलेली मने पुन्हा झोपेत शिरायला लौकर तयार झाली नाहीत.

दुसऱ्या दिवशी तो खांब काढून त्याची दुरुस्ती करून पुन्हा वीज चालू व्हायला दुपार टळून गेली. तोवर दिवे बंद. बॉयलर-गिझर-हीटर ही सर्व बंद आणि ही या खांबाच्या अग्निवर्षावाची पहिलीच वेळ नव्हती. साधारण वर्षापूर्वी त्याच खांबातून सकाळी ८ च्या सुमारास अशाच ठिणग्यांचे लोळ उसळले होते. पण त्याची तीव्रता ह्या वेळेपेक्षा काहीशी कमी होती. आणि वेळ सकाळची असल्यामुळे त्याची भीतिदायकताही कमी होती. तेव्हाही असाच खांब उतरून त्याची दुरुस्ती केलेली होती. तरी एक वर्षभरात पुन्हा हा प्रकार.

दिल्लीच्या विद्युतपुरवठयाची व्यवस्था 'डेसू' ( D. E. S. U. – Delhi Electricity Supply Undertaking ) कडे आहे. दिल्लीमधल्या अनेक 'संस्थानां' पैकी डेसू हे एक संस्थान. दिल्लीतील 'संस्थानां' पैकी कोणते संस्थान लोकांच्या जास्त शिव्या खाते असे एखादे सर्वेक्षण केले, तर त्यात डेसूचा पहिला क्रमांक येण्याची शक्यता जास्त. वेळीअवेळी वीजप्रवाह खंडित करून नागरिकांची त्रेधातिरपिट उडविणे हा डेसूचा एक आवडता छंद असावा. उन्हाळा आणि हिवाळा हे दोन्ही ऋतू दिल्लीमध्ये दरवर्षी मनसोक्त हैदोस घालून जात असल्यामुळे विजेचा प्रवाह ही इथे रात्रीइतकीच दिवसादेखील अत्यावश्यक गरज बनलेली आहे. उन्हाळयात फ्रीज, कूलर, पंखे आणि हिवाळयात रूमहीटर, गिझर, बॉयलर, विजेवरच चालणारे ओव्हन, हॉटप्लेट, इस्त्री, टी. व्ही. यांचा क्रमांक त्यापाठोपाठचा. या सर्व वस्तू म्हणजे इथे केवळ हौशी श्रीमंतांची मिरासदारी नाही. त्या मध्यमवर्गीयांच्या जीवनातही आवश्यक गरजा मानल्या जातात. (आमच्याकडे धुणेभांडी करणाऱ्या मोलकरणीच्या आणि संडास धुणाऱ्या जमादाराच्या घरातही टी. व्ही. आहे. आमच्या मोलकरणीला व्हीडिओ फिल्म पाहण्याचे वेड आहे. केवळ त्यासाठी ती आठवडयातून एकदा कामाला बुट्टी मारते. अचानक लाइट गेला, तर 'जो लोग व्हीडिओ देख रहे होंगे उनका क्या हाल होगा ?' ही तिची पहिली प्रतिक्रिया ) ऐन उन्हाळयात जेव्हा उष्णतामान ४०° सें. च्या आसपास स्थिरावलेले असते आणि घराच्या भिंती रसरसून तापलेल्या असतात तेव्हा वीजप्रवाह खंडित करून लोकांना 'रोस्ट' करण्यात; किंवा ऐन हिवाळयात तपमान ७° सें. वर गारठले असताना आणि थंडी हाडापर्यंत पोचलेली असताना विजेला कोलदांडा मारून लोकांना 'फ्रीझ' करण्यात डेसूला आसुरी आनंद होत असावा. कारण एकदा वीज गेली की चक्क तास-दोन तासही ती पुन्हा परतून येत नाही. गेल्या उन्हाळयात एकदा सलग सहा तास वीज गेलेली होती.

आमच्या भागात एक सिंधी दुकानदार आहे. तो परवा तावातावाने सांगत होता, की 'ब्रिटिशांच्या काळात तीन मिनिटांपेक्षा अधिक काळ वीज जायची असेल, तर त्याप्रमाणे आधी सूचना दिली जायची. आणि आता स्वराज्यात ही तऱ्हा ! आम्ही धंद्यासाठी वीज वापरतो म्हणून घरगुती विजेपेक्षा दुप्पट दर आमच्याकडून वसूल करतात. आणि त्याची परतफेड घरगुती लोकांपेक्षा दुप्पट त्रास आम्हाला देऊन करतात !'

दिल्लीचा विद्युत् पुरवठा इंद्रप्रस्थमध्ये असलेल्या 'थर्मल पॉवर स्टेशन' मधून केला जातो. दोन प्रचंड धुराडयांतून अखंड धुराचे लोट सोडत असलेले हे पॉवर स्टेशन केवळ इंद्रप्रस्थावरच नव्हे तर सर्वत्र दिल्लीवर काळया सूक्ष्म कणांची पखरण करीत असते. याखेरीज हरयाना आणि उत्तर प्रदेशकडूनही दिल्लीला वीज मिळते; पण दिल्लीच्या

वापरासाठी ही वीज अपुरी पडते. त्यातून, अव्याहत चालू असलेल्या चार पॉवर प्लॅंट्स-पैकी एखादे मधूनमधून बंद पडते. त्यामुळे वीजपुरवठा नियंत्रित करावाच लागतो. उन्हाळ्यात रात्रंदिवस कूलर आणि पंखे चालू असल्यामुळे वीजपुरवठ्यावर जास्त ताण पडतो. त्यामुळे दिल्लीच्या वेगवेगळ्या भागात पाळीपाळीने एकेक तास वीजपुरवठा खंडित केला जातो. प्रत्यक्षात मात्र ह्या एका तासाचा परीघ विस्तारत विस्तारत दोन किंवा अडीच तासांना गिळून टाकतो. त्याही-पेक्षा चीड आणणारी गोष्ट म्हणजे वीजपुर-वठ्याच्या कपातीचे जे वेळापत्रक डेसूकडून रोज वर्तमानपत्रांत प्रगट केले जाते, त्याचा आणि प्रत्यक्ष कपातीचा काहीही संबंध नसतो. आपल्या भागाचे नाव त्या कपातीच्या वेळा-पत्रकात नसले तरी आपल्या भागात वीज जाणार नाही, असे त्रिकालज्ञानी ज्योतिषीही खात्रीने सांगू शकत नाही.

विजेच्या वापरावर नियंत्रण रहावे म्हणून इथे दुकाने लौकर बंद होतात. संध्याकाळी सात–साडेसातला मुख्य बाजारपेठातली दुकाने बंद होतात. दिल्लीला आल्यावर या गोष्टीचा आम्हाला सर्वात त्रास व्हायचा. आपल्याकडे आरामात संध्याकाळी चहापोहे वगैरे करून, सारे आटपून संध्याकाळी सात–साडेसातला रमतगमत खरेदीसाठी बाहेर पडायची सवय. त्यामुळे आम्ही खरेदीला गेलो की दिल्लीमध्ये दुकानांची शटर्स लागत असायची. इतकी काटकसरीने वीज वापरूनही लोकांच्या उधळपट्टीच्या सवयी त्यावर मात करतात. घरात लग्न निघाले की, साऱ्या घरावर दिव्यांची रोषणाई रात्रभर झगमगत असते. लग्नसमारंभाच्या मांडवात तर दिवसापेक्षा लखलखीत उजेडाची आरास मांडलेली असते. गिरण्या, छोटे मेकॅनिक, उद्योगधंदे चालवणारे वगैरे लोक अनधिकृतपणे चोरून वीज वापर-तात. त्यामुळे लोड वाढते आणि शॉर्टसर्किटचे प्रकार होतात. दिवाळीत तर फटाक्यांच्या आवाजाला घणघणणाऱ्या आगीच्या बंबाच्या आवाजाची किनार सातत्याने असते आणि या आगीमध्ये फटाक्यांनी लागणाऱ्या आगीपेक्षा शॉर्टसर्किटने लागणाऱ्या आगीचे प्रमाण जास्त असते.

डेसूची बिले हा एक विशेष विनोदाचा प्रकार. अचानक एखाद्या वेळी दुप्पट किंवा तिप्पट बिल येणे म्हणजे खास करमणूक. मध्यंतरी एकदा सरसकट सर्वांना मागील थकबाकी म्हणून ७० ते १४० रु. बिलात जादा आले. लोकांनी तक्रार केल्यावर ते हाताने खोडून बाकीचे पैसे भरायला सांग-ण्यात आले. हा प्रकार सलग तीन–चार बिलांमध्ये चालू होता. पुढे पुढे लोकांना ती सवयच झाली होती की बिल भरायला जाताना आधी अमूक नंबरच्या काऊंटरवर जाऊन ती मागील थकबाकीची रक्कम खोडून घ्यायची आणि मग बिल भरायचे. एकदा आमच्या बिलामध्ये मीटर रीडिंगचा आकडा मागील बिलावरील रीडिंगपेक्षा जास्त न येता कमी आला आणि बिल किमान लाव-लेले. मी चौकशी करायला गेलो, तेव्हा पुन्हा रीडिंग करण्यासाठी ५ रु. भरा आणि तोवर बिल भरू नका असे सांगण्यात आले. त्या-प्रमाणे ५ रु. भरले; पण प्रत्यक्षात पुन्हा रीडिंग करायला माणूसही आला नाही आणि दुसरे बिलही आले नाही. ती चूक पुढच्या बिलातच आपोआप दुरुस्त झाली.

बिले दोनदोन महिन्यांनी येतात. लाईट आणि पॉवर अशी दोन मीटर्स प्रत्येक घरात असली, तरी घरगुती वापरासाठी दोन्हीचे दर सारखेच आहेत. इथले सिंधी–पंजाबी घरमालक अत्यंत हुषार आणि व्यवहारकुशल (यालाच साध्या भाषेत लबाड आणि बदमाश म्हणतात) असल्यामुळे घरमालकाकडे फ्रीज, ओव्हन, हॉटप्लेट, गिझर, केटल, मिक्सर, बूस्टर आणि टी. व्ही. इतके विजेवर चालणारे उपकरणांचे भांडार असले तरी फक्त टी. व्ही., फ्रीज आणि गिझर असणाऱ्या भाडेकरूंपेक्षा घरमालकाचे विजेचे बिल कमी येते ! सगळे इंटर्नल वायरिंग असल्यामुळे आणि मीटर्सचे नियंत्रण घरमालकाच्या हातात असल्याने कुठली वायर कुठून कुठे जोडलेली आहे हे बिचाऱ्या भाडेकरूला कधीच कळत नाही. आपण उन्हाळ्याच्या सुट्टीत दीडदोन महिने 'गावाकडे' गेलेलो असलो, तरी त्या काळा-तले विजेचे बिल नेहमीप्रमाणेच येते. बिचारा भाडेकरू 'आपण भाडेच जास्त समजूया' अशी स्वतःची समजूत घालून घेतो.

कार्यक्षमता आणि डेसू यांची संपूर्ण फार-कत आहे, अशातला भाग नाही. रोज विजेच्या पुरवठ्यात हाहाःकार उडविण्या-बद्दल प्रसिद्ध असलेल्या डेसूनेच संपूर्ण आशि-याई क्रीडास्पर्धांच्या काळात पंधरा दिवसात एक मिनिटभरदेखील वीजपुरवठा खंडित न करण्याचा चमत्कार करून दाखवला होता. तेसुद्धा कित्येक हजार पॉवरचे फ्लडलाइट्स जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर रोज उजळ-लेले असताना ! तेव्हा, कार्यक्षम कारभार करण्याची क्षमता डेसूपाशी आहे; पण तशी इच्छा नाही, पर्वा नाही, असे म्हटल्यास त्यात वावगे काहीच म्हणता येणार नाही.

राजीव गांधींच्या नव्या शासनाने कार्य-क्षमता आणण्यासाठी लोकांच्या मनात आशा उभ्या केलेल्या आहेत. त्या खऱ्या आहेत की फुसक्या आहेत, हे पाहण्यासाठी डेसू हा एक मानदंड मानायला हरकत नाही. 'एवढे यश तुला राग !' असे डेसूला म्हणावे.

घोडामैदान लांब नाही.

तोवर आम्ही मात्र आमच्या घराजवळच्या खांबाकडे येता जाता भयशंकित नजरेने पहात राहणार.

–निशिकांत मिरजकर

# एक संध्याकाळ खासदारांच्या समवेत

लोकसभेच्या निवडणुका होऊन नुकताच महिना झाला. घवघवीत यश कॉंग्रेस आयच्या पदरी पडले. कुणी इंदिरा गांधींच्या हत्येची हळहळ व्यक्त करणारी सहानुभूती म्हणून, कुणी स्थिर सरकार असावे म्हणून, कुणी राजीवच्या व्यक्तिमत्त्वाला भुलून कॉंग्रेस आयला मते दिली. अर्थात एवढ्या प्रचंड बहुमताने कॉंग्रेस आय निवडून येईल असे मात्र कुणाला वाटले नव्हते. म्हणूनच नंतर 'कॉंग्रेस आयचे सरकार असावे; परंतु त्यावर अंकुश ठेवणारे विरोधी पक्षही लोक-सभेत अधिक प्रमाणात असायला हवे होते' असे म्हणणारे लोकही सामान्य थरातूनही आढळून येत होते. काही असले तरी निका-लाची आतषबाजी डोळे दिपवून टाकणारी होती. दिवाळी संपली तरी तिची हवा जशी पुढेही काही काळ रेंगाळत राहते, तशी निवडणुकीनंतरची धुंदी अजून ओसरली नाही. यंदाच्या निवडणुकीत इंदिरा गांधी

नसल्या तरी राजीव गांधी पंतप्रधान असण्याच्या कारकिर्दीची सुरुवात असल्यामुळे सर्वत्र उमेदीच्या वातावरणाची हवा वाहती आहे.

या उन्मेषी वातावरणाची झलक २५ जानेवारीस नूतन मराठी विद्यालयाच्या प्रांगणात पहावयास मिळाली. दिल्ली महाराष्ट्रीय शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थेने सर्व मराठी संस्थांच्या वतीने, महाराष्ट्र राज्यातून निवडून आलेल्या सर्व उमेदवारांच्या संमेलनाचा आणि स्वागताचा समारंभ घडवून आणला होता. संमेलनात सहभागी होण्यासाठी दिल्लीतील मराठी मंडळींना आवर्जून निमंत्रण दिले गेले होते.

नूतन मराठी विद्यालयाच्या प्रांगणात शुभ्र कनातींचा भव्य मडप घालण्यात आला होता. कार्यक्रम संध्याकाळी साडेसहा वाजता होता. हवेत चांगलाच गारठा होता. तथापि निवडून आलेल्या खासदारांना निवडणुकीतील यशाची भरपूर ऊब वाटत असावी. अनेक खासदार झब्बापायजाम्यातच आलेले होते. अध्यक्षपदी श्री. वि. न. गाडगीळ होते. पंधरा–वीस मिनिटांतच मंडप मराठी मंडळींनी भरून गेला. निवडून आलेले उमेदवार पुढच्या खुर्च्यांवर स्थानापन्न झाले. प्रवेशद्वारापासून मांडवापर्यंत पोलिस बंदोबस्त होता. श्री. गाळगीळांनी सूत्रे हाती घेऊन कार्यक्रमला सुरुवात केली.

प्रथम महाराष्ट्रीय सांस्कृतिक समितीचे कार्याध्यक्ष या नात्याने श्री. गाडगिळांनी सर्व उमेदवारांचे स्वागत केले. दिल्लीतील सर्व मराठी संस्थांची नावे त्यांनी वाचून दाखविली. वनिता समाजाच्या अध्यक्ष सौ. राजे यांनी मराठी संस्थांची ओळख करून दिली आणि त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. महाराष्ट्रातून निवडून आलेल्या सर्व लोकसभा सदस्यांनी या मराठी संस्थांच्या कार्यात रस घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त करून सरकारी पातळीवर सवलतीच्या दरात मराठी चित्रपट, नाटके व इतर प्रसिद्ध कार्यक्रम दिल्लीकर महाराष्ट्रीयांना उपलब्ध करून देण्यास त्यांनी मदत करावी अशी त्यांनी विनंती केली.

महाराष्ट्रीय सांस्कृतिक समितीचे कार्यवाह श्री. टिकेकर यांनी आणखी दोन मराठी संस्थांची नावे सांगितली. यापैकी दिल्ली महाराष्ट्रीय हाउसिंग सोसायटीने शंभर फ्लॅटस् बांधून तयार केले आणि जमुनापार असलेल्या रिक्षा पुलर्सचीही एक संस्था असून ते गणेशोत्सव साजरा करतात, अशी अधिक माहिती सांगितली.

श्री. गाडगीळांनी आपल्या यादीत या दोन संस्थांची नावे सांगण्याची राहून गेल्याची शक्यता कबूल करून एक मजेशीर गोष्ट सांगितली. ते म्हणाले की, 'दोन बंगाली जेव्हा एकत्र येतात तेव्हा एखादा कट होतो. दोन गुजराती लोक एकत्र येतात तेव्हा शेअर बाजाराची बोलणी पक्की करतात. दोन साउथ इंडियन्स एकत्र येतात तेव्हा एक सरकारी खाते तयार होते आणि महाराष्ट्रीय लोक एकत्र आले की त्यातून चार संस्था तयार होतात. दिल्लीतही मराठी संस्था अनेक आहेत तेव्हा त्यांपैकी काहींची नावे सांगायची राहिली असतील हे नाकारता येणार नाही.'

कऱ्हाडच्या प्रेमलाबाई चव्हाण, बीडच्या केसरबाई क्षीरसागर, सोलापूरचे गंगाधर कुचल, अरविंद कांबळे, ठाण्याचे शांताराम घोलप, सातान्याचे प्रतापराव भोसले, कोल्हापूरचे उदयसिंगराव गायकवाड, हिंगोलीचे उत्तमराव राठोड, चंद्रपूरचे पी. शांताराम, भंडाऱ्याचे केशवराव पारधी, धुळयाचे भोत्रे, मुंबईचे अनुपचंद शहा या सर्व उपस्थित खासदारांचे निरनिराळ्या मराठी संस्थांतर्फे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सर्व खासदारांच्यावतीने कऱ्हाडच्या श्रीमती प्रेमलाबाई चव्हाण यांनी भाषण केले. 'दिल्लीतील नया बाजारची मराठी संस्था सर्वात जुनी संस्था आहे. काकासाहेबांचे नेतृत्व हे या मराठी संस्थांच्या कार्यशीलतेला कारणीभूत होते' असे गौरवोद्‌गार त्यांनी काढले.

मराठा मित्रमंडळ या संस्थेचे माजी अध्यक्ष श्री. गर्गे यांनी आभार मानून सर्वांना चहापानासाठी आवाहन केले.

मंडपाच्या एका भागात चहापानाची खास व्यवस्था केली होती. अनेक प्रकारची भजी, पेढे, बिस्किटे आणि चहा यांचा भरगच्च कार्यक्रम होता. चहापानाचा आस्वाद घेत मंडळी एकमेकांना भेटत होती. सर्व खासदारही दिल्लीकर मराठी मंडळींना आनंदाने भेटत होते. मराठी मंडळीही आपले मूळ ठिकाण, गाव एकमेकांना सांगून ओळख करून देत होते. 'आमचे मूळ ठिकाण कोल्हापूर' अशी आम्ही उदयसिंगराव गायकवाडांना ओळख करून देताच त्यांनीही मोठ्या आनंदाने आम्हाला तिकडे आल्यास घरी येण्याचे अनौपचारिक आमंत्रण दिले. शासक आणि प्रजा एकाच पातळीवर वावरत होती. खेळीमेळीचे, एकोप्याचे, आपण सर्व मराठी असल्याचे... एकरूपतेचे वातावरण फार सुरेख वाटत होते. लोकसभेच्या खुर्च्यांत बसून प्रजेचे शासन करणारे हे खासदार वेगळे आणि आपण वेगळे असा भाव या वातावरणात उरला नव्हता. हे सर्व खासदार आपल्यातलेच आहेत, जनतेने निवडून दिलेले आहेत, प्रजासत्ताक भारताचे ते प्रतिनिधी आहेत असा एकरुपतेचा भाव सर्वत्र भरून राहिला होता. श्री. गाडगीळ स्वतः यजमानांच्या आगत्याने सर्वांशी बोलत होते, वावरत होते. शासक आणि जनता यांचा एक सुंदर समभाव या ठिकाणी घडवून आणला होता. या-दृष्टीने या कार्यक्रमाचे मला फार महत्त्व वाटले. दुसऱ्या दिवशी श्री. गाडगीळांच्या निवासस्थानी 'ग्रंथाली' तर्फे घडवून आणलेल्या एका नाट्यवाचनाने तर ही जवळीक, हा अनौपचारिकपणा आणखीनच दृढ झाला.

अर्थात दिल्लीसारख्या महाराष्ट्रापासून दूर असलेल्या मर्यादित मराठी लोकांच्या ठिकाणी असे कार्यक्रम घडवून आणणे शक्य होते. तरीही महाराष्ट्रातही या खासदारांनी असे अनेक कार्यक्रम घडवून लोकसंपर्क सतत साधला तर हे लोकप्रतिनिधी खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी असल्याची लोकांना जाणीव होईल. प्रजासत्ताक खऱ्या अर्थाने नांदू लागेल असे वाटते. निवडून दिलेले नेते हे दूर राजधानीत जाऊन बसलेत असे न वाटता ते आपल्यासाठी दिल्लीला जाऊन काही कार्य करीत आहेत, असा विश्वास लोकांना वाटायला हवा, अशी अपेक्षा आहे विरोधी पक्षाच्या खासदारांच्या उपस्थितीचा अभाव मात्र प्रकर्षाने जाणवला. त्यांना निमंत्रणच नव्हते की, ते अन्य कारणाने येऊ शकले नाहीत, हे काही समजू शकले नाही.

—ललिता मिरजकर

# द्रव्ययोगी

● डॉ. प्र. ग. बापट ●



सॅम्युएल कर्युमिंग्ज हा जगातील खाजगी शस्त्र-विक्रेत्यांपैकी सर्वात श्रीमंत व्यापारी आहे, असे मानण्यास हरकत नाही; पण तो आज जसा आहे तशा आकाशातून अकस्मात टपकला नाही. बापाच्या धनाचा वारसाही त्याला मिळाला नाही. त्याने कायदे मोडून दरोडेखोरी केली नाही किंवा काळाबाजारही केला नाही. आक्रमक प्रादेशिक राष्ट्रवादासाठी मानवांची हिंसा करण्याचा प्रारंभ युरोपने केला. १९ व्या शतकात प्रारंभ झालेल्या राष्ट्रीय भौतिक स्वार्थाच्या स्पर्धेच्या ऐतिहासिक प्रक्रियेच्या फलिताचे विसाव्या शतकातील रूप म्हणजे सॅम्युएल कर्युमिंग्ज... सॅम्युएल कर्युमिंग्जची कथा म्हणजे विसाव्या शतकात—गेल्या पंचवीस वर्षांत शस्त्रांचा व्यापार कसा वाढला याची कथा...

दुसऱ्या महायुद्धामधील विनाशामुळे सारे जग हादरले होते. खरे म्हणजे त्यामुळे शांततेच्या दिशेने जगाची ठोस पावले पडावयास हवी होती. मृत्यूच्या आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्यांची संख्या कमी व्हावयास हवी होती. नवजात स्वतंत्र राष्ट्रांनी आपली शक्ती राष्ट्रनिर्मितीच्या विधायक कार्यात खर्च करावयास हवी होती. प्रमाणासंबंधीची संवेदनक्षमता (Sense of proportion) अधिक तीव्र व्हावयास हवी होती; पण आश्चर्य म्हणजे नेमके उलटे घडले. शस्त्रे विकणाऱ्यांची संख्या वाढली. नवजात राष्ट्रांची शस्त्रांची भूक वाढली. प्रमाणासंबंधीची संवेदनक्षमता अधिक बोथट झाली. परिणामत: आता राज्येच शस्त्रांची निर्मिती करू लागली व विक्रीदेखील खाजगी शस्त्र विक्रेते होतेच; पण त्यातही वाढ झाली. दुसऱ्या महायुद्धापूर्वी खाजगी व्यापारीच स्वार्थी, राष्ट्रनिष्ठाहीन, द्रव्ययोगी होते; पण आता राष्ट्रांची शासनेच राष्ट्रनिष्ठेचे नावाने स्वार्थी, निष्ठाहीन द्रव्ययोगी बनली.

## विपरीत बदल

दुसऱ्या महायुद्धानंतर जगाला शांततेची तहान लागली व सर्वच मुत्सद्दी, राजकारणी व नेते हे संत महंत व महात्म्याप्रमाणे जागतिक शांततेच्या प्रस्थापनेसाठी अथक प्रयत्न करू लागले असे आपण वाचतो. दुसऱ्या महायुद्धानंतर बहुतांश वसाहती स्वतंत्र झाल्या. नवीन स्वतंत्र राष्ट्रे उदयास आली. राजकीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर या नवीन राष्ट्रांनी सामाजिक व आर्थिक समतेसाठी बद्धपरिकर व्हावयास हवे होते. खरं म्हणजे तसे वचन त्यांनी सामान्य जनतेला दिले होते; पण तसे घडले नाही. खेळातील कच्चे लिंबू जेव्हा इतर खेळाडूंशी समान स्थानासाठी भांडते तेव्हा खेळातील अन्यायाधिष्ठित नियम बदलण्याची प्रतिज्ञा करते. प्रत्यक्षात बरोबरीचे स्थान प्राप्त होताच, तेही खेळाचे प्रस्थापित नियमाने बद्ध होते. पददलीत व शोषित वर्ग जेव्हा शोषकवर्गाचे विरोधात संघर्ष करतो तेव्हा त्याचा खरा संघर्ष शोषकवर्गाचे मूल्यांशी असतो; पण जेव्हा शोषितवर्गाला शोषकवर्गात स्थान मिळते, तेव्हा तो त्याच मूल्यांचा स्वीकार करतो. नवजात स्वतंत्र राष्ट्रामधील जनता किती सुखी झाली ही बाब विवादास्पद असली तरी मृत्यूच्या आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्यांचे गिऱ्हाईकांत वाढ झाली, हे निर्विवाद सत्य आहे.

ज्या युद्धांचे स्वरूप, काळ व तीव्रता लक्षणीय मानावी लागेल, अशी दुसऱ्या महायुद्धानंतर कमीत कमी ६० युद्धे झाली. रक्तरंजित क्रांत्या, मोठ्या प्रमाणावरील दंगली, असंघटीत संघर्ष व लहानसहान सशस्त्र संघर्ष तसेच राजकीय खून झाले ते वेगळेच. दुधाने ओठ पोळल्यावर आपण ताकही फुकून पितो. त्यामुळे कोरियाचे युद्धात जेवढ्या वजनाचे बाँब वापरण्यात आले ते दुसऱ्या महायुद्धात दोस्तराष्ट्रांनी पॅसिफिक क्षेत्रात टाकलेल्या बाँबपेक्षा जास्त वजनाचे होते

ही बाब चिंतेची मानली जायला हवी होती; पण विनाशाचा निकष जग व्यापणारे, ६ वर्षे चाललेले नागासाकी आणि हिरोशिमा परमाणु अस्त्राने उध्वस्त व बेचिराख करणारे, दुसरे महायुद्ध बनले. त्यामुळे विनाशासंबंधीची मानव जातीची संवेदनक्षमता बोथट बनली. १९६७ च्या षडदिनीय सिनाईयुद्धात जेवढे टँक्स वापरले त्यांची संख्या, १९४२ च्या द्वादशीय अलअमीन (El Alamein) युद्धात दोन्ही बाजूंनी वापरलेल्या टँक्सपेक्षा जास्त होती, याचेही आपणास काहीच वाटत नाही.

१९४५ च्या युनो, युनेस्को व निशस्त्रीकरण परिषदा यामधील बड्या राष्ट्रांच्या मुत्सद्द्यांची भाषणे वाचली तर वाटते की भगवान येशू, महावीर यांचेच रूपाने ते पृथ्वीतलावर वावरत आहेत. मृत्यूचे आंतरराष्ट्रीय व्यापारी दिवाभीताप्रमाणे तोंड लपवून बसले असतील; पण अहो आश्चर्यम् ! हातात अहिंसेची जपमाळ, हृदयात शांततेची तहान व मुखाने सत्याचे गोडवे गाणारी ही बडी राष्ट्रेच आता शस्त्रविक्रीचा व्यवसाय करीत आहेत. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, पश्चिम जर्मनी, इस्त्रायल ही भांडवलशाही राष्ट्रे शस्त्रे विकतातच; पण स्वीडन, स्वित्झलंड सारखी तटस्थ राष्ट्रेही शस्त्रे विकतात. थांबा, ही यादी संपली नाही. सोव्हियट युनियन, साम्यवादी चीन, झेकोस्लोव्हाकिया, ही साम्यवादी राष्ट्रेही शस्त्रे विकतात. मग बेल्जियम, इटाली, कॅनडा या राष्ट्रांनी का विकू नयेत ? तीही शस्त्रे विकतात.

## मृत्यूच्या आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्यांचे प्रकार

बारा मल्हार नावाच्या अरण्यात् मच्छिंद्रनाथांनी वेताळ व त्याच्या भुतावळीचा पराभव केल्याचे वाचल्यावर, प्रश्न पडतो की वेताळाने भुतावळ निर्माण केली की भुतावळीतून वेताळ निर्माण झाला की हे सर्व काल्पनिक आहे. शस्त्र निर्माण करणारे कारखानदार, त्यांचे अधिकृत विक्रेते, शस्त्र विक्रेते खाजगी गुन्हेगारीस्वरूपाचे शस्त्र विक्रेते हस्तलाघवी शस्त्रविक्रेते (munitions manipulators), बंदूक पळवे (Gun runners), नकली शस्त्रांचे विक्रेते प्रथम होतेच. १९४५ नंतन काही शासनेच शस्त्रांची विक्री करू लागली.

१) इंटरआर्म्स : इंटरनॅशनल आरमामेंट कॉरपोरेशन, ही शस्त्रांची विक्री करणारी खाजगी कंपनी होय. १९ व्या शतकातील शस्त्रविक्रेत्यांचे नमुनेदार उदाहरण म्हणजे झाहारोफ तर २० व्या शतकातील नमुनेदार उदाहरण म्हणजे सॅम्युऐल क्युमिंग्ज ( Samuel Commings) होय.

व्हर्जिनिया घटक राज्यातील अलेक्झांड्रिया येथे इंटरआर्म्सची दहा गोदामे आहेत. त्यांचे एकूण चटई क्षेत्रफळ १ लक्ष चौरसफूट असून त्यात एकावेळी ५ ते ६ लक्ष स्मॉल कॅलीबरची शस्त्रे साठविली जाऊ शकतात. याशिवाय लंडनच्या उपनगरात, अॅक्टन ( Acton ) येथे कंपनीचे आणखी एक गोदाम आहे. त्यांत दीडलक्ष ते दोनलक्ष स्मॉल कॅलीबरीची शस्त्रे साठविण्याइतकी क्षमता आहे. या गोदामात विविध प्रकारची शस्त्रास्त्रे साठविली जातात. इंग्रज बनावटीची ली-एन्फील्डस् ( Lee-Enfields ) जर्मनीची मौसर ( Mauser ) रायफल्स, इटालीयन मन्लीचर-कॅरकानॉस ( Mannlicher-Carcanos ), रशियन टोकारेव्हज (Tokarevs) व मॉसिन-नागान्टस (Mosin-Nagants), अमेरिकन १९०३ स्प्रिंगफिल्डस (American 1903 Springfields) व एम-१ कारबाईन्स तसेच विविध कंपन्यांची नानाविध रायफल्स, स्वयंचलित पिस्तुले, रिव्हॉल्व्हर्स या गोदामांत तर असतातच; पण त्याच्या जोडीला लक्षावधी काडतुसे गच्च भरून ठेवलेली असतात.

याशिवाय वेळप्रसंगी ग्रेनेडस् ( Grenades ), आरटिलरी शेल्स ( Artillery Shells ) आणि बाझोको राऊंडस ( Bazooka rounds ) देखील तेथे ठेवली गेली आहेत. या गोदामांत काय नसते हाच खरा प्रश्न आहे. मॉटर्स ( Mortars ), सबमशिनगन्स ( Submachine-guns ), बाझोको ( bazookas ) तलवारी, तेगा, बायोनेटस्, इतकेच काय पण भाले देखील असतात. बंदुकीच्या गोळ्या प्रामुख्याने दोन प्रकारच्या असतात. लष्करात वापरण्याच्या गोळ्या व हौशी शिकारी वापरतात त्या गोळ्या हे दोन प्रकार होत. नऊ वेगवेगळ्या कॅलीबरच्या लष्करी गोळ्यांचे रूपांतर शिकारी गोळ्यामध्ये करता यावे, यासाठी अमेरिकेतील अलेक्झांड्रीया येथील गोदामात एक यंत्र आहे. एका तासात ८००० गोळ्यांचे रूपांतर करणाऱ्या या यंत्राची किंमत फक्त ६५,००० डॉलर्स आहे.

साम्यवादी राष्ट्रे वगळता बहुतेक सर्व राष्ट्रातून इंटरआर्म्सच्या शाखा तरी आहेत किंवा प्रतिनिधी. हे सर्व कर्तृत्व खऱ्या अर्थाने सॅम्युएल क्युमिंग्जचे आहे. इंटरआर्म्सचा संस्थापक, अध्यक्ष व मालक सॅम्युएल क्युमिंग्ज होय. आज साठीच्या घरात असलेल्या या व्यक्तीने सुमारे १९५४ मध्ये या व्यवसायात पदार्पण केले. लष्करी शस्त्रांचा अतिरिक्त साठा जेथे विक्रीसाठी असेल तेथून विकत घ्यायचा व ज्याला हवा असेल त्याला विकायचा; हा त्याचा व्यवसाय होय. त्याचप्रमाणे अमेरिका व कॅनडा देशातील नागरिकांना शिकारीसाठी म्हणजेच हौशीसाठी शस्त्रे हवी असतात. ही त्याची दोन गिऱ्हाईके होत. हौशी नागरिक हे त्याचे फार मोठे गिऱ्हाईक होते; पण १९६८ च्या गन कंट्रोल अॅक्टने त्याला धक्का बसला. याशिवाय क्रेता आणि विक्रेता अशा दोन देशामध्ये क्युमिंग्ज मध्यस्थाची भूमिकाही बजावतो. जर संधी मिळाली तर एखाद्या देशाला तो अद्ययावत नवी शस्त्रेही विकायला तयार असतो. थोडक्यात साम्यवादी रशियाच्या प्रभाव क्षेत्राबाहेरील शस्त्र खरेदी-विक्रीच्या व्यवसायातील हा जानामाना दादा आहे.

## सॅम्युएल क्युमिंग्ज

सॅम्युएल क्युमिंग्ज हा जगातील खाजगी शस्त्र विक्रेत्यापैकी सर्वात श्रीमंत व्यापारी आहे असे मानण्यास हरकत नाही; पण तो आज जसा आहे तसा आकाशातून अकस्मात टपकला नाही. बापाच्या धनाचा वारसाही त्याला मिळाला नाही. त्याने कायदे मोडून दरोडेखोरी केली नाही किंवा काळाबाजारही केला नाही. आक्रमक प्रादेशिक राष्ट्रवादासाठी मानवांची हिंसा करण्यासाठी प्रारंभ युरोपने केला. राजेशाहीचे जागी हुकूमशाही, लोकशाही राज्ये निर्माण झाली. भांडवलशाहीतून साम्राज्यवाद जन्माला आला व त्याच्या विरोधात लोकशाही समाजवाद व साम्यवाद. परंतु सोळा सोमवारच्या कहाण्यांप्रमाणेच येथे प्रादेशिक राष्ट्रवादांचा घेतलेला वसा कोणीही

टाकला नाही. मग युरोपचे अनुकरण करणाऱ्या अमेरिका, आफ्रिका, आशिया खंडातील राष्ट्रांनाही तो कसा टाकता येणार ? या राष्ट्रांची तत्त्वज्ञाने भिन्न आहेत. कोणाचे साम्यवाद तर, कोणाचे लोकशाही समाजवाद. कोणी हुकूमशाहीचे नावाने मळवट भरला आहे तर कोणी लोकशाहीचे वाण घेतले आहे; पण या सर्वच राष्ट्रांचे भौतिक अधिष्ठान आहे 'स्व' चे गोंडस रूप म्हणजेच राष्ट्राचा भौतिक स्वार्थ व त्या भौतिक अधिष्ठानाचे चाकांना जर मानवी रुधिराचे वंगण नसेल. तर ती चाके ठप्प होणार. १९ व्या शतकात प्रारंभ झालेल्या राष्ट्रीय भौतिक स्वार्थाच्या स्पर्धेच्या ऐतिहासिक प्रक्रियेच्या फलीताचे. विसाव्या शतकातील लघुप्रमाणावरील रूप म्हणजे सॅम्युएल क्युमिंग्ज त्यामुळेच सॅम्युएल क्युमिंग्जची कथा म्हणजे विसाव्या शतकात गेल्या पंचवीस वर्षांत शस्त्रांचा व्यापार का व कसा वाढला याचे ज्ञान होय.

## इंटरआर्म्सच्या जन्मापूर्वी

सॅम्युएलचा जन्म १९२७ मध्ये फिलाडेल्फिया येथे मेन लाइन ( Main Line ) कुटुंबात झाला. त्यावेळी घरात श्रीमंती होती. वयाच्या पाचव्या वर्षी त्यास जर्मन मॅक्झिम बंदूक बक्षीस मिळाली. हा त्याच्याशी खूप खेळला. त्या वयाला योग्य अशा उत्सुकतेपोटी त्या बंदुकीचे सर्व भाग अलग करणे, त्यांची पुन्हा जुळणी करणे यात तो बराच वेळ घालवी. पहिल्या महायुद्धानंतर जागतिक बाजारपेठेत मंदीची लाट आली. अमेरिका हे राष्ट्रही त्यातून सुटले नव्हते. अनेक बँकांना दिवाळखोरी जाहीर करावी लागली. अनेक उद्योगधंदे बसले. तेथे क्युमिंग्जचे वडील किस झाड की पत्ती. स्टॉक मार्केटमध्ये व्यवसाय करणारे वडील लक्षाधीशाचे भिक्षाधीश झाले. एका विजेचा पुरवठा करणाऱ्या कंपनीचे मॅनेजर म्हणून ते नोकरी करू लागले. क्युमिंग्जच्या वयाच्या आठव्या वर्षी ते वारले.त्यामुळे त्याच्या आईला नोकरी करावी लागली.

क्युमिंग्जला लष्करीसेवेत दुसऱ्या महायुद्धाचे शेवटी शेवटी जावे लागले. लष्कराने त्याला मुक्त केले तेव्हा तो सार्जंट होता; पण तो हत्यारासंबंधीचे ज्ञानात परीपूर्ण असल्याने, लष्करात असताना तो हत्यार प्रशिक्षक (instructor) म्हणून काम करीत होता. फोर्टली येथे या पदावर काम करीत असतानाच, हत्यारांच्या व्यवसायात खूप फायदा होऊ शकतो हे त्याच्या ध्यानी आले होते.

युरोपमधील रणभूमीवर लक्षावधी शस्त्रे इतस्तत: विखरून पडली होती. प्राजक्ताच्या झाडाला गदागदा हलवून फुलांचा सडा पाडावा तशी. अचानक श्रावण सरींनी ही फुले मातीमोल होतात. रणभूमीवरील शस्त्रांची तशीच स्थिती झाली होती. युरोपातला हा टाकावू लष्करी माल बोटींनी भरभरून अमेरिकेत येत होता व रिचमांडच्या टाकाऊ मालाच्या गोदामात कोंबला जात होता. लष्करातून मुक्त होताच क्युमिंग्जने शस्त्रविक्रीच्या उद्योगास अल्पारंभ केला तो हेल्मेटस् विकून. क्युमिंग्ज ती जर्मन हेल्मेटस् ५० सेंटला एक या भावाने विकत घेई. ही हेल्मेटस् तो अॅबरडीन येथे ४ डॉलरला एक या दराने विकी. आपल्या मोटारीत तो ही हेल्मेटस् गच्च भरी. त्यांचे वजन इतके होई की एका फेरीत त्याच्या मोटारीचे एक टायर निकामी होई. त्याच्या वहातुक खर्चात पेट्रोलच्या किंमती व्यतिरिक्त फक्त एका टायरच्या किमतीने वाढ होई.

पुढे त्याने जॉर्ज वॉशिंग्टन विद्यापीठात नाव नोंदविले. त्यावेळी देखील तो जुन्या बंदुका विकत घेई व आपल्या सहाध्यायांना जास्तीचे भावाने विकी. 'गरीबांसाठी युरोपचा दौरा' या योजनेत त्याने १९४८ मध्ये युरोपचा दौरा केला. फ्रान्समधून प्रवास करताना त्याचे डोळेच फाटले. रस्त्यांच्या लगत फेकून दिलेली हजारो शस्त्रे त्याला दिसत. फेलेसीगॅप (Falaise Gap) येथे दहा जर्मन डिव्हिजन्सना दोस्तांनी युद्धकाळात पकडीत पकडून त्यांची कोंडी केली होती. तेथे तर भूमीवर रायफल्स व मशीनगन्स देखील विखरून पडल्या होत्या. पण क्युमिंग्जजवळ त्यावेळी एवढा पैसा नव्हता. परत आल्यावर १९४९ मध्ये त्याने पदवी मिळविली.

फ्रान्सच्या रणभूमीवर धूळ खात पडलेली शस्त्रे विकत घेण्यासाठी वेस्टर्न आर्म्स कॉरपोरेशनने त्यास प्रतिनिधी नेमावे, यासाठी त्याने प्रयत्न सुरू केले; पण एवढ्यात कोरियन युद्ध सुरू झाले. त्यास सी. आय. ए. (Central Intellijence Agency) ने शस्त्र निरीक्षक म्हणून बोलावले. उत्तर कोरियन सैनिकाकडून मिळविलेली शस्त्रे मुळची रशियन होती यात नवल नव्हते. १८ महिन्यानंतर त्यास वेस्टर्न आर्म्सने प्रतिनिधी म्हणून नेमले. त्याला कॉरपोरेशन सालीना ५६०० डॉलर्स पगार व तो जो माल विकेल त्याच्या १% लाभामधील १/८ कमिशन देणार होते.

## वेस्टर्न आर्म्सची कुळकथा

अमेरिकन शासनाने १९४५ मध्ये ओ. एस. एस. (Office of Strategic Services) ही गुप्तहेर संस्था विसर्जित केली. सी. आय. ए. चा जन्म मे १९४७ मध्ये झाला. या वीस महिन्याच्या काळात स्टेट डिपार्टमेंटच्या संलग्न शाखेच्या रिसर्च अॅन्ड अनलिसिस ब्रँचच्या (Research and Analysis Branch) समोर दोन समस्या उभ्या होत्या. सामान्य जनतेला माहीत नाही अशा विविध युद्धक्षेत्रावर जी लक्षावधी हत्यारे विखुरलेल्या अवस्थेत पडून आहेत त्यावर लक्ष ठेवणे व अमेरिकेच्या दृष्टीने अवांच्छनीय अशांच्या हाती ती पडू नयेत ही त्यापैकी एक समस्या होती. ती शस्त्रे अमेरिकेत आणून त्यांची विल्हेवाट लावणे हा एक मार्ग त्यासाठी होता.

दुसरी समस्या होती मागोवा न लागणारी शस्त्रे (Untraceable weapons) भरपूर प्रमाणात मिळविण्याची. शस्त्र विक्रीच्या धंद्यात अशा शस्त्रांना स्वच्छ (Clean) किंवा निर्जंतुक (Sterile) शस्त्रे म्हणतात. जसा माणसाच्या बोटांचा ठसा हा एकमेवाद्वितीयम् असतो, त्याचप्रमाणे शस्त्राची बनावट व त्यावरील क्रमांक, यावरून ते शस्त्रे कोठे तयार झाले, ते कोणी कोणाला केव्हा विकले हे कळू शकते; पण ज्याप्रमाणे वाळवंटात वादळ झाल्यानंतर पूर्वीचे ठसे नाहीसे होतात, त्याप्रमाणेच काही वेळा शस्त्राच्या प्रवासात, त्याचा मागोवा नष्ट होतो. वाळवंटात जशी नदी गुप्त होते अगदी तसे घडते. अमेरिकेच्या दृष्टीने परदेशी बनावटीची, त्याच्या क्रमांकावरील आस्तित्त्वासह असलेली अशी शस्त्रे,जी त्या खुणांसह अमेरिकेजवळ आहेत व अमेरिकेने ती दुसऱ्यांना विकल्यावर देखील, त्यावरील जंतु अमेरिकन हे सिद्ध होत नाही, अशी शस्त्रे स्वच्छ म्हणजेच निर्जंतुक होत. अशा शस्त्रांची गरजच काय असते, हा प्रश्न विचारणे भाबडेपणाचे आहे. उदाहरणार्थ अमेरिकेच्या मित्र राष्ट्राला शस्त्रांची गरज आहे. अमेरिका देखील मित्र राष्ट्राला शस्त्रे पुरवू

इच्छिते; पण ती शस्त्रे ज्या कार्यासाठी वापरायची ते कार्य अमेरिकेच्या किंवा त्याच्या मित्रराष्ट्राच्या मदतीने झाले, हे दोघांनाही लपवावयाचे आहे. शस्त्रे तर द्यावयाची पण ती आपली नाहीत, आपण दिली नाहीत असा विश्वामित्री आव ही जेव्हा आणावयाचा असतो तेव्हा त्यावर अमेरिकन जंतु नसावा म्हणजे ती शस्त्रे अमेरिकेच्या दृष्टीने स्वच्छ किंवा निर्जंतुक असणे आवश्यक असते. प्रत्येक राष्ट्रालाच अशी शस्त्रे हवी असतात पण कोणीच कबुल करीत नाही. अमेरिकेच्या शासनासमोर अशी शस्त्रे मिळवणे ही दुसरी समस्या होती. लोक मानतात ते सर्वच खरे नसते; पण प्रवाद असा की वेस्टर्न आर्म्स व विनफिल्ड आर्म्स या कंपन्यांचा जन्म यासाठीच झाला व लिओ लिप्पे (Leo Lippe) या व्यक्तीस यासाठी सक्षम बनविण्यात अमेरिकन शासनाचा हात होता.

## इंटर आर्म्सचा जन्म

१९५२ च्या शेवटपर्यंत क्युमिंग्ज हा वेस्टर्न आर्म्सचा प्रतिनिधी होता. त्यावेळी त्याला जाण आली. लष्करातील शस्त्रांचा अभ्यास, हेल्मेटस् विक्रीचा अनूभव, विद्यार्थीदशेत बंदुक विक्रीचा केलेला जोड व्यवसाय, युरोपचा प्रवास, सी. आय. ए. त काम करताना झालेला उच्च लष्करी अधिकाऱ्यांचा परिचय व वेस्टर्न आर्म्सचा प्रतिनिधी म्हणून केलेला प्रवास व त्यावेळी झालेला परदेशीय राजनयिक उच्च पदस्थांचा व सेनाधिकाऱ्यांचा परिचय, याशिवाय आपण वेस्टर्न आर्म्सला प्रचंड नफा मिळवून देतो हे क्युमिंग्जच्या लक्षात आले. शेवटी हे दुसऱ्यासाठी राबणे बस्स झाले, सर्व नफा आपल्यालाच मिळाला पाहिजे या निष्कर्षाप्रत क्युमिंग्ज आला.

फेब्रुवारी १९५३ मध्ये त्याने अमेरिकन कायद्यानुसार स्वतःची हत्यारांचा विक्रेता म्हणून नाव नोंदणी केली. आपल्या खोलीत बसून त्याने देशोदेशीच्या उच्चपदस्थांचे नावाने जी अनेक पत्रे लिहिली, त्या पत्रांचे कागदावर आंतरराष्ट्रीय शस्त्र प्रमंडळ (International Armament Corporation) हे भारदस्त नाव होते. पत्रांत त्याने आपल्या व्यवसायाच्या स्वरुपाची कल्पना दिली व शस्त्रे विकायची आहेत का, अशी विचारणा केली. यावेळी इंटरआर्म्सचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, प्रतिनिधी, लिपीक, टायपिस्ट इतकेच काय चपराशी सबकुछ होता सेम्युएल क्युमिंग्ज.

पनामाच्या राष्ट्रीय पोलीस दलाला आता नको असलेली शस्त्रे विकायची होती. क्युमिंग्जने आपली सर्व शिल्लक खर्ची घातली. २५,००० डॉलर्सना त्याने ही शस्त्रे विकत घेतली व लगेच वेस्टर्न आर्म्सला ती विकली. सुरुवात तर चांगली झाली. काही काळाने सिडने लेरविन (Sideny Lerwin) ने त्याला भांडवल पुरविले. ही भागिदारी १९५८ पर्यंत टिकली. १९५८ मध्ये क्युमिंग्जने त्याचा हिस्सा विकत घेतला.

१९५० नंतर जगातील अत्याधुनिक देश जेटयुगात प्रवेश करीत होते. त्यांच्याजवळील शस्त्रे आता जुनी झाली होती कारण ती जेटयुगाला अनुरूप नव्हती. त्यांच्या दृष्टीने ती आता अतिरिक्त व काढून टाकण्यायोग्य होती; पण नवीन राष्ट्रांना जी मिळतील ती शस्त्रे हवी होती.

अमेरिकेत विन्चेस्टर आर्म्स व रेमिंग्टन आर्म्स शिकारीसाठी नवीन शस्त्रे बनवी. ती उत्कृष्ट होती पण महागही होती. लष्करी रायफल्सची चांगली दुरुस्ती व योग्य रुपांतरे केली तर त्यांचा उपयोगही शिकारीसाठी करिता येई. ही जुन्याची नवी शस्त्रे उत्कृष्ट नव्हती पण उत्तम होती व त्यांची किंमतही कमी असे. या दोन्ही अनुकूल बाबींचा लाभ क्युमिंग्जने घेतला.

१९५१ मध्ये ग्वाटेमाला (Guatemaa) मध्ये राष्ट्राध्यक्ष जॅकॉब अर्बेन्स गुझमान (Jacob Arbenz Guzman) ची राजवट होती. साम्यवादाकडे झुकलेली ही राजवट होती. या राजवटीस शस्त्रासाठी साम्यवादी राष्ट्रांवर अवलंबून रहावे लागते हे अमेरिकन शासनास पाहावेना. अमेरिकन शासनाने यावेळी थोडी शस्त्रे या राजवटीस स्वस्तात विकली, त्यावेळच्या व्यवहारात थोडासा लाभ क्युमिंग्जला झाला होता. १९५४ मध्ये या राजवटीविरूद्ध जी क्रांती झाली त्यास सी. आय. ए.ची फूस होती हे आता सर्वसाधारणपणे मान्य केले जाते. घडले असे की गुझमान राजवटीने झेकोस्लोव्हाकियाकडून २००० टनाची लहान शस्त्रे विकत घेण्याचे ठरविले. ही शस्त्रे पोलंडच्या बंदरात स्वीडीश जहाजावर चढविली जाणार व ग्वाटेमालाच्या बंदरात येणार, ही बातमी सी. आ. ए. ला कळली. निकारगो येथे ग्वाटेमालाचा साम्यवाद विरोधी नेता आश्रय घेऊन होता. सी. आ. ए.ने त्याला मदत केली. क्रांती यशस्वी झाली. ग्वाटेमालात साम्यवादाविरोधी राजवट सुरू झाली. नवीन राजवटीला झेक बनावटीची शस्त्रे नको होती पण ती काढून टाकण्यापूर्वी त्यांना अमेरिकेत ३० कॅलिबरची शस्त्रे हवी होती. अमेरिका शायकीय पातळीवर शस्त्रविक्रीचा व्यवहार करू इच्छित नव्हते. इंटरआर्म्सने हवी होती ती शस्त्रे विकली व पुढील पाच वर्षात ग्वाटेमालाकडून त्यांना नकोशी झालेली झेक शस्त्रे विकत घेतली, अर्थात मोडीच्या भावात. दोन उंदीर शिंकाळ्यात ठेवलेले सत्तेचे लोणी एकटेच फस्त करू इच्छित होते. शिंकाळ्याच्या दोन दोऱ्या कुरतडत ते पुढे जाऊ लागले शिंकाळे तुटले. मडके खाली पडले व बोकोबांचे फावले अशी गोष्ट लहानपणी वाचल्याचे आठवते का?

मोडीच्या भावात घेतलेल्या शस्त्रांचे काय केले? त्यांचे रूपांतर हौशी शिकाऱ्यासाठी शिकारीच्या शस्त्रात करून ती अमेरिकन नागरिकांना चढत्या भावात विकली. हिंग लगे ना फिटकरी रंग चोखा म्हणतात ते यास; पण ग्वाटेमालाला जी अमेरिकन ३० कॅलिबरची शस्त्रे हवी होती त्यासाठी क्युमिंग्जने काय केले? इंग्लंडजवळ दुसऱ्या महायुद्धाच्या वेळची तशीच शस्त्रे होती. इंग्लंडला ती विकायची होती. इंग्लंडच्या कायद्याप्रमाणे ती परक्या नागरिकाला विकत घेता येत नव्हती. आर. स्टुअर्ट मुरे (R. Stuart Murray) या इंग्लंडच्या नागरिकाने ती विकत घेतली अर्थात क्युमिंग्जच्या वतीने. ग्वाटेमालाला हवी तेवढी ग्वाटेमालाने घेतली. उरलेली शस्त्रे १९६१ मध्ये इंटरआर्म्सने हैती (Haiti) व इंडोनेशियाला विकली. या

**इंटरआर्म्सचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, लिपीक, टायपिस्ट, चपराशी सबकुछ होता क्युमिंग्ज !**

व्यवहारासाठी क्युमिंग्जने इंग्लंडमधील कंपनीचे काही भाग (Shares) विकत घेतले. पुढे कंपनीवर नियंत्रण राहण्यासाठी आवश्यक ते भाग आणखी विकत घ्यावे लागले. इंटरनॅशनल आरमामेंट कॉरपोरेशन हे नाव आता शोभून दिसू लागले.

डोमिनिकन संघराज्याच्या (Dominican Republic) सैन्याला इंटरआर्म्सने शस्त्रे विकली. त्यांच्यावर हल्ला करणाऱ्या कॅस्ट्रोचे अनुयायाजवळही इंटरआर्म्सने विकलेलीच शस्त्रे होती. कॉस्टारिका (Costa Rica) च्या बंडखोरांना निकारगोने जी शस्त्रे दिली ती इंटरआर्म्सनेच विकली होती व कॉस्टारिकाच्या शासनाला ही इंटरआर्म्सनेच शस्त्रे दिली होती. ऑस्ट्रियाच्या सीमा सुरखा दलाला लागणारी बहुतेक शस्त्रे इंटरआर्म्सनेच विकली होती. डेन्मार्ककडून शस्त्रे विकत घेऊन ती इंटरआर्म्सने पश्चिम जर्मनीला विकली. फिनलंड, लायबेरिया, सुदान इ. अनेक देशांना शस्त्रसज्ज करण्यासाठी इंटरआर्म्सने मदतीचा हात पुढे केला आहे.

इंग्लंडला ६ लक्ष ली–एन्फील्ड रायफल्स विकायच्या होत्या. १९५८ सालाची गोष्ट आहे ही. त्यासाठी इंटर आर्म्स–पार्कर–हेल कंबाईन्स या नावाखाली अमेरिका व इंग्लंडच्या कंपन्या एकत्र आल्या. क्युमिंग्जने यापैकीच ५०,००० ली–एन्फील्ड रायफल्स पाकिस्तान सीमा सुरक्षा दलाला विकल्या. या सर्व व्यवहारात विक्रेत्यांना फक्त ३०० टक्के फायदा झाला.

इंग्लंडमधील कारजवेल अॅन्ड हॅरीसन कंपनीवरही काही काळ त्याचे प्रभुत्व होते. नंतर जगातील अनेक देशात इंटरआर्म्सची जाळी त्याने निर्माण केली. उदा. पनामात इंटरआर्म्स एस्. ए., ग्रीसमध्ये इंटरआर्म्स (ग्रीस) लिमीटेड. फिनलंड, मोनॅको, कॅनडा येथेही त्याच्या कंपन्या आहेत. १९५८–१९६३ च्या काळात इंटरआर्म्सच्या 'विक्री निधी' मध्ये खूप मोठी रक्कम होती. साहजिकच शस्त्रविक्री व्यवसायात इंटरआर्म्सचा सर्वत्र बोलबाला होता; पण यासाठी त्यास खूप कष्ट घ्यावे लागले.

## क्युमिंग्जच्या यशाचं रहस्य

जेव्हा एखादा देश आपली जुनी शस्त्रे विक्रीसाठी काढतो तेव्हा ती घेण्याची आर्थिक क्षमता फक्त एकाच कंपनीत क्वचितच असते; पण हा चमत्कार क्युमिंग्जने करून दाखविला. प्रथम त्याची कंपनी इतर कंपन्यांबरोबर एकत्र येऊन संयुक्तपणे शस्त्रे विकत घेई. पुढे या कंपन्या आपल्या गुंतवणुकीच्या प्रमाणात माल घेत. या धंद्यात नफा खूप सुटतो पण कधी कधी तो गुंतवणुकीच्या २००० टक्केही असतो. अनेक विक्रेते हे अमाप यश पचवू शकले नाहीत. अचानक लॉटरी लागणाऱ्या कर्मदरिद्री माणसाचे डोके फिरावे तसे त्यांचे झाले. स्वतःच्या हौशी, मौजी, धंद्याच्या गरजेपेक्षा जास्त विस्तार, बेफाट व अनावश्यक खर्च यात त्यांचा पैसा खर्च होऊ लागला. उदा. पैसा दिसू लागताच अनेकांनी स्वतःचे वार्षिक वेतन २५,०००, ५०,०००, १,५०००० डॉलर्स असे वाढवून घेतले. पण क्युमिंग्जने मात्र क्वचितच ९५०० डॉलर्सपेक्षा जास्त वेतन घेतले. न्यूयॉर्कहून वॉशिंग्टनला माल जर आणावयाचा तर इतर कंपन्या ते काम माल वाहातूक मोटार कंपन्यांना देत. क्युमिंग्ज मात्र पैसा असूनही स्वतःच्या मोटारीच्या टपावर तो माल शिगोशिग भरून, व्यवस्थित बांधून स्वतः वॉशिंग्टनला घेऊन येई. नाना मार्गाने शिल्लक राहणारा पैसा व लाभ सर्व तो त्याच्या कंपनीच्या 'विक्री निधी' त जमा करी. त्यामुळेच १९५८ नंतर क्युमिंग्जची कंपनी खूप मोठा शस्त्रांचा साठा एकटी, एकरकमी नगदी पैसे देऊन विकत घेऊ शके.

त्याची व्यक्तीची पारख करण्याची शक्ती अजोड आहे. त्यामुळेच अनेक देशात त्याने आपले प्रभावी प्रतिनिधी नेमले. त्याच्या संघटनेतही महत्त्वाच्या जागी योग्य व्यक्ती म्हणूनच तो नेमू शकला. तो एक बुद्धिमान व्यापारी व कुशल विक्रेता आहे हेही खरेच; पण त्याचे व्यक्तिमत्वही त्याच्या यशाला कारणीभूत आहे. त्याची राहणी भपकेबाज नाही. चारचौघांना मान्य, साधा व परंपरेला धरूनच त्याचा पोशाख असतो. त्याच्या सरळ व सुसंस्कृत वागण्यामुळे तो समोरच्या व्यक्तीला प्रभावित करतो. थोडक्यात नेहमी भेटावा व त्याची मैत्री वाढवावी असेच कोणालाही वाटते.

व्यावहारिक यशात त्याच्या असामान्य देवाणघेवाणीच्या कलेचाही फार मोठा हात आहे. एकतर बहुतेक देशातील सत्ताधारी वर्गापैकी अनेक श्रेष्ठ व्यक्तींना तो ओळखतो. दुसऱ्या देशाशी किंवा कंपनीशी वाटाघाटी करण्यापूर्वी त्यांच्याविषयी खडान्खडा माहिती, त्याच्या संबंधित खात्याकडून त्याला मिळालेली असते. खालून वर जाण्यावर त्याचा विश्वास नाही. तो सरळ सर्वात महत्त्वाच्या व्यक्तीलाच भेटतो. औपचारिक बोलण्यातून गाडी व्यवहाराकडे वळताच तो सर्व नियम बाजूला ठेवतो व काही गोष्टी उघडपणे सांगून टाकतो. उदा त्याच्या बाजूने रेडटेपचा अडथळा येणार नाही. तो देश जी शस्त्रे विकील ती त्या देशाच्या शस्त्र राष्ट्रांच्या हाती पडणार नाहीत. ठरलेली रक्कम ताबडतोब दिली जाईल. त्यामुळे साहजिकच व्यवहार यशस्वी होण्याचा मार्ग खुला होतो.

विविध शस्त्रांची खडान्खडा माहिती, शस्त्रांच्या बाजारपेठांचा परिपूर्ण अभ्यास, समोरची व्यक्ती काय देऊ इच्छिते, किती देऊ इच्छिते याचा योग्य अंदाज ही त्याची व्यक्तिगत वैशिष्टये आहेत.

जगातील श्रीमंत, प्रभावी, सत्ताधारी व्यक्तीशी परिचय असूनही त्याची राहणी त्यामानाने साधीच आहे. त्याचे व्यसन किंवा आवड म्हणजे उत्तम खाद्य पदार्थावरील प्रेम एवढेच. तो धुम्रपान करीत नाही. जुगारी अड्डे व नाईटक्लब यांना भेटी देत नाही असे म्हणणेच योग्य. तीच गोष्ट मद्यपानाविषयी सांगता येईल. त्याच्या सामान्य बोलण्यात किंवा भावनाप्रधान आवेशात येणारा अयोग्य किंवा असंस्कृत शब्द म्हणजे 'Rubbish' एवढा एकच.

शस्त्रे हाच त्याचा व्यवसाय व हौस दोन्ही. व्हर्जिनिया राज्यातील अलेक्झांड्रिया येथील त्याच्या कार्यालयायत गेलो तरी देखील शोभेच्या वस्तू म्हणजे जुनी शस्त्रेच दिसतील. त्याने अमेरिकेचे नागरिकत्व कायम ठेवले असले तरी सध्या तो मोनॅको येथेच राहतो. १४ खोल्यांचे त्याचे कार्यालय त्याच्या घराजवळच आहे. मध्य अमेरिकेत शस्त्रांची खरेदी करण्यासाठी तो गेला होता तेव्हा एका जर्मन युवतीशी त्याची भेट झाली; पण वर्षातून आठ–नऊ महिने प्रवास करणाऱ्या क्युमिंग्जचा पहिला विवाह अयशस्वी झाला. घटस्फोटानंतर त्याने दुसरा विवाह एका स्वित्झर्लंडमधील युवतीशी केला. मोनॅको येथे त्यांचे घर आहे.

आपल्याला मृत्यूचा व्यापारी मानले जाते किंवा आपण जो व्यव-

साय करतो तो अनैतिक आहे, या विचाराशी येताच तो अडखळतो; पण क्षणभरच. निग्रहाने तो भावनेवर नियंत्रण ठेवतो. त्याचे मते अमेरिकन नागरिक जो कर भरतात त्यापैकी २/३ कर त्याच वस्तूवर खर्च होतो, ज्याचा तो व्यापार करतो. राष्ट्रीय मार्गावर मोटारींचे अपघात होतात. दारूमुळे लाखो कुटुंबे बरबाद होतात. गिऱ्हाईक या वस्तूंचा वापर कसा करतात, यास जितके यांचे उत्पादक जबाबदार आहेत तितकाच शस्त्रविक्रेता या नात्याने शस्त्रांच्या उपयोगाला तो जबाबदार आहे. 'शस्त्र' हे मानवाच्या शतकानुशतकापासून चालत आलेल्या प्रज्ञाहीनतेचे सूचक आहे. सभ्यता, सभ्यता ज्याला म्हणतात ती अशी होती, आहे व राहील. त्यामुळे निःशस्त्रीकरण कधीही साध्य होणार नाही हा त्याचा विश्वास आहे.

देशोदेशींच्या शस्त्रविक्रेत्यापैकी क्युमिंग्ज हा एक होय. जगात त्यास स्पर्धकही खूप आहेत. अमेरिका हा स्वतंत्र नागरिकांचा (इतर देशांचे मानाने) देश असल्याने, तेथील व्यवहारांची बरीच माहिती मिळते. इतरांची तेवढी विश्वसनीय माहिती मिळतेच असे नाही.

### क्युमिंग्जचे स्पर्धक

देशाने मान्य केलेल्या विधिनियमानुसार शस्त्र निर्मिती व विक्री करणारे इतर अनेक व्यापारी आहेत, त्यापैकी सहा प्रमुख आहेत.

१९६३ नंतर इंग्लंडमधील कॉग्जवेल अँन्ड हॅरिसन (Cogswell and Harrison) कंपनी ही त्यापैकी एक होय. इ. एच. 'टेड' होल्डन हा त्याच्या प्रमुख आहे. बेल्जियमच्या फॅब्रिक्यू नॅशनेल (Fabrique Nationale) ची शस्त्रे मध्यपूर्वेच्या काही प्रदेशात विकण्यापुरते विक्रीकरार या कंपनीशी कॉग्जवेल अँन्ड हॅरिसन कंपनीने केले आहेत. ही कंपनी राष्ट्रकुलातील (Common Wealth) देशांना ऑमनिपॉल (Omnipol) या झेक कंपनीची व विकर्स या इंग्लंडच्या कंपनीची शस्त्रे विकते. १९६३ मध्ये या कंपनीने मोशे शॉम्बे (Moise Tshombe) ला जवळजवळ १० लक्ष डॉलरची शस्त्रे पुरविली.

झेकोस्लोव्हाकिया हा साम्यवादी देश आहे. ऑमनिपॉल ही या देशातील शस्त्रनिर्मिती करणारी महत्त्वाची कंपनी होय. खरं म्हणजे साम्यवादी देशांनी जागतिक शांततेचा वसा घेतला आहे. भांडवलशाही राष्ट्राप्रमाणे या देशांना दुसऱ्यांना शस्त्रे विकून मृत्यूचे व्यापारी बनावयाचे नाही; पण बिचारे करणार काय? शेषावर विश्राम घेऊन व चंचल लक्ष्मीला आपल्या चरणसेवेत गुंतवून, जागतिक शांतता प्रस्थापित झाली या समाधानात असलेल्या भगवान विष्णुंना जेथे दुष्टांच्या संहारासाठी दशावतारी बनावे लागले, तेथे साम्यवादी राष्ट्रांना दोष कसा देणार. सहजीवनासाठी धडपडणाऱ्या साम्यवादी राष्ट्रांना स्वसंरक्षणासाठी शस्त्रे निर्माण करावीच लागतात. स्वसंरक्षणाचा प्रश्न कायमचा (केवळ भांडवलशाही राष्ट्रांच्या अस्तित्वामुळेच बरं का!) त्यामुळे शस्त्रनिर्मितीचे कारखाने आवश्यक नाहीत का? बरं कारखाने म्हणजे गाय म्हैस नाही. आज दूध नको आहे, अतिरिक्त दुधाचा साठाही करावयाचा नाही, मग वासरांना पिऊ द्या. त्यामुळे शस्त्राचे कारखाने चालूच ठेवावे लागतात. परिणामतः इच्छा नसूनही अतिरिक्त शस्त्र साठा होतोच. त्यामुळे ती विकावीच लागतात. ऑमनिपॉल कंपनीला जेव्हा बिगर साम्यवादी राष्ट्रात शस्त्रे विकावी लागतात तेव्हा अनेकांचे साहाय्य घ्यावे लागते. इंग्लंडची कॉग्जवेल अँन्ड हॅरिसन कंपनी या बाबतीत मदत करते ती प्रामुख्याने पूर्वकालीन ब्रिटीश वसाहतींमध्ये शस्त्रे विकण्यासाठी.

ऑमनीपॉल कंपनी जेव्हा शस्त्रे पुरविते तेव्हा त्या शस्त्रांचे स्पेअर पार्टस्ही पुरविते. ही कंपनी तशी चारित्र्यसंपन्न आहे. त्या कंपनीच्या कार्यालयात बसून किंवा फोनवर शस्त्रांची किंमत, कोणाला हवी आहेत, किती हवी आहेत अशा चौकशा केलेल्या कंपनीला आवडत नाही. तुम्ही ज्या हॉटेलात उतरलात तेथे किंवा रस्त्यावर त्या कंपनीच्या प्रतिनिधीला भेटा. मग खरेदी-विक्री संबंधी कंपनी तुमच्याशी मनमोकळी चर्चा करायला तयार असते. एकदा अटी पक्या झाल्या की त्या लिखित स्वरूपातही कंपनी कबूल करते; पण तत्पूर्वीच्या चर्चेची नोंद त्यांना नको असते इतकेच दुसरी महत्त्वाची गोष्ट त्यांना रक्कम नगदी घेणे आवडते. इटालीचे लीरा (Lire) वगळता कोणतेही परकीय चलन स्वीकारावयास कंपनी तयार असते; पण त्यांना झेक चलन नक्कीच नको. अगदी कटाक्षाने नको. केव्हाही नको. ऑमनिपॉल कंपनी झेक शासनाचे हस्तक्षेपापासून मुक्त आहे. 'का?' आश्चर्य वाटले ना. त्या देशाचा परकीय चलन मिळविण्याचा महत्त्वाचा मार्ग म्हणजे शस्त्र विक्री आहे.

इंग्लंडमधील पार्कर-हेल कंपनी ही इंटरआर्म्सची दुसरी स्पर्धक कंपनी होय. या कंपनीचे कार्यक्षेत्र आफ्रिका, मध्यपूर्व व युरोप हे असले तरी राष्ट्रकुलामधील देश तिचे खास गिऱ्हाईक आहेत. इंग्लंडच्या शासनाला वाटते काही देशात शस्त्रे इंग्लंडहून पाठवू नयेत. ही कंपनीदेखील कायद्याचा आदर करते. युरोपात, ऑस्ट्रिया, स्पेन, हॉलंड, बेल्जियम हे काही असे देश आहेत की जे शस्त्रांची निर्यात कोठे होते याकडे फारसे लक्ष देत नाहीत इंग्लंडचा या देशांना शस्त्रे पाठविण्यास विरोध नाही. अरब देशांच्या शेख मंडळींना याच तंत्राचा यशस्वीपणे वापर करून कंपनीने शस्त्रे विकली आहेत.

पश्चिम जर्मनीमधील मर्क्स ए. जी. (Merex A G) हीदेखील शस्त्रे विकणारी प्रमुख कंपनी आहे. अरब देशात ही कंपनी शस्त्रे विकते; पण प्रामुख्याने ही कंपनी ब्रोकरचे काम करते.

मोठ्या प्रमाणात शस्त्रविक्री व्यवसाय करणाऱ्या दोन कंपन्या कॅनडात आहेत. अमेरिकेने जेव्हा पाकिस्तानला शस्त्र विकण्यावर बंदी घातली तेव्हा अमेरिकेत तयार झालेली शस्त्रे यापैकी कंपनीनेच पाकिस्तानला विकली. १९५७ मध्ये पश्चिम जर्मनीने कॅनडाकडून २२५ एफ-८६ सॅबरजेट विकत घेतली होती. १९६५ मध्ये प. जर्मनीजवळ एफ-१०४ जी स्टार फायटर विमाने आली. लगेच एफ-८६ सॅबरजेट विमानात गुंतून पडलेला पैसा मोकळा करण्याची प. जर्मनीला घाई झाली. १९६५ मध्ये भारत-पाक युद्ध सुरू झाल्याबरोबर दोन्ही राष्ट्रांना शस्त्रे देण्यावर प्रमुख राष्ट्रांनी बंदी घातली. २२ सप्टेंबरला शस्त्रसंधी होताच, इराणचे प्रतिनिधी मंडळ बॉनला गेले. बरोबर पाकिस्तानचा शस्त्रतज्ज्ञही होता असे मानले जाते. इराणच्या

**साम्यवादी देशांना मृत्यूचे व्यापारी बनायचे नाही, पण बिचारे काय करणार ?**

सैन्य लाच ही एल–८६ सॅबरजेट हवी आहेत, या अटीवर कॅनडा व अमेरिकेने प. जर्मनीला विमाने विकण्यास परवानगी दिली. नोव्हेंबर १९६६ ला ती इराणला आली व काही काळाने ती पाकिस्तानात दिसू लागली. भारताने या प्रकाराबद्दल तक्रार केली. राजनायेक वाटाघाटींचे शेवटी ती विमाने परत इराणकडे गेली; पण सर्व ९० विमाने गेली का ? ईश्वरालाच माहीत.

ब्रुसेल्स येथील सीडेम आंतरराष्ट्रीय (Sidem International) ही आणखी एक महत्त्वाची कंपनी होय. पश्चिम जर्मनीला शस्त्रसज्ज होण्यास या कंपनीने फारच मदत केली.

राज्यांच्या विधिनियमांना धरून पण त्यातून पळवाटा शोधून व्यवसाय करणारे जसे अनेक असतात. त्याचप्रमाणे गुन्हेगारी प्रवृत्तीचे ही काही लोक खाजगी व्यवसायात असतात. शस्त्रविक्रीचा व्यवसाय याला अपवाद नाही. अमेरिकेतील हंटर व रोझ ही त्यापैकी काही उदाहरणे होत. स्पर्धकाच्या उखाळ्या पाखाळ्या काढणे, अफवा पसरविणे, स्पर्धक कंपन्यात आपले हस्तक घुसविणे, खोट्या नोंदी ठेवणे, कायदे धाब्यावर बसविणे अशा अनेक लांड्यालबाड्या काही शस्त्रविक्रेते करतात.

शस्त्रविक्रीच्या व्यवसायांत लाचखोरी (Bribery) देखील आहे. अमेरिका व पश्चिम युरोपीय देश यापासून मुक्त नाहीत; पण तेथे लाचखोरी हा फार मोठा गुन्हा मानला जातो. त्यास कठोर शिक्षा ही आहेत; पण आग्नेय आशिया, मध्यपूर्व, आफ्रिका व लॅटिन अमेरिका या भूप्रदेशात मात्र हा दैनंदिन सवयीचा भाग बनला आहे. 'उपरकी कमाई' 'बक्षिसी' चे प्रस्थ ज्या देशात आहे, त्यांच्याशी व्यवहार करणाऱ्या कंपन्यांनादेखील, त्याशिवाय तरणोपाय नाही. फरक इतकाच की, हे काम करण्यासाठी ते स्थानिक प्रतिनिधीच नेमतात. असे म्हणतात की, डॉ. सुकार्णोंच्या राजवटीत इंडोनेशियांत उघडपणे १५ टक्के जास्त रक्कम घेतली जात असे व ती लष्करी अधिकारी, सनदी नोकर व राजकारणी ज्यांच्या द्वारे व्यवहारपूर्ण होत असे त्यांच्यात वाटली जात असे.

शस्त्रविक्रीच्या व्यवसायात गुंतलेला आणखी एक वर्ग आहे. त्यांना इंग्रजीत Munitions Manipulators किंवा MMs. म्हणतात. विधीनियमानुसार शस्त्रविक्री करणारे व्यापारीदेखील संधीचा फायदा घेतातच. उदा. वर्युमिग्जसारख्यांची कंपनी देखील परदेशाला शस्त्रे विकण्यासाठी, स्वदेशाच्या शासनाशी सपर्क साधते. काही साधलं का म्हणून थोडी फार पडद्यामागे हालचाल देखील करते; पण शासनाने धोरण म्हणून विक्रीस नकार दिला तर स्वस्थ बसते. बंदूक पळवे (Gun Runners) तर उघड उघड बेकायदेशीर शस्त्रविक्री करतात; पण हस्तलाघवी शस्त्रविक्रेते (Munitions Manipulators) मात्र असे चौर्यकर्म करीत नाहीत. हस्तलाघवी शस्त्रविक्रेत्यांना सुफल भूमी लोकशाही राज्यात जास्त असते. लोकशाही शासनाचे धोरण क्वचितच एकमुखी असते. उदा. युनोत ते वसाहतवाद विरोधी धोरणाचे प्रवक्ते असतात तर कायदेमंडळात देशी उद्योगधंद्यांचे (ज्यात शस्त्र निर्मितीचा उद्योगही आहे.) पुरस्कर्ते व संरक्षक असतात; पण मित्र राष्ट्रांसमोर मात्र स्वतःची प्रभावी लाघवी शक्ती ही प्रतिमा काय सांभाळतात. अशा वेळी हस्तलाघवी शस्त्रविक्रेता ओळखतो की, शासनाचा नकार म्हणजे गृहखात्याचा नकार असेल; पण परराष्ट्रीय खात्याचे धोरण वेगळे असेल. पुन्हा शासनाचा नकार म्हणजे गुप्तहेर संघटनेचा नकार असेलच असे नाही. प्रतिष्ठित व्यापाऱ्यांना हे माहीत नसते असे नाही; पण हत्तीचे चलनवलन लपणारे नसते. थोड्या लाभासाठी उगीच नको इतका बभ्रा मात्र व्हावयाचा व लाभाचे मानाने बदनामीच जास्त पदरात यावयाची. अशा वेळी त्वरीत हालचाल करणारे, बहुगुणी, प्रतिभावान हस्तलाघवी शस्त्रविक्रेते आपल्या लहान खुजेपणाने बाजी मारून नेतात. साखरेचे खाई त्याला देव देई, हेच खरे.

बडी राष्ट्रे युद्धमान राष्ट्रांना शस्त्रविक्री करण्यावर बंदी का घालतात ? युद्धाचे क्षेत्र वाढू नये, शस्त्रांच्या तुटवड्यामुळे युद्धज्वर आपोआपच कमी व्हावा, ह्या कारणाप्रमाणेच आपण केवढे शांतताप्रेमी आहोत हे जगाला दिसावे हेही एक कारण असते; पण शस्त्रविक्री बंदीचा नकारात्मक परिणामही होतो. युद्धात गुंतलेल्या राष्ट्रात शस्त्रांची पोकळी निर्माण होते; पण वैराची नशा व सूडाची आग भडकलेली राष्ट्रे दुसऱ्या मार्गाने शस्त्रे मिळविण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी शस्त्र व्यवहारावर बंदी घालणाऱ्या राष्ट्रांनी त्याची कठोरपणे अंमलबजावणी केली पाहिजे. शस्त्रव्यवहार बंदीसाठी जी द्वारे बंद केली आहेत. त्यातील भेगा बुजविणे हे बंदी घालणाऱ्या राष्ट्रांचे कर्तव्यच आहे; पण दुसऱ्या महायुद्धानंतर हे क्वचितच घडले आहे. बडी राष्ट्रेही परस्परांच्या शस्त्रव्यवहार बंदीकडे अविश्वासानेच पहात असावीत. आपण बंदीची अंमलबजावणी कडक केली व दुसऱ्या देशाने पळवाटा ठेवल्या तर, शस्त्रविक्रीचा आर्थिक लाभ त्या देशाला जास्त होणार. म्हणजे आपला कमी होणार. प्रादेशिक राष्ट्रवादाचा पायाच असा दुसऱ्या देशाविषयीच्या सद्हेतूंविषयी शंका यावर उभारला गेला असल्यामुळे शस्त्रव्यवहार बंदीच्या दरवाजांना ज्या भेगा असतात, त्यातून चतुर, चपळ हस्तलाघवी शस्त्रविक्रेते सुळकन् निसटून जाण्यासाठी व युद्धात गुंतलेल्या राष्ट्रांमध्ये निर्माण झालेली शस्त्रांची पोकळी भरून काढण्यासाठी पुढे सरसावतात. या हस्तलाघवी शस्त्रविक्रेत्यांमध्ये देशोदेशीचे शस्त्रविक्रेते असतात. अशा वेळी दुसऱ्या देशांच्या हस्तलाघवी शस्त्रविक्रेत्यांनी संधी घेण्याऐवजी आपल्याच देशाच्या अशा शस्त्रविक्रेत्यांनी हा धंदा गुप्तपणे करणे बंदी घातलेल्या देशाला लाभदायक असते. करावे लागते फक्त आपल्या देशातील हस्तलाघवी शस्त्रविक्रेत्यांच्या हालचालीकडे सोयीस्कर दुर्लक्ष त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर क्युबा, डोमीनिकन रिपब्लीक, कॅरेबियन क्षेत्र, भारत–पाक, नायजेरिया–बायफ्रा, मध्यपूर्व, दक्षिण आफ्रिका इत्यादी सशस्त्र संघर्ष झाले तेव्हा बड्या राष्ट्रांनी शस्त्रव्यवहार बंदी घातली व हस्तलाघवी शस्त्रविक्रेत्यांनी शस्त्रे विकली साधारणपणे हे विक्रेते छोटी शस्त्रेच विकतात; पण कधी कधी रणगाडे ही विकतात. उदा. 20 m.m. Lahti Cannon घ्या. दुसऱ्या महायुद्धाचे वेळी ही फिनलंडमध्ये तयार झाली. पुढे ती काही स्टेनगन्सच्या मोबदल्यात एका हस्तलाघवी शस्त्रविक्रेत्याने विकत घेतली. नंतर ती इटालीत आली. पुढे दुसऱ्या हस्तलाघवी शस्त्रविक्रेत्याने ती इस्रायलच्या हगनाह संघटनेला विकली. १९५० मध्ये ती पुन्हा पहिल्याकडे आली. त्याने ती कोस्टारिकाला विकली. पाच वर्षांनी ती अल्जेरियाच्या एफ.एल.एन. ने विकत घेतली. १९६० मध्ये काही

काळ ती पनामात दिसली. १९६५ मध्ये ती सॅन्टोडॉमीनिगो (Santo Dominigo) मध्ये अवतीर्ण झाली.

शस्त्रविक्रेत्यांचा आणखी एक प्रकार' म्हणजे शस्त्र पळवे. हे बेकायदेशीरपणे शस्त्रविक्रीव्यवसाय करतात. धनलाभ हाच यांचा प्रमुख हेतू असतो. कारण शस्त्रपळवे हे सामान्यतः काही व्यक्ती असतात; पण स्वच्छ शस्त्राचे गुप्त कारवायांचे विसाव्या शतकात महत्त्व वाढल्याने सी. आय. ए. ( C. I. A. ) एम. आय. ६ (M. I. 6) एसडीईसीई (SDECE) अशा राज्यांच्या गुप्तहेर संघटना तसेच पॅन आफ्रिकन मुव्हमेंट आणि मुस्लीम ब्रदरहूडसारख्या संघटनाही या व्यवसायात गुंतल्या असाव्यात असे मानले जाते. बंदूकपळवे व काळाबाजार करणारे दोघे एका अर्थाने सारखेच. दोन्हीत कायदेशीर व्यवसायापेक्षा जास्त आर्थिक लाभ असतो. उदा. अमेरिकेत वापरलेल्या सिंगल शॉटगनची किंमत १६ डॉलर असते; पण ती जेव्हा बेकायदेशीरपणे मेक्सिकोत विकली जाते तेव्हा तिची किंमत १०० डॉलर होते. दक्षिण अमेरिकेत ती २०० डॉलरला विकली जाते.

बनावट शस्त्रनिर्मिती व विक्री हा या व्यवसायातील आणखी एक प्रकार आहे. पाकिस्तान व अफगणिस्तानच्या उत्तरेला हिमालय व हिंदुकुश पर्वताच्या सीमा आहेत. या पर्वतीय प्रदेशात खैबरखिंड आणि कोहार खिंडीजवळ मालाकंद (Malakand) आणि स्वात (Swat) प्रदेशात जे मुस्लीम पठाण राहतात त्यापैकी आफ्रिकी टोळीच्या पठाणापैकी काहीजण रेल्वेच्या जुन्या रूळापासून ३२ कॅलीबर रिव्हाल्वर, शॉटगन, सब मशीनगन ही शस्त्रे करण्यात कुशल आहेत. ही शस्त्रे म्हणजे वेब्ले अँड स्कॉट (Webley and Scott) सारख्या प्रसिद्ध कंपन्यांची हुबेहुब नक्कल असते. ही शस्त्रे बनावट असली तर कंपन्यांच्या शस्त्राइतकीच परिणामकारक असतात. अशा प्रकारची बनावट शस्त्रे तयार करणे व त्यांची विक्री करणारे ही शस्त्रविक्रीच्या व्यवसायात आज आहेत. कोरियन युद्धात चीनी साम्यवादी सैनिकांनी जी ब्राऊनिंग आणि मौसर जातीची पिस्तुले वापरली त्यापैकी पुष्कळशी अशीच बनावट होती; पण ही मात्र साम्यवादी चीनमध्ये तयार झाली होती.

### शासन : एक शस्त्र विक्रेता

परमाणू अस्त्राचा प्रयोग जपानवर झाला. मानवतेवर कधीही न पुसला जाणारा कलंक लागला. बर्ट्रान्ड रसेलसारखा प्रख्यात गणितज्ञ तत्त्वज्ञानी ज्ञानसाधना सोडून बाहेर आला. जणु काय हजारो शास्त्रज्ञांनी आपल्या निसर्गप्राप्त बुद्धिमत्तेचा दुरुपयोग करून, एकाहून एक भयानक शस्त्रे मानवी संहाराकरिता निर्माण करण्याचे जे पाप केले, त्याचे त्यांच्या वतीने हा वयोवृद्ध तत्त्वज्ञ प्रायश्चितच घेत होता. परंतु मुलगामी शोधांचे आधारे शस्त्रांचे उपयोजित शोध लावण्यास शास्त्रज्ञांस भरीस घालणारे प्रादेशिक राष्ट्रवादी राजकारणी मात्र आपल्या धंद्यापासून ढळले नाहीत. ज्यूंच्या प्रचंड हत्याकांडाला, मानवी वित्त व जीवितहानीच्या प्रचंड विनाशाला कारणीभूत झालेल्या हिटलरच्या साथीदारावर एकीकडे खटले भरून व दुसरीकडे पुन्हा जागतिक 'संघटना स्थापना करून शांततेचा उदोउदो करणारे विजयी राष्ट्रांचे राजकारणी व मुत्सद्दी त्याचवेळी शस्त्रनिर्मितीच्या व शस्त्रविक्रीच्या खाजगी धंद्यास, राष्ट्रीयीकरण सदृश्य रूप देत होते. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या मृत्यूच्या आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्याचे एक स्वरूप राष्ट्रीय करते, हे पाहणे आवश्यक आहे. खाजगी शस्त्राचे कारखानदार व विक्रेते प्रामाणिक होते व आहेत. आर्थिक लाभाचा हेतू त्यांनी लपवून ठेवला नाही. युद्धकाळात त्यांना महत्त्व प्राप्त होई व प्रतिष्ठा लाभे. कारण ते आपल्या राष्ट्राला विजयी करण्यास मदत करीत. शांततेच्या काळात मात्र त्यांना गिऱ्हाईक शोधण्यासाठी वणवण भटकावे लागे व स्पर्धकावर मात करण्यासाठी नाना युक्त्या कराव्या लागत. दुसऱ्या महायुद्धानंतर राष्ट्रांची शासनाचे हाती असलेली संपत्ती आता शस्त्रनिर्मितीसाठी वापरली जाऊ लागली. शासनच आता शस्त्रे विकू लागले. खाजगी व्यापारी द्रव्ययोगी होतेच; पण त्या संपत्तीचा उपभोग घेणारे कोण हे इंद्रियगम्य (Concrete) होते, म्हणजेच सामान्य जनता निश्चितपणे अशांचेकडे बोट दाखव शके. शासन राष्ट्राची संपत्ती शस्त्रनिर्मितीसाठी वापरते व राष्ट्राचे नावाने शासन जेव्हा शस्त्रविक्री करते, तेव्हा द्रव्ययोगी शासन ठरते; पण ते राष्ट्राचे नावाने, राष्ट्रासाठी करते. अशा वेळी मात्र या द्रव्ययोगाचा लाभ घेऊन त्याचा उपभोग घेणारे जे कोणी ते मुर्तपणे सामान्य जनतेसमोर उभे राहात नाहीत. सार्वभौम जनता आहे, ह्या लोकशाहीराष्ट्रवाद्यांचे घोषणेने तर हे द्रव्ययोगी आपणच आहोत असे जनतेला वाटते; पण शासन करणारे राष्ट्रवादी नेते, राजकारणी हे मात्र इंद्रियगम्य राष्ट्रवादी द्रव्ययोगी ठरतात; पण निवडणूकीत आपण यांना बदलू शकतो या अनुभवाने जनतेसमोरील विसाव्या शतकातील विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतरच्या या राष्ट्रवादी द्रव्ययोग्याचे स्वरूप अमूर्तच राहते. जनता हे विसरते की, आपण राज्यकर्ते निवडू शकतो पण आपणच राज्यकर्ते कधीही बनू शकत नाही. राष्ट्रवादी द्रव्ययोगी असे अमूर्त पण जाणवणारे आहेत. पाऱ्यासारखे ते दिसतात, अस्तित्वात असतात. स्पर्शजन्य असतात पण जनतेच्या पकडीत मात्र कधीच येत नाहीत.

राष्ट्रवादी द्रव्ययोग्यांनी 'शांततेसाठी शस्त्रसज्जता' याचे तत्त्वज्ञान निर्माण केले व राष्ट्रवाद ज्वरबद्ध जनतेला ते आजतरी मानवलेले दिसते. दुसऱ्या महायुद्धानंतर शस्त्रांचे खाजगी कारखानदार व विक्रेते याविषयी जनतेत अप्रीती निर्माण झाली. त्याच कारखानदारांचे अस्तित्व आज ज्या शासकांचे शस्त्र खरेदीवर व विक्रीवर अवलंबून आहे ते मात्र प्रतिष्ठीतच आहेत. युद्धकाळात शस्त्रांची मागणी वाढते, हे समजू शकते. तसेच दुसऱ्या महायुद्धापूर्वी होतेही पण आता शांततेच्या काळातही शस्त्रांना मागणी असते. प्रादेशिक राष्ट्रवादाचे स्वरूप आता त्याग व देशभक्ती यांच्या प्रगटीकरणाचे साधन नसून त्यास भावनिक उन्मादाचे स्वरूप आले आहे. खरे पहाता ही चिंतेची बाब आहे; पण राष्ट्रवादाचा भावनिक उन्माद हा आज गौरवाची बाब बनला आहे.

टाटा, बिर्ला इ. औद्योगिक घराण्यांनी आर्थिक लाभासाठी धंदा

**द्रव्ययोग्यांनी 'शांततेसाठी शस्त्रसज्जता' हे तत्वज्ञान निर्माण केले ते आज मानवलेले दिसते**

करून प्रचंड नफा मिळविला. तो स्वतःसाठी राखून ठेवला. त्यामुळे विषमता व पिळवणूक जन्माला आली. विषमता व पिळवणूक नष्ट करण्यासाठी काही धंद्यांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. राष्ट्रीयकरण झालेले व्यवसाय, एकाधिकारामुळे अतिप्रचंड नफा मिळवितात. त्याचा लाभ सामान्य जनतेस झाला असता तर हरकत नव्हती; पण विषमता व पिळवणूक कमी न होता वाढताना दिसते. हा अतिप्रचंड लाभ कोठे गेला? शासन नावाच्या अमूर्त शक्तीची वाढच त्यामुळे झाली, याशिवाय अन्य निष्कर्ष निघू शकत नाही; पण राष्ट्रीय भावनिक उन्मादांत जनता मात्र या प्रचंड ताकदीला स्वतःची ताकद मानते. मग पश्चिम युरोपीय व अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशांतील जनता राष्ट्राचे शस्त्रसाठे स्वतःचेच मानते यांत नवल नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर झालेल्या या बदलाचे स्वरूप सविस्तर पाहू.

१९४७ नंतर अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स इ. प्रगत देशांच्या शासनांनी, आपल्या देशातील शस्त्र निर्मात्याकडून अधिकाधिक किंमतीची शस्त्रे विकत घेतली आहेत. उदा. अमेरिकेने १९३९ मध्ये सर्व प्रकारच्या लष्करी साधनावर १·४ बिलीयन डॉलर्स, १९४१ मध्ये १४ बिलीयन डॉलर्स, १९६० मध्ये ४१ बिलीयन डॉलर्स व १९६८ मध्ये अंदाजे ७२ बिलीयन डॉलर्स खर्च केले. यापैकी किती रक्कम शस्त्रांच्या खरेदीवर खर्च केली हे निश्चित सांगता येणे कठीण आहे; पण अंदाजे ती कमीतकमी ३०% असावी. इंग्लंडने आपल्या संरक्षण खर्चापैकी अंदाजे ४३% व स्वीडनने ५३% रक्कम १९५५ ते १९६४ या काळात यासाठी खर्च केली असावी.

याचा अर्थ असा काढता येईल की, देशातील खाजगी शस्त्रोद्योग जी शस्त्रे निर्माण करतात त्यापैकी बरीच त्या देशाचे शासनच खरेदी करते. त्यामुळे १९४५ नंतर या कारखानदारांना विक्रीसाठी धावाधाव करावी लागत नाही. घरचे व खात्रीचेच गिऱ्हाईक त्यांना उपलब्ध असते. हे उद्योगधंदे आपल्या शस्त्रनिर्मितीक्षमतेच्या ८० टक्के क्षमते इतकी शस्त्रे निर्माण करतात. आधुनिक काळात शस्त्रसंशोधन व विकास याचा खर्च खाजगी उद्योगधंद्यांना न परवडण्याइतका वाढला आहे. शासकीय आर्थिक मदतीशिवाय व नवनिर्मित शस्त्रापैकी अमूक इतकी शस्त्रे विकत घेऊ अशी शासनाची हमी असल्याशिवाय खाजगी कारखानदार त्या फंदात पडतच नाहीत. थोडक्यात आज शस्त्रांचे खाजगी कारखानदार स्वतःचा पैसा शस्त्र निर्मितीत क्वचितच वापरतात. खाजगी शस्त्र विक्री अनैतिक पण तीच शस्त्रे शासन जेव्हा विकते तेव्हा ते प्रतिष्ठितपणाचे ही जनतेची आज भावना आहे. त्यामुळे कोल्ट, रेमिंग्टन, जनरल इलेक्ट्रिक या अमेरिकन कंपन्या, तसेच फ्रान्समधील शुनिडर (Schneider) सारख्या कंपन्या किंवा त्यांच्या उपकंपन्या शस्त्रे निर्माण करतात; पण विकत तर नाहीच; पण विकतो हे देखील मोठ्या अनिच्छेने मान्य करतात. त्यांचे म्हणणे एका अर्थाने खरे देखील आहे. या कंपन्यांनी आपले लक्ष आता विजेची उपकरणी, मोटारी, स्कूटर्स, अधिकोष, खाणी इ. अनेक व्यवसायाकडे अधिकाधिक केंद्रीत केले आहे. त्यांच्या भांडवलापैकी सिंहाचा वाटा वरील वस्तूंच्या निर्मितीवर खर्च होतो. शस्त्र निर्मिती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय नाहीच.

याचा अर्थ शस्त्रनिर्मितीला महत्त्व देणाऱ्या व त्यांची परदेशात विक्री करणाऱ्या कंपन्या आता नाहीत असे नाही. १९६६ नंतरची फ्रान्सची टी. एच्.–एच्. बी तसेच हिसपॅनो–सुईझा (Hispano–Suiza), बेल्जिममधील एफ्. एन्. कंपनी, बोफोर्स (Bofors) एस्. एम्बी (SAAB) या स्वीडनमधील व स्वित्झर्लंडमधील एस्. आय्. जी. या कंपन्या आजही शस्त्रनिर्मिती करतात व परदेशात विक्री करतात.

## लोकशाही शासन : शस्त्रविक्रेते

अमेरिकन शासनाच्या संरक्षणखात्याचे अनेक विभाग आहेत. इंटरनॅशनल सेक्युरिटी अफेअर्स डिव्हीजन हा त्यापैकी एक आहे. इंटरनॅशनल लोजिस्टिक निगोशिएशन्स सेक्शन, हा त्याचा एक उपविभाग आहे. या उपविभागाच्या कार्यालयात कोठेही शस्त्रे दिसणार नाहीत. इतर कार्यालयाप्रमाणे या कार्यालयाचे स्वरूप आहे. येथे शस्त्रांची विक्री होते हे सांगावे लागते. या उपविभागाचे कार्य युद्धापूर्वी आंतरराष्ट्रीय स्वरूपाची सैन्यरचना कशी असावी यासंबंधी विचारविनिमय करणे हे आहे. सैन्यरचनेत सैन्याच्या हालचाली व सैन्य कोठे ठेवावे यांचा अंतर्भाव असल्याने सैन्यरचना तज्ज्ञांचा यात समावेश असतो. शस्त्रविक्रीचे समर्थनार्थ असा या उपविभागाचा निश्चित दृष्टिकोन आहे.

अमेरिकन शासनाने दरवर्षी २ बिलीयन डॉलर्सची शस्त्रे विकल्याने पश्चिम जगताच्या सामुहिक सुरक्षेला बळकटी येते. त्यामुळे दोस्त राष्ट्रांच्या सैन्यरचनेत सहकार्य निर्माण होते. परदेशात असणाऱ्या अमेरिकन सैन्यावरील खर्चही कमी होतो. हे फायदे असून देखील, हा विभाग कधीही ज्या देशाला शस्त्रे विकत घेणे परवडत नाही किंवा ज्यांना शस्त्रे विकणे सामुहिक सुरक्षेला घातक आहे अशा राष्ट्रांना शस्त्रे विकीत नाही. इतर राष्ट्रांनी आपणाकडूनच शस्त्रे विकत घ्यावीत ह्यासाठी हा उपविभाग दबाव तंत्राचा वापर करीत नाही. इतकेच काय पण जी शस्त्रे इतरांना इतरत्र स्वस्तात विकत मिळू शकतात त्यांना ती शस्त्रे हा उपविभाग विकत नाही. या उपविभागाचे निर्णयात गुप्तता नाही. शासनाच्या इतर खात्यांशी हा उपविभाग चर्चा व सहकार्य करूनच निर्णय घेतो. अमेरिकन काँग्रेसला सर्वच माहिती नेहमी पुरविली जाते. या उपविभागाच्या शस्त्रविक्रीमुळे गंभीर स्वरूपाचे राजकीय प्रतिसंघर्ष तर निर्माण होतच नाहीत; पण शस्त्रस्पर्धा ही वाढत नाही.

अमेरिकन शासनाच्या शस्त्रविक्री करण्याच्या धोरणाचे हे समर्थन अनेकांना पटत नाही; पण यात नवल नाही. लोकशाहीत मतभेद हे राहणारच.

दुसऱ्या महायुद्धानंतर लगेच अमेरिकन शासनाने शस्त्रविक्री सुरू केली नाही; पण त्या धोरणाचे आजचे फलीत हेच आहे. सुरुवातीला अमेरिकन शासन अतिरिक्त शस्त्रे विकीत नव्हते तर दोस्तराष्ट्रांना वाटत होते. त्यासाठी वेळोवेळी प्रथम आवश्यक ते विधिनियम मंजूर करण्यात आले होते. युरोपातील अमेरिकेची दोस्त राष्ट्रे, दक्षिण कोरिया, फिलीपाईन्स, तैवान, मध्यपूर्वेतील अनेक राष्ट्रे व लॅटिन अमेरिकेतील राष्ट्रे यांना अतिरिक्त शस्त्रे अमेरिका पूर्वी मदत म्हणून देई. अमेरिकेच्या भूदल, नौदल व वायुदलाजवळची अतिरिक्त शस्त्रे संरक्षणखाते विकत घेई. वरील राष्ट्रांना देई. यामुळे सैन्यदलांना जो पैसा मिळे, त्यातून ही तिन्ही दले नवीन शस्त्रे वास्तविक विकत घेई ज्यावर अमेरिकन काँग्रेसचे प्रत्यक्ष नियंत्रण नसे.

ज्या राष्ट्रांना ही शस्त्रे मिळत त्यांची आर्थिक क्षमता शस्त्रे विकत घेण्याची नसे व अमेरिकाही शस्त्रे विकत नसे. त्यामुळे शस्त्रे मागणारे देश जास्त व शस्त्रे कमी अशी परिस्थिती निर्माण झाली. हे नक्की केव्हा घडले हे सांगणे कठीण आहे; पण एवढे खरे की १९५० च्या मध्यांत तिन्ही दलाकडून नवीन, कोरी शस्त्रे विकत घेऊन ती अमेरिकन शासन आपल्या मित्र राष्ट्रांना देऊ लागली.

१९५५ पर्यंत बहुतेक युरोपीय राष्ट्रांची आर्थिक परिस्थिती सुधारली; परंतु जेट फायटर व बॉम्बर्ससारखी शस्त्रे फक्त इग्लंड व फ्रान्सच करू शके. अमेरिकेची बाकीची पश्चिम युरोपीय मित्र राष्ट्रे अन्य शस्त्रे तयार करीत होती. त्यांना हवी होती अद्ययावत शस्त्रे व ती करणे परवडत नव्हते. त्यामुळे अमेरिकन शासकीय वर्तुळात असा विचार प्रवाह निर्माण झाला की आता दोस्त राष्ट्रांनी शस्त्रांचे पैसे द्यावेत. ही राष्ट्रे आर्थिकदृष्ट्या सुधारली होती हे खरे; पण देण्याइतके शिलकी डॉलर्स त्यांचे जवळ नव्हते. यातून मार्ग निघाला तो संयुक्त शस्त्र निर्मितीचा.

## साम्यवादी राष्ट्रे : शस्त्र विक्रेते

तंत्रज्ञान अमेरिकेने पुरवावे. त्या त्या देशांच्या भूमीवर त्यांनी स्वखर्चाने अमेरिकन बनावटीची शस्त्रे बनवावीत. पश्चिम जर्मनी, बेल्जियम, हॉलंड, फ्रान्ससारख्या देशांनी या योजनेचा लाभ घेतला. त्यामुळे त्या देशांचे परकीय चलन वाचते. त्याचे स्वतःचे अतिरिक्त चलन वापरून त्या देशात लष्करी साहित्य व शस्त्रे निर्माण होऊ लागली. त्या देशांचे शस्त्र निर्मितीच्या क्षेत्रातील ज्ञान अद्ययावत झाले. या देशांचे जसे हे तीन फायदे झाले तसा अमेरिकेचाही लाभ झाला. अमेरिकेच्या शस्त्रनिर्मिती कारखानदारांना लायसन्स फीच्या रूपाने डॉलर्स मिळाले. युरोपात अमेरिकन तंत्रज्ञान व तंत्रज्ञ गेल्याने परदेशातील डॉलर्स अमेरिकेच्या खजिन्यात जमा झाले. या योजनेचे संपूर्ण अविष्करण होण्यास १९५९ साल उजाडले.

१९६१ मध्ये रॉबर्ट एस्. मॅकनामारा (Robert S. Mc Namara) हे सेक्रेटरी ऑफ डिफेन्स बनले. संयुक्त शस्त्र निर्मितीऐवजी अमेरिकन शासनाने शस्त्र विक्री करावी, या धोरणाचा आता प्रारंभ झाला.

अमेरिकन शासनाप्रमाणेच, आज इंग्लंड, फ्रान्स या देशांची शासनेदेखील शस्त्र विक्रीचा व्यवसाय करतात. इस्रायल, इटाली, व स्वीडन या देशांच्या शासनांनी त्या त्या देशाच्या शस्त्र विक्री व्यवसायात गुंतवणूक केली आहे. बेल्जियम, स्वित्झर्लंडसारख्या देशांत शस्त्रनिर्मिती व्यवसायावर शासनाचे नियंत्रण नाही; पण परदेशी शस्त्रविक्रीवर नियंत्रण आहे. थोडक्यात ज्यांना लोकशाहीप्रधान देश मानले जाते, त्या देशांची शासने शस्त्रविक्री व्यवसायाशी निगडीत आहेत. ह्या श्रीमंत लोकशाही राष्ट्रांचे गिऱ्हाईक आहेत एके काळच्या वसाहती व आजची गरीब, अर्धविकसित स्वतंत्र राष्ट्रे उदा. भारत, पाकिस्तान, घाना, सिंगापूर, सोमाली, अर्जेंटिना, चिली, पेरू, नायजेरिया इ. देश.

१९१७ मध्ये साम्यवादी क्रांती रशियांत झाली. झारशाही नष्ट केलेल्या या राष्ट्राने क्रांतीच्या ज्वाला जगात पसरवून जागतिक साम्यवादी क्रांती यशस्वी करण्याचे व भांडवलशाही जगतातील अंतर्विरोधाचा फायदा घेण्याचे परराष्ट्रीय धोरण आखले. साम्यवादी रशियाच्या परराष्ट्रीय धोरणाचा भाग म्हणून या देशाने शस्त्रांचा व्यवसाय केला, उदाहरणार्थ १९२१ च्या तुर्क-ग्रीस युद्धात तुर्कस्थानला शस्त्रे पुरविली. १९२० व १९३० मध्ये जर्मनीला शस्त्रसज्ज करण्यासाठी गुप्तपणे मदत केली व १९२८ मध्ये येमेन (Yemen) मध्ये क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

१९३० ते १९५३ या स्टॅलिन कालखंडात, साम्यवादी रशियाच्या उद्दिष्टांत बदल झाला. रशियात समाजवाद निर्माण करण्याचे ध्येय समोर ठेवले गेले; परंतु तरीही दुसऱ्या महायुद्धापूर्वी भांडवलशाही राष्ट्रांचा प्रभाव कमी करण्याच्या प्रयत्नात शस्त्रांची मदत घेण्यात आली. उदा. स्पॅनिश यादवी युद्धात लॉयलिस्ट गटाला साम्यवादी रशियाने लष्करी मदत केली.

दुसऱ्या महायुद्धानंतर साम्यवादी रशिया अन्य देशांतील मुक्ती लढ्यांना लष्करी मदत देऊ लागले. १९५४ मध्ये सिटियामधील पाश्चात्य विरोधी राजवटीला व ग्वाटेमालामधील रॅडिकल राजवटीला साम्यवादी रशियाने शस्त्रे पुरविली. १९५० नंतर साम्यवादी चीनच्या प्रभावाला कमी करण्याचे धोरणासाठीदेखील या राष्ट्राने शस्त्रे पुरविण्याचे कार्य केले.

१९५५ ते १९६० या काळात साम्यवादी रशियाने प्रामुख्याने इजिप्त, सिरिया, इराक व इंडोनेशिया या देशांना आपल्या जवळची जादा शस्त्रे विकली. ही सर्वच शस्त्रे तत्कालीन अद्ययावत शस्त्रांच्या तुलनेत अप्रचलित म्हणजे जुनी होती. १९६० नंतर मात्र ज्यांना शस्त्रे पुरवायची त्यांची यादी ही वाढविण्यात आली व अप्रचलित शस्त्राऐवजी अद्ययावत शस्त्रे हा देश पुरवू लागला. हा बदल घडला तो प्रामुख्याने १९५३ नंतर. साम्यवादी रशियाने भूदलावरील भर कमी करून वायुदलाकडे लक्ष दिले. १९६० नंतर नाविकदल वाढविण्यास सुरुवात केली. त्यामुळे तत्कालीन शस्त्रांची जागा नव्या प्रकारच्या शस्त्रांनी घेतली. त्यामुळे पूर्वीची शस्त्रे अतिरिक्त ठरली व प्रथम ती विक्रीसाठी उपलब्ध करून दिली गेली.

अमेरिकेशी उघड संघर्ष होण्याची जेथे शक्यता असते तेथे बल्गेरिया, पूर्व जर्मनी, पोलंड, झेकोस्लोव्हाकिया या राष्ट्रांचा मध्यस्थ म्हणून साम्यवादी रशिया वापर करते. साम्यवादी रशियाच्या नियंत्रणातून अंशतः मोकळी झालेली ही राष्ट्रेदेखील शस्त्रविक्री व्यवसाय करतात. साम्यवादी चीनची शस्त्रविक्री साम्यवादी रशियाच्या मानाने कमी असली तरी नगण्य नाही.

१९५० नंतरच्या काळात वसाहतवादाचे जोखड फेकून स्वतंत्र बनलेली राष्ट्रे ही शस्त्रांची हुकमी बाजारपेठ आहे. या देशांना राष्ट्रवादाचे जबरदस्त आकर्षण आहे. त्यामुळे शस्त्राच्या मोबदल्यात ही राष्ट्रे कायमची निष्ठा कोणालाही देण्यास तयार नसावीत; पण राष्ट्रीय प्रतिष्ठा अंतर्गत सुरक्षा, सार्वभौमत्वाचे रक्षण व मुक्तीलढे या विविध कारणासाठी या नवोदित राष्ट्रांची शस्त्रांची भूक कायम आहे. ही सर्वच राष्ट्रे आपल्या अविकसित, अर्धविकसित, मागासलेल्या राष्ट्राच्या राष्ट्रीय संपत्तीपैकी बराच भाग शस्त्र खरेदीवर खर्च करतात. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतरचे फारच थोडे सशस्त्र संघर्ष युरोपच्या व अमेरिकेच्या भूमीवर घडले आहेत.

१९४५ नंतर इजिप्तला जर आधुनिक शस्त्रे प्राप्त झाली नसती

तर १९५६ व १९६७ ची इजिप्त–इस्रायल युद्धे झाली नसती. इंडोनेशियाचा मलेशिया व वेस्टइंडियनशी संघर्ष टळला असता. आफ्रिकेमधील फेडरल विरुद्ध बायफ्रान या यादवी संघर्षात नरसंहार झाला नसता. इतकेच काय पण १९६५ चे भारत पाकिस्तान युद्ध, कोरीयन युद्ध व व्हिएतनाम संघर्ष इतक्या संहारकतेने लढले गेले नसते. ह्या विधानामधील अतिव्याप्तीचा दोष लक्षात येऊन ही, असे म्हटल्याशिवाय राहावत नाही की राजकीय वादाचे रूपांतर युद्धात होणे हे प्रामुख्याने मृत्यूच्या आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्यांचे धोरणाचे फलीत आहे.

आज लहानांतील लहान खेड्यांतील, गरीबांतील गरीबाचे घरी सकाळी चुलीवर पाणी उकळते ते चहासाखरेच्या मिश्रणांचे; पण जेव्हा चहा माहीत नव्हता तेव्हा ग्रामीण जनतेला चहाची भुकटी कंपन्यांनी फुकट वाटली. आठवडी बाजारांत येणाऱ्या ग्रामीण जनतेला तयार चहा आग्रहाने बोलावून पाजला. आज याच ग्रामीण जनतेला बिनदुधाचा चहाचा पेला सकाळी हवा असतो. स्वातंत्र्यप्रेम व देशभक्ती या प्रादेशिक राष्ट्रवादापेक्षा भिन्न भावना आहेत. पहिल्या दोन दुसऱ्यापेक्षा जास्त नैसर्गिक आहेत; पण युरोपीय देशांनी प्रथम स्वतःच्या प्रादेशिक राष्ट्रवादाच्या कैफात युरोपला जवळजवळ १०० वर्षे युद्धभूमी बनविले. याच काळात प्रादेशिक राष्ट्रवादाचा उन्मादी अभिनिवेश अन्य देशांचे स्वातंत्र्य व देशप्रेमात मिसळवून काळ्या युरोपची कृष्णछाया संपूर्ण जगावर निर्माण केली.

पांढऱ्या युरोपने मानवाला खूप दिले; पण काळ्या युरोपने त्याचा मोबदला ही तितकाच वसूल केला, हे ज्या दिवशी समजेल तो सुदिन. □

(The war Business या George Thayer यांच्या ग्रंथाचा अनेक जागी आधार घेण्यात आला आहे.)

---

## पुस्तके

# वृक्षगान । मी, जेनी

रंगा मराठे

---

### □ वृक्षांची आनंदयात्रा

वृक्षवल्ली, वनचरे आणि पक्षी हे आपले सोयरे आहेत. पुरातन काळापासून वृक्षांचं आणि आपलं अतूट नातं आहे. हे नातं, ही मैत्री हा सहवास यातला जिव्हाळा अपूर्व आहे. कण्वमुनींचा आश्रम सोडून शकुंतला जेव्हा सासरी जायला निघते तेव्हा अश्रुपूर्ण नयनांनी वृक्षवल्लींना मिठी मारून ती त्यांचा निरोप घेते त्यावेळचं कालिदासानं केलेलं वर्णन अद्वितीय आहे. त्यात वृक्षवल्लींना उद्देशून म्हटलं आहे,

'जी शकुंतला तुम्हाला पाणी दिल्याशिवाय स्वतः पाणी पीत नाही, तुमच्या पानांना दुखापत न करता जी नाजूक हातानं लतामंडप करते, तुमची फुलं आणि फळं बहरण्याच्या प्रसूती काळात व नंतर जी तुमची काळजी घेते आणि आनंदोत्सव साजरा करते ती तुमची प्रिय शकुंतला आज सासरी जायला निघाली आहे. तिला तुम्ही परवानगी द्या.'

वृक्षांची भाषा वेद काळात रानावनात तप करणाऱ्या ऋषीमुनींना समजत होती. त्याकाळात वृक्ष हे खरोखरच जीवाभावाचे सखेसोबती होते. वृक्षांना कोणी दुखापत केली, इजा केली तर पूर्वीच्या काळात अशा माणसांना राजसत्तेकडून जबर शिक्षा ठोठावली जात असे. आज मात्र बकाल आणि वाढत्या लोकवस्तींच्या नगरांमुळे वृक्षांचे अनोखे वैभव पार ओसंडून गेलं आहे. वृक्षांच्या सहवासाला, मैत्रीला आणि प्रेमाला आपण मुकलो आहोत. किंबहुना आपल्या आजुबाजूला असलेल्या वृक्षाची नावंही आपल्याला धड माहीत नसतात. आपण त्यांची औत्सुक्याने कधी चौकशीही करीत नाही. अशा वेळी वृक्षांबद्दल औत्सुक्य आणि कुतुहल निर्माण करणारं 'वृक्षगान' हे पुस्तक हाती पडल्यावर आणि वाचून संपवल्यावर रखरखीत उन्हातून प्रवास करताना वृक्षाच्या शीतल छायेत विसावा घेतल्याचा आनंद मिळतो.

या पुस्तकाची वाटचाल करताना अनेक वृक्षांची, त्यांच्या पाना, फुलाफळांची आपली गाठभेट होते. चाफा, गुलमोहर, बाभळी, बहवा, तामणी, पळस, पांगारा, साग, सुरंगी, बकुळ, मोह यांची ओळख होते. या वृक्षवल्लींचे रंग, रूप आणि गंध मनात मिसळून जातात. त्यांची पानं, फळं, फुलं, खोड, फांद्या आपल्यासमोर सजीव होतात. भाषेतील जिव्हाळ्याने आपण या वृक्षांच्या सान्निध्यात मोहून जातो. आपल्याभोवती या वृक्षांचं 'फ्रेंड सर्कल' तयार होतं. हे वृक्ष हातात हात घालून फेर धरून आपल्याभोवती नाचू लागतात. घराच्या अंगणातला आणि देवळाच्या आवारातला निष्पर्ण देवचाफा फुलू लागतो. उन्हाळ्याच्या रखरखाटात डोळ्यांना स्वर्गसुख देणारा नारिंगी शेंदरी किरमिजी रंगाचा गुलमोहोर दिसू लागतो. त्याच्या गुळगुळीत तपकिरी रेतीचा गिलावा दिल्याप्रमाणे वाटणाऱ्या खोडावरून हात फिरवावासा वाटतो. वेड्या बाभळीच्या पिवळ्या फुलांतील सुगंधात मन गुंतून रहातं. पानांचा पिवळा साज झटपट उतरवून मोकळा होणारा पांगारा, त्याच्या फुलांना गंध नसला तरी पक्ष्यांना आवडणारी त्याची फुलं उन्हाळ्यात सुंदर पावसाळ्यात प्रसन्न. अगदी हळुवारपणे एकेक दागिना उतरवावा तशी मोजकी तांबुस पानं गाळणारी तामण, सावरीच्या किरमिजी खुळाने मंत्रचळ लागलेल्या फुलांच्या पेल्यातून रस चोखणाऱ्या धिटुकल्या खारी हे सारं निसर्गाचं, वृक्षांचं रूप पहावसं वाटतं. पळस, पांगारा आणि सावर हे सारेच वृक्ष असे आहेत. पळसाच्या शेंदरी जिभा, पांगाऱ्याचे लाल दिवे आणि सावरीच्या फांदी फांदीवर जडवलेले किरमिजी चांदवे. सारच लोभस पण ती दृष्टी मात्र असायला हवी.

या वृक्षांच्या सौंदर्याबरोबरच त्यांची वैशिष्ट्य आणि स्वभावधर्म लेखिकेनं छान टिपले आहेत. उंच असला तरी गर्विष्ट न

वाटणारा साग बहरलेल्या सुरंगीचा ढंग, अंतरंगात शिरल्याशिवाय न समजणारं संकोची बकुळीचं गुपित, टपटप गळून मातीत मिसळणारी बकुलीची फुलं म्हणजे असफल प्रीतीचं प्रतीकच. मोहाचो दृष्टीस न पडणारी फुलं. रात्री उमलणारी आणि सकाळी सूर्यप्रकाशाच्या आत गळून पडणारी हे सारं वर्णन वाचताना वृक्षांनी मानवी रूप धारण केल्याचा क्षणभर भास निर्माण होतो.

वृक्षांची ही रूपं आणि स्वभावधर्म पहाता पहाता आपण मधूनच पुरातन काळात जातो. ज्या झाडावरून श्रीकृष्णाने कालिया मर्दनासाठी यमुनेत उडी घेतली, ज्या झाडावर श्रीकृष्णाने यमुनेत स्नान करणाऱ्या गोपींची वस्त्रं लपवली तो कदंबवृक्ष भेटतो. बुद्धजन्म झाला तो अशोक, वड (वटवृक्ष) पिंपळ (हा तर पुण्यवृक्ष. श्रीकृष्णाने पिंपळाखालीच देहत्याग केला) हे थोर भारतीय परंपरा असलेले वृक्ष मनापासून भेटले नाहीत म्हणून अस्वस्थता वाटते.

पण त्याहीपेक्षा परदेशातून आलेल्या आपल्या सख्या सोयऱ्यांच्या चालीरीती आणि नावं उच्चारताना तारांबळ उडते. आपल्या भारतीय वृक्षांची व फुलांची इंग्रजी नावं व त्या मागचा इतिहास वाचून गंमत वाटते. पांढऱ्या देव चाफ्याचं इंग्रजी नाव टेंपल ट्री सिलोनी नाव पॅगोडा ट्री. लाल चाफ्याचं फ्रेंच नाव प्लुमेरिआ. गोऱ्या साहेबानं ठेवलेलं नाव डेड मॅन्स फ्लॉवर. दक्षिण अमेरिकेतून आलेला पेल्टो फोरम. बहव्याचं इंग्रजी नाव गोल्डन शॉवर्स. गुलाबी कॅशियाच्या पोटजातीचं नाव काय तर नोडोसा, ग्रॅण्डीस, रेनिजरा मार्जीनाटा नाव लक्षात रहाणं फारच कठीण. तामणीच नाव काय तर लॉगर स्ट्रेमिया फ्लॉसरेजिना. पांगाऱ्याच्या एका जातीचं नाव हरिथिना सुबरोसा. असबेरिया बॉल्व्हिलिस असं वनस्पती शास्त्रातलं नाव असलेल्या झाडाला मंकी पझल या नावाने ओळखतात. काटे सावरी किंवा शाल्मली या वृक्षाचं लॅटिन नाव सल्मेलिद ममबेरिकम. अशोकाच्या पालवीला प्रतिस्पर्धी म्हणजे अमर्हस्टिया नोब्रिलिस आणि बाऊनिया या विलायती झाडांची पालवी. बुचाच्या झाडाचं इंग्रजी नाव 'इंडियन कॉर्कट्री' मलेशिया आणि ब्रह्मदेशातून आलेल्या बुचाच्या झाडाचं नाव आहे मिलिंगटोमिया हार्टेन्सिस, डॉ. क्लॉइन हाफची स्मृती जागवीत उभ्या असलेल्या वृक्षाचं नाव क्लॉइन हॉविया हॉस्पिटा. नैरोबीत जिथं तिथं दिसणारे स्पॉथोडिया आणि जॅकरांडा हे वृक्ष आणि ब्राझीलमधील मायमोसी फोलिया. ब्राझीलमधून भारतात पाहुण्या आलेल्या आणखी एका वृक्षाचं नाव आहे टॅबेबुया क्रिझांथिआ. या परदेशी पाहुण्या वृक्षांची नावं आणि त्यांच्या पाना फुलातले बारकावे लक्षात ठेवताना जीव कासावीस होतो. हे वृक्ष भारतीय मनात फारसे रूजतच नाहीत.

तरीसुद्धा वृक्षगानाच्या या आनंद यात्रेत अनेक वृक्ष मनाला चिरआनंद देऊन जातात. संध्याकाळ झाली की पानं मिटून उदास होऊन बसणारा पर्जन्य वृक्ष. या घरंदाज वृक्षावर संध्याकाळी पाखरं घरट्यात परतली की होणारा पक्षांचा किलकिलाट. त्या पार्श्वसंगितावर होणारं आखीव फांद्यांचं मनाला मोहून टाकणारं नृत्य, गायत्रीच्या झाडावरची मोहक हास्य करून ओळख करून देणारी फुलं आपल्या फळांनी नजरबंदी करणारे 'सॉसेजट्री' राखाडी रंगाच्या या फळांचं चांदण्यांच्या परीसस्पर्शाने झालेलं साजरं गोजरं रूप. वाटसरूंना सावली देणार कडुलिंब करंज आणि चिंचेची झाडं. पुरातन काळापासून मानव जातीच्या जिभेला आस्वाद देणारा आम्रवृक्ष हे सारे वृक्ष या वृक्षगानात सामील झाले आहेत.

वृक्षांच्या या भेटीगाठीत आणखीही बरेच सोबती भेटतात त्यातले जांभुळ, फणस, काजू हे कोकण किंवा गोव्याचे रहिवाशी, जिभेचा आस्वाद वाढवणारे मनाला तजेला आणणारे, मग ऐकू येतं नैसर्गिक रीतीनं वाढणाऱ्या सुरुच्या बनातील वृंदगान. त्यापाठोपाठ बांबूची कळक बेटं दिसू लागतात. यांनीच त्यांच्या नाजूक पत्तीनी चिनी जपान्यांना चित्रासाठी कायम विषय मिळवून दिला. त्याबरोबरच बांबूच्या लज्जतदार कोंबांचा आस्वाद जिभेवर तरळू लागतो. या वृक्ष मित्रांच्या भेटी गाठी यांची मोजदाद तरी किती करायची? आकाशाचा वेध घेणारे गोव्यातले देखणे माड हे एकार्थाने कल्पवृक्षच. ताड, नीर फणस, राय आवळा बिमल करमळ एव्हरग्रीन महागनीचा प्रचंड वृक्ष आणि घराच्या मागील अंगणात वाट पहात उभा असलेला शवगा हे सारे मित्रही वृक्ष यात्रेत सामील होतात.

वृक्षवल्ली म्हणजे अनादिकाळापासून अखिल मानवजातीला आणि पशुपक्षांना निसर्गानं दिलेलं अमोल वरदान आहे. ते आजही आपले जिवाभावाचे सखे सोयरे आहेत याची जाणीव वृक्षगान वाचताना पदोपदी होते. वृक्षांच्या आनंदयात्रेत दाखल झालेल्या वाचकांच्या मनातले वृक्षप्रेम जागृत आणि जागरूक होईल यात तिळमात्र शंका नाही. *

वृक्षगान
लेखिका : शरदिनी डहाणूकर
श्री विद्या प्रकाशन, पुणे
मूल्य : ४५ रुपये

---

## वेगळं आत्मकथन

---

जेनी नामक कुत्रीचं हे आत्मचरित्र. माणसांपेक्षाही कुत्रा प्रामाणिक आहे. मालकाशी इमान राखणं वेळप्रसंग आला तर त्याच्याकरिता आत्मसमर्पण करणं हा कुत्र्याचा धर्म आहे. शिवाजीमहाराजांच्या चितेत कुत्र्यानं उडी मारली ती साक्ष रायगडावर आहे. जनावरांना बोलता येत नाही. लिहिता तर मुळीच येत नाही. ते शक्य झालं असतं तर आगळंवेगळं आत्मकथन वाचकांना उपलब्ध झालं असतं. प्रामाणिकपणा हा गुणधर्म माणसात फारच दुर्लभ त्यामुळे निखळ सत्य सांगणारी आत्मकथा फारच दुर्मिळ. माणसाचं आणि कुत्र्याचं नातं अधिक जवळचं. कुत्रा मालकावर प्रेम करतो तसंच मालकही कुत्र्यावर प्रेम करतो. कुत्र्याच्या संवेदना (instincts) तीव्र असतात. जेनी या कुत्रीच्या संवेदनांचा मागोवा घेऊन तिच्या मालकांनी तिच्या वतीनं म्हणजे first person narration मध्ये लिहिलेलं तिचं आत्मचरित्र-मी, जेनी. निवेदनाचे हे स्वरूप लक्षात आल्यानंतर ही आत्मकथा समजून घेणं अगदी सुलभ होतं.

जेनी ही थोर कुळातली शिकार जातीची (गोल्डन रिट्रायव्हर जातीची) जेनीला

तिच्या संकट सात भावंडं. मूळ मालक श्रीमंत ख्यातनाम वकील. मलबारहिलवरील प्रशस्त बंगल्यात निवास. तिच्या सहाही भावंडांना तिचे मालक कुणाला ना कुणाला तरी देऊन टाकतात. या सर्व भावंडात जेनी दिसायला सुंदर. या जेनीला घेऊन ते आपल्या पुण्याच्या बंगल्यात येतात तिथून त्यांच्या सेक्रेटरीकडे व नंतर ती सारस्वत बंगल्याच्या मालकांकडे दाखल होते. हेच जेनीचे खरे मालक तिला शेवटपर्यंत साथ देतात. या वेळी जेनीचं वय दोन ते तीन महिन्याचं असतं.

जेनी सोनेरी केसांची. सुवर्णासारखी. तिला पाहून महादेवशास्त्री जोशी म्हणतात, 'हिला जेनी का म्हणता? हिला सोनी म्हणा सोनी.' जेनीच्या निवेदनात घरातल्या कुटुंबीय मंडळीचा परिचय स्वाभाविकच होतो त्याशिवाय घरात वावरणाऱ्या नोकर-मंडळींची ओळखही चांगल्या प्रकारे होते. घरमालक आणि त्यांच्या कुटुंबीयांना जेनी फारच आवडते. सारीच मालकमंडळी प्रेमळ त्यामुळे 'सारस्वत' परिवाराचा दोन-तीन महिन्याची जेनी एक अविभाज्य घटक होऊन बसते.

मालकांच्या घरी येऊन दाखल झाल्यावर जेनीच्या बऱ्याच गोष्टी लक्षात येतात. धुण्या-भांड्याला येणाऱ्या शेवंताबाईची मुलगी चोरटी असते. घरकाम करणारा तुक्या 'हात चलाखीत' उस्ताद असतो. त्यानं चोरून लपवून ठेवलेली मालकांची अंगठी ती शोधून काढते. वर्षाची झाल्यावर जेनी वयात येते मग तिचं प्रियाराधन सुरू होतं. तिच्या वासावर असलेला लाल्या पराभूत होऊन शेजारच्या बंगल्यातल्या काळ्याचं आणि तिचं 'मीलन' होतं. काळ्या आणि जेनीच्या मीलनाचा प्रदीर्घ प्रसंग चवीनं रंगवला आहे, इतका की त्या प्रसंगानंतर जेनीसुद्धा अंगणात येऊन थरथरत उभी रहाते आणि लज्जेनं खाली मान घालते.

त्यानंतर डिसोझांचा खास गोल्डन रिट्रायव्हर जोन नामक कुत्रा पाहुणा म्हणून आणला जातो. त्याचं आणि जेनीचं मुद्दाम घडवून आणलेलं प्रियाराधन आणि मीलन. या मीलनाचा साग्रसंगीत प्रसंग आणि त्याची सांगता त्याच्या खास बारकाव्यांसह रसभरित वर्णन. मग जेनीच्या शरीरात होत असलेला बदल, तिचं गरोदर रहाणं, तिचं बाळंतपण, तिला झालेली सात गोजिरवाणी पिल्लं. त्यांचं संगोपन आणि दुग्धपान. शेवटी जेनीच्या आणि आपल्या प्रेमात वाटेकरी नको म्हणून मालकांनी केलेलं पिल्लांचं वाटप.

जेनीचं आयुष्य सात-आठ वर्षाचं. या तिच्या आयुष्यात छोटे-मोठे प्रसंग येतात. थेऊरच्या ट्रिपमध्ये नदीच्या भोवऱ्यात सापडल्यामुळे तिच्यावर व तिच्या मालकांवर गुदरलेला प्रसंग व त्यातून सुटका. ११६१ च्या जुलैत पानशेत धरण फुटल्यामुळे सारस्वतवर ओढवलेला प्रसंग. सारस्वतची चिखलात लडबडलेली वास्तू पाहून जेनीच्या मनात उठलेली कालवाकालव. थेऊरच्या संकटातून मुक्तता झाल्यामुळे नवस फेडण्यासाठी आलेल्या आत्याबाई. मोलकरणीची मुलगी मंगला हिनं केलेल्या चोरीचा प्रसंग आणि तुक्या आणि जेनीमधली धुम्मस वाढत जाणारे प्रसंग.

त्यानंतर जेनीचा आजार, तिला झालेला जलोदर, तिचं हॉस्पिटलमधील वास्तव्य आणि मृत्यू या गोष्टीसुद्धा जेनीच्या शब्दात कथन केल्या आहेत; पण याहीपेक्षा कमाल म्हणजे मृत्यूनंतर जेनीचं 'स्वर्गारोहण' त्याचं कारणही मोठं गंमतीशीर आहे. मालकांच्या घरात सदैव छोट्या-मोठ्या चोऱ्या करणारा तुक्या हा जेनीचा सर्वांत मोठा शत्रू. त्याला शेवटी मालक काढून टाकतात म्हणून जेनीचं स्वर्गात पदार्पण होतं. यमराज जेनीला म्हणतात,

'भूतलावर एका मानवाच्या घरात तस्कर शिरला होता. त्या तस्कराला हुसकायचं काम तुझ्या ललाटी लिहिलेलं होतं. आता तुझा जन्म संपला तुला स्वर्ग प्राप्ती झाली.'

इथं जेनीचं आत्मचरित्र संपतं.

जेनीच्या या आत्मकथनात तिचे मालक कुत्र्यावरील माहिती वाचत असतात, त्यावर चर्चा करीत असतात आणि ती माहिती आपल्या कुटुंबीयांना देत असतात. कुत्र्यांना पडणारी स्वप्नं, त्यांना मागचा जन्म आठवतो का? त्यांची स्मरणशक्ती व मानसिक धारणा या विषयावर सारखा उहापोह होत असतो. जेनीच्या तोंडचे काही उद्गारही मोठे गमतीशीर आहेत.

'मी बाबांच्या घरात आल्यापासून कुत्रा या विषयावर आमच्या घरात बरेच वाचन झाले. मंडळी मग वाचलेल्या विषयावर संवाद करीत, चर्चा झडत.'

'कुत्र्याचं फक्त शेपूटच वाकडं असतं ते माणसाचं मन किती वाकडंतिकडं असतं दाखवून दिलं असतं.'

जेनीचं हे आत्मकथन वाचताना एक गोष्ट लक्षात येते की तिच्या मालकांनी आणि त्यांच्या कुटुंबीय मंडळीनी जेनीवर विलक्षण प्रेम केलं. त्यामुळेच जेनीशी फारसा संबंध नसलेले अनेक प्रसंग जेनीच्या आयुष्याशी जोडले गेले आहेत. हे प्रसंग आणि जेनीच्या आयुष्यातील 'काळ्या' आणि 'जॉन' यांच्याशी झालेले मीलनाचे अतिप्रसंग वगळल्यास उरलेला भाग, 'कुत्र्याचे जीवन, संगोपन आणि स्वर्गारोहण' या विषयावरील बाल-वाङ्मय म्हणून उद्बोधक आणि मनोरंजक होईल असे वाटते.

*

मी, जेनी
अ. अं. कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
पृष्ठे १५४.
किंमत ३२ रुपये ५० पैसे.

---

## सुन्न करणारी वेधक कादंबरी

---

'कुणाच्या खांद्यावर' ही बा. ग. केसकर यांची कादंबरी वाचून संपवली आणि अनिल अवचटांची 'माणसं' आठवली. वरवर पाहिलं तर हे विधान केसकरांवर अन्याय करणारं वाटेल पण मला चुकीची तुलना करायची नाही. मला असं सुचवायचं आहे की, 'कादंबरी' या ललितगद्य वाङ्मयप्रकारात हे लेखन मोडत असूनही केवळ लालित्य, भावनांना आवाहन यावर न थांबता मूळ सामाजिक, राजकीय प्रश्नांना हात घालतं, विचारप्रवृत्त करतं. हे या कादंबरीचं सामर्थ्य आहे. 'माणसं' हे तसं ललित गद्य नसूनही समाजातल्या शोषितांचं वास्तव जीवित शब्दांकित करताना, विचारांना धक्के देताना माणुसकीचा ओलावा निर्माण करतं.

माणसं 'चा आकृतिबंध संमिश्र आहे, हे खरं पण तो संपूर्णपणे लालित्याकडे झुकणारा नाही. ते रिपोर्टिंग आहे पण अंतिम परिणाम मन हेलावून टाकण्याचाच होतो. ही जशी 'माणसं 'ची ताकद तशी कथानक, व्यक्तिचित्रणं, संवाद, वातावरणनिर्मिती, यातच वाचकांना गुंगवून न टाकता वैचारिकदृष्टचा सुन्न करणं ही या कादंबरीची ताकद आहे. आपापल्या आकृतिबंधांशी इमान राखून, तो तो प्रभाव राखून, अधिक खूप काही या दोन्ही कलाकृती देतात यात त्याचं मोठंच यश आहे.

साखरकारखान्यांच्या परिसरातलं वातावरण, तिथलं राजकारण, पिळवणूक, अत्याचार, बलात्कार आणि या साऱ्याची परिणती गरीबांच्या मरणात हा या कादंबरीचा विषय आहे. हा विषय आता नवीन राहिलेला नसला तरी जोपर्यंत ही परिस्थिती सुधारत नाही, तोपर्यंत हा विषय लेखकांना आणि वाचकांना आवाहन करीत रहाणं स्वाभाविक आहे.

कादंबरीची नायिका सुरवंता ही रूपाने गोंडस, भरपूर कष्ट करण्याची तयारी असलेली पण कर्जाच्या, अन्यायाच्या चक्रातून बाहेर पडण्याची तीव्र इच्छा असलेली थोडीशी विचार करू शकणारी स्त्री आहे. तिला आपला संसार फुलवायचा आहे. कष्ट करून सुखासमाधानाने जगायचं आहे; पण तिचं रूप घात करतं. कारखान्यातला मुकादम आणि नंतर मालकाचा मुलगा तिच्या देहाची चाळण करतात. ती जिद्दीला पेटते, डाव रचते. मालकाच्या मुलाला खूष ठेवून आपला संसार बहरून टाकण्याचं ठरवते; पण तिच्या नवऱ्याचा काटा काढला जातो. त्या दुःखाने ती वेडी होते. ही सुरवंताची व्यक्तिरेखा लेखकाने अगदी जिवंतपणे साकार केली आहे ती या कादंबरीचा आत्मा आहे. मूळची भोळी-भाबडी, नवऱ्यावर जीव लावणारी, आपला मुलुख सोडून कारखान्याच्या गावी ऊस तोडणीला जायला मिळणार म्हणून हरखलेली, नवी स्वप्नं रचणारी, मातृत्व धुळीत गाडलं गेल्यावर उरी फुटणारी. मुकादमाने केलेल्या बलात्कारामुळे आतून धुमसणारी पण काही दिवसांनी मालकाच्या मुलाचा रूबाब आणि वैभव पाहून त्याच्यावर लोभावलेली, त्याला हवं ते देऊन आपल्या नवऱ्याचा संसार फुलवू पहाणारी...अशी सुरवंताची अनेक रूपं या कादंबरीत पहायला मिळतात. ती अडाणी असली तरी तिला विचार करता येतो आहे. न्याय-अन्याय कळतो आहे. शरीराच्या जाणीवा सूक्ष्म आहेत. मन कात्रीत सापडलेलं असूनही ती धीराने वावरते पण अखेर तिची शोकांतिका होते–ना धड प्रपंच, ना धड शरीरसुख ना वैभव ! काहीच हाती लागत नाही. साखर कारखान्यात आल्यापासून सहा महिन्यांच्या आतच तिचं आयुष्य पार बदलून जातं. काहीही अपराध नसताना मुकादमाकडून भ्रष्ट व्हायला लागलं तेव्हापासून तिच्या व्यक्तिमत्त्वाने नवीन आकार-धारण केला. ती अधिक व्यवहारी, सावध नि चलाख बनली. मालकाच्या मुलाकडून मिळतय ते शरीरसुख का सोडावं, उलट ते घेऊन आपला संसार सुस्थिर करावा अशी महत्त्वाकांक्षा तिच्या मनात निर्माण झाली, तिचं आपल्या नवऱ्यावर प्रेम नव्हतं असं नव्हे; पण शरीरधर्माकडे पहाण्याचा तिचा दृष्टिकोनच बदलला. ती अगतिक बनण्याऐवजी, समर्थ बनण्याचा प्रयत्न करू लागली. ही व्यक्तिरेखा अथपासून इतिपर्यंत हाडामासाची आहे. फार सचेत आहे. तिचा व्यभिचार अनैतिक असला तरी ती ज्या कोंडीत सापडलेली आहे त्यातून सुटायला तिला समाजाने दुसरा मार्ग शिल्लक ठेवलेला नाही हे कटु सत्य नाकारता येणार नाही. पिढ्यानुपिढ्या मरेमरेस्तो कष्ट नि कर्जाचा बोजा या चक्रातून सुटका कधी ? कशी ? या प्रश्नांची उत्तरं शोधण्यात तिची मती गुंतली असताना आयुष्यात अचानक आलेल्या वादळाने तारू दिशाच बदलतं. ही शोकांतिका एकट्या सुरवंताची नाही तर अशा परिस्थितीत कष्ट करणाऱ्या कुणाही श्रमिक स्त्रीची आहे. पैसा आणि सत्ता हाती असलेल्यांना कुणाचंही आयुष्य धुळीला मिळवता येतं आणि या माणसांशी जुगार खेळू पहाणाऱ्यांना सर्व दृष्टीने पराभूत व्हावं लागतं हे आजच्या समाजाचं भयानक चित्र आहे.

सुरवंताच्या तुलनेने तिच्या नवऱ्याचं व्यक्तिचित्र तितकंसं ठसठशीत नाही. तो प्राप्त परिस्थितीशी सहजतेनं जुळवून घेतो, त्याचं मन बंड करीत नाहीत. सुरवंता परिस्थितीशी जुळवून घेते ती वेगळ्या अर्थाने !

कादंबरीची भाषा अर्थातच ग्रामीण बोली भाषा आहे. लेखकाची शैली अतिशय सहज-सुंदर प्रभावी आहे भाषा वातावरणनिर्मिती, व्यक्तिदर्शन हे सारंच पुस्तक खाली ठेवू नये असं वाटायला लागणारं आहे. सुरवंताच्या मनातले विचार व्यक्त करीत असताना क्वचित ही खेडवळ, अशिक्षित स्त्री आहे याचा लेखकाला विसर पडतो, एखादं अधिक विचारप्रवर्तक वाक्य काहीशा नागर भाषेत तो लिहून जातो पण हा दोष गौण आहे.

कादंबरीतली निसर्गवर्णनं, ऊस-तोडणीच्या वेळचे प्रसंग लेखकाने दृष्टिगोचर केले आहेत. कादंबरीच्या वाचनीयतेत त्यांचा मोठा वाटा आहे.

एक चांगली कादंबरी वाचकांच्या हाती देण्याचं श्रेय केसकरांना दिलंच पाहिजे.

— मेधा सिधये

'कुणाच्या खांद्यावर '
ले. बा. ग. केसकर
मेहता पब्लिशिंग हाऊस
पृष्ठे १२८, मूल्य : रु. २२/–


मराठीतील एक सच्चे आत्मचरित्र

हंसा वाडकर

**सांगत्ये ऐका**

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव, पुणे ३०

## गारांचा पाऊस

शोभा भागवत

# बदक–ससा–चिमणी

**ती** गोष्ट ऐकल्यापासून मला ती फार आवडलेली आहे. जंगलात प्राण्यांची शाळा काढतात. पोहणं, धावणं, उडणं, झाडावर चढणं, बिळात घुसणं, उडधा मारणं लोंबकळणं असे अनेक विषय असतात. प्रथम प्रत्येकाला काय येतं ते पाहिलं जातं. बदक पोहतं सफाईदार, ससा धावतो जोरदार. चिमणी उडते छान. बदकाला सांगतात ठीक ठीक. पोहणं हा विषय तुझा पक्का आहे आता रोज रस्त्यावर धावायची सवय करायची. सशाला सांगतात धावणं पुरे आता पाण्यात उडी घे बरं आणि नंतर उडायची सवय कर. चिमणीलाही असंच धावायला न पोहायला लावतात. काही काळानी बिचाऱ्या बदकाच्या पायांचे पडदे फाटून जातात, ससा गुदमरून उडून जखमी होतो न् चिमणी आजारीच पडते. त्यांना मुळात जे चांगलं येत होतं तेही करायचं बळ त्यांना उरत नाही. मग त्यांना नापास ठरवतात.

गोष्ट ऐकता ऐकता...ज्यांच्या गुणांना शाळेच्या भाषेत दाद मिळत नाही अशी अनेक मुलं दिसू लागतात. आपण घरीसुद्धा या प्रकारचा अन्याय मुलांवर करत असतो आणि मुलांच्या अंगातले मूळ गुण वाढत नाहीत.

शाळेत नापास होणारा पण मनानी सरळ प्रेमळ, कामसू असा आमचा एक मित्र आज त्याच्या स्कॉलर, माणूसघाण्या, ऑफिसर भावापेक्षा माणूस म्हणून खूप सरस आहे असं वाटतं; पण त्याच्या त्या गुणांना शाळेच्या ढाली–पेले–बक्षिसांच्या भाषेत कधीच दाद मिळाली नव्हती. मुली जेव्हा नवरा पाहतात तेव्हा फर्स्ट क्लास करिअर, उच्च पगाराची नोकरी, उज्ज्वल भविष्य एवढंच पाहून घेतात तेव्हा शारीरिक, भावनिक, मानसिक, बौद्धिक अध्यात्मिक क्षेत्रात हे एकांडे शिलेदार कितपत साथ देऊ शकतील याचा विचार करायला कुणी कसं सांगत नाही ? असा विचार मुलांनाही बायको शोधताना करता यायला हवा. इथे हुषार, करिअरिस्ट म्हणजे नालायक अशी वर्गवारी करायचा हेतू नाही पण शाळेत न चमकलेला म्हणजे नालायक असं वेगळं टोकही कुणी गाठू नये यासाठी हा विचार.

मुलांच्या अंगच्या मूळच्या गुणांचा शोध लागायचा तर त्यासाठी आईवडलांनी बरीच मदत करायला हवी. कित्येकदा काही चांगल्या गोष्टी मुलाबद्दल समजत असतात पण त्या त्याच्यापर्यंत / तिच्यापर्यंत पोचवल्या जात नाहीत.

परिस्थितीमुळे मला मनासारखं वागता आलं नाही, सारखं दडपण होतं अशी माझ्या एका मैत्रिणीची तक्रार होती. त्याबद्दल ती नवऱ्याला दोष देत होती. प्रत्यक्षात काही मानसशास्त्रीय चाचण्यांमधून तिचा स्वभाव असा नाही हे तिला सिद्ध करून दिलं आणि आजवर ती मनासारखंच वागत आली आहे. दडपणं मानणारा तिचा मूळ स्वभाव नाही अस बोलता बोलता निघाल्यावर तिच्या मनावरचं केवढं तरी दडपण निघालं. आत्मविश्वासाला नवी झळाळी आली. स्वतःची ओळख पटली. हे वयाच्या तिशी पस्तिशीत घडायला हवं का ?

पालकांनी जरा लक्ष घातलं तर मुलांना ही स्वतःची ओळख लहान वयात करून देता येते. त्यांचे गुण वाढवता येतात.

एका वडलांनी घरात तीन मुलांच्या नावाच्या तीन पेटचा ठेवल्या होत्या. जे मूल घरासाठी काही करेल–मदत करेल, केर काढील, खरेदी करील, कुणाची काळजी घेईल, नवं काही सुचवेल त्या मुलाला त्याबद्दल ते काही पैसे बक्षीस देत आणि ते त्याच्या नावाच्या पेटीत टाकत.

कुणाच्या मनात असं येईल की म्हणजे पैशाच्या आमिषानं मुलांना घरातली कामं करायची सवय लावायची काय ? मग मुलं कधी प्रेमानं, जबाबदारी, कर्तव्य म्हणून काही करायचीच नाहीत ! हे माझ्याही प्रथम मनात आलं, पण तसं नसतं कितीतरी सवयी त्या सातत्यानं काही दिवस कोणत्या ना कोणत्या निमित्तानं ती गोष्ट करत राहणं यातून लागतात. त्यासाठी अशा बक्षीसांचा उपयोग होतो.

हे उंदरा मांजरासारखे मुलांवर कसले प्रयोग करायचे असंही क्वचित मनात येतं पण काळजीपूर्वक प्रेमानं केलेल्या प्रयोगांनी मुलाचं भलंच होणार असतं ना ? मग त्यात काय चूक ?

प्रत्येक मूल काही ना काही चांगलं करत असतं. कुणी अभ्यास चांगला करतं. कुणी खरेदी छान करतं. कुणी धीट असतं. कुणी माणसांची काळजी घेणारं असतं. कुणी आनंदी असतं. कुणी लाघवी असतं. कुणी कष्टाळू असतं, कुणी शांत असतं, कुणी स्वच्छ राहतं. आपण पालक मुलांच्या ह्या मूळच्या गुणांना दाद देतो का ? आपला मापनदंड अनेकदा शाळेचा अभ्यास, परीक्षेतले मार्क एवढाच असतो. आपापलं मूल काय चांगलं करतं, याचा शोध प्रत्येकानं घेतला पाहिजे. त्याचं कौतुक केलं पाहिजे.

आपल्या एखाद्या चांगल्या गुणाचं, वागण्याचं, मदतीचं कुणी कौतुक केलं की आपल्याला किती बरं वाटतं ! मग मुलांना जर म्हटलं 'आज पाहुणे आले असताना तुम्ही एकदाही आम्हाला हाक मारली नाही. भांडणं, रडारड केही नाही. याबद्दल तुम्हाला बक्षीस देणारे बरं का !' तर त्यांना कसं वाटेल ? हे आपल्या गरजांसाठी मुलांना तसं घडवणं आहे का ? असाही विचार मनात येईल पण तसं नेहमी नसतं.

शाळेच्या अभ्यासात फारशी हुषार नसलेली आमची मुलगी स्वभावानं आनंदी आहे, आपली आपली मन रमवते,तासनतास खेळते, कधी कोणत्याही गोष्टींचा ताप देत नाही, आजारपणातही चिडचीड करत नाही तेव्हा तिला म्हटलं, 'हा फार चांगला गुण आहे बरं का. आनंदी राहणं, दुसऱ्याला ताप न देणं हे मोठेपणीपण कित्येकांना जमत नाही. त्या खेळाडूपणाला आपण मानतो.' आपल्यातही काही खास आहे असा आत्मविश्वास द्यायला हे शब्द पुरेसे असतात. त्याचा परिणाम न येणारी गोष्ट चांगली करण्यात होतो.

मुलं ज्या गोष्टी चांगल्या करतात त्याला प्रोत्साहन देणं, दाद देणं, प्रसंगी बक्षीस देणं यातून त्यांना अधिक चांगलं वागायला आपण मदत करतो. कित्येकदा आपण पालक चुका तेवढ्याच बोलतो. कौतुकानं मुलं शेफारून जातील, डोक्यावर बसतील असं आपल्याला वाटतं ते तेवढं खरं नसतं.

'आज तू मला कामात खूप मदत केलीस याबद्दल मी तुला उसाचा रस पाजणार बरं का'

'ठरलेला अभ्यास सुट्टीत नियमितपणे केला ना म्हणून हे तुला आवडलेलं पेन आणलंय् बघ.'

'बाजारात चिवडा आणायला पाठवल्यावर चिवडा नव्हता म्हणून परस्पर निर्णय घेऊन वेफर्स, फरसाण आणलं या निर्णयाबद्दल काय बक्षीस देऊया?'

अशी मुलांना छोट्या छोट्या बाबतीत दाद मिळत गेली तर त्यांचा आत्मविश्वास वाढायला खूप मदत होते.

केलेल्या चुकांबद्दल शिक्षा करायला, टाकून बोलायला आपण तयार असतो पण अशा चांगल्या गोष्टींना दाद देण्याचं आपण लक्षात ठेवत नाही. नाही का ?

बक्षीस नेहमी वस्तूंच्या स्वरूपातच दिलं पाहिजे असं नाही. मुलाच्या आवडीचा पदार्थ आजच्या स्वैपाकात करू असं म्हणता येतं. आज ह्या शहाणपणासाठी एक खास गोष्ट रात्री सांगू असं ठरवता येतं. इतकंच काय एखाद्या गोष्टीचा आनंद व्यक्त करण्यासाठी आपल्या मुलाला—मुलीला पाठीवर शाबासकी देणं, जवळ घेणं, पापा घेणं हेही पुरेसं असतं. किती पैसे खर्च केले हा प्रश्न नाही, प्रश्न ह्या मनावरच्या चांगल्या संस्काराचा आहे.

हे केलं नाही तर आपल्या सराईत पोहणाऱ्या बदकांचे पाय फाटून जातील, धावणाऱ्या सशाच्या नाकातोंडात पाणी जाऊन तो गुदमरेल आणि उडणारी चिमणी आजारी पडेल. त्यांना जे जन्मतःच छान जमतंय् त्याला दाद दिली पाहिजे.

रंगभूमी

# नगरची पथनाट्यस्पर्धा दीर्घस्मरणी नाट्यानुभव

वि. भा. देशपांडे

अलिकडच्या काळात एकांकिका किंवा अनेकांकी नाटकांच्या स्पर्धा घेण्याचे प्रमाण खूपच वाढते आहे. त्यामुळे त्यातले नाविन्य किंवा औचित्य कमी झालेले दिसते; पण गेल्या आठवड्यात अहमदनगर येथे अगदी वेगळ्या पद्धतीची नाट्यस्पर्धा घेतली गेली. ती होती पथनाट्यस्पर्धा. किरकोळ एक—दोन अपवाद वगळता इतका योजनाबद्ध पथनाट्यस्पर्धा क्वचितच पाहण्यात आली म्हणून तिचे महत्त्व !

अहमदनगरच्या नाट्यसमर्पित या संस्थेने ही स्पर्धा आयोजित केली होती. एकूण अकरा संघांनी यात भाग घेतला. पथनाट्य असल्याने स्पर्धेचे स्वरूप सर्वस्वी भिन्न होते. प्रत्येक संघाला त्याच्या प्रयोगाची वेळ आणि जागा निश्चित करून दिलेली होती. दुपारी तीन वाजता स्पर्धा सुरू झाली. नगर शहरातले अकरा चौक निवडले होते, ज्या ठिकाणी प्रयोग करायला जागा उपलब्ध होऊ शकली त्या ठिकाणी ठरलेल्या वेळी संघ तयार असायचा. आम्ही परीक्षक (मी आणि जब्बार पटेल) त्या चौकात उपस्थित व्हायचो. त्या संघाने आपला प्रयोग सुरू केला की, दोन—पाच मिनिटात शे—दीडशे प्रेक्षक तातडीने जमायचे. ज्यांना आधी माहीत असायचे ते प्रयोगापूर्वीच तिथे जाऊन जागा पकडायचे. त्यामुळे कोणत्याही प्रयोगाला गर्दी नाही असे व्हायचेच नाही. उलट जसजसा स्पर्धेला वेग आला तसतशी प्रेक्षकांची गर्दी वाढती राहिली. यातले काही प्रेक्षक तर आमच्याबरोबर प्रत्येक प्रयोगाला उपस्थित राहिलेले दिसले. दुपारी तीन वाजता आरंभित झालेली ही स्पर्धा रात्री आठ वाजता संपली. त्यानंतर पारितोषिक समारंभ आणि चित्रपट, रंगभूमी, पथनाट्य आदी विषयांवर जाहीर भाषणे झाली.

ही सारी स्पर्धा आणि तिथले वातावरण हा एक नाट्यनुभव होता. दीर्घस्मरणी असा सुखद अनुभव होता. मुळात पथनाट्य हाच एक अनुभव होऊ शकतो. कोणत्याही प्रकारच्या साधनांचा वापर न करता रंगमंच सोडून जेव्हा एखादा नाट्यनुभव द्यायचा असतो तेव्हा अनेक आव्हाने आणि आवाहने असतात. ती पेलण्याची क्षमता त्या त्या कलाकारांमध्ये असावी लागते. यातले मुख्य आव्हान असते ते लोकांशी संवाद साधण्याचे. कोणत्याही प्रकारची पूर्वकल्पना प्रेक्षकांना न देता (तर काही वेळा ती पूर्वकल्पना असलेला) कलाकारांना प्रयोग पेश करायचा असतो. अशा अवचित आलेल्या किंवा जमलेल्या प्रेक्षकाला वीस—पंचवीस मिनिटे गुंतवून ठेवेल असा विषय निवडावा लागतो. त्या विषयाचे नाट्यरूप फार सूक्ष्मतेकडे न झुकता स्थूल—ढोबळ पद्धतीने व्यक्त करावे लागते. कारण तिथे सर्व थरातला प्रेक्षक उभा असतो. तो प्रेक्षक कलाकारांना वर्तुळाकार घेरून उभा राहात असल्याने कलाकारांचा शब्द किंवा एकूणच अभिनय सर्व दिशांच्या प्रेक्षकांना अनुभवता यायला हवा. त्यासाठी शब्दांबरोबरच संगीताचा वापरही महत्त्वाचा आहे. शक्य असेल तिथे विनोदनिर्मिती अपेक्षित असते. याचे विषयही समाजाला सहज आकळतील, भावतील असेच असावे लागतात. त्यांच्या नित्य जीवनाशी संबंधित असावे लागतात. थोडक्या वेळात ते स्पष्ट व्हावे लागतात आणि हे सारे रस्त्यावर चाललेल्या रहदारीतले आवाज गृहीत धरून करावे लागते.

ह्या साऱ्या गोष्टींचे भान या पथनाट्य स्पर्धेतील अनेकांना होते. दोन—तीन संघांना या माध्यमाचा अंदाज आला नाही; पण त्यांचा सहभाग महत्त्वाचा होता. पथनाट्य हे जसे रंजनासाठी आहे तसेच ते जनमनाला काही बोध, उपदेश, संदेश देण्यासाठीही आहे. किंबहुना ज्यांना आपल्या मनातील कोणताही विचार, भावना सामान्य प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायच्या आहेत, ज्यांची रंगभूमीकडे येण्याची शक्यता नाही अशांना ते जिथे रस्त्यावर आहेत अशा ठिकाणी जाऊन काही सांगण्याचे एक माध्यम म्हणजे हे पथनाट्य आहे. राजकीय विचारप्रणालींचा प्रसार, प्रचार करण्यासाठी ह्या पथनाट्यांचा वापर मोठ्या प्रमा-

णात होतो. विशेषत: कर्नाटक, केरळ, बंगाल ह्या ठिकाणी पथनाट्य पेश करण्याचे प्रमाण मोठे आहे. त्यातल्या काही ठिकाणी मी समक्ष तो अनुभव घेतला आहे. तुलनेने महाराष्ट्रात पथनाट्याचा वापर कमी प्रमाणात होतो.

म्हणूनच नगरसारख्या ठिकाणी झालेली ही पथनाट्यस्पर्धा अतिशय मोलाची आहे. ती केवळ वार्षिक कार्यक्रमाचा एक भाग म्हणून केलेली नाही तर ती एक नाट्यचळवळीचा भाग आहे. विशेषत: सध्याच्या ज्या काळात प्रायोगिक रंगभूमी मंदावलेली आहे, अशा वेळी या चळवळीला विशेष महत्त्व आहे. गेली तीन वर्षे ही स्पर्धा आयोजित केली जात आहे. स्पर्धेला वाढता प्रतिसाद मिळत आहे. नगर, सांगली, पुणे ह्या तीन गावांचे संघ स्पर्धेत होते. ही गावांची, संघांची संख्या आणखी वाढायला हवी. तसेच ही स्पर्धा केवळ नगरमध्ये न राहता त्यापासून प्रेरणा घेऊन अनेक छोट्या छोट्या गावी व्हायला हवी.

नगरची नाट्य समर्पित संस्था पथनाट्य स्पर्धेनिमित्ताने नाट्यविषयक महत्त्वपूर्ण कार्य करून अनेकांना सुखद नाट्यानुभव देते आहे. तो अनुभव नाट्यक्षेत्रातील अनेकांनी घेण्याजोगा आहे. रंगभूमीतल्या अनेक प्रश्नांची उत्तरे तिथे मिळतील, तसेच अनेक नवे प्रश्न निर्माणही होतील. अशा, वेगळ्या नाट्य-स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल डॉ. रवींद्र चव्हाण, श्री. मु. रा. घैसास, प्रा. हर्दवाणी आदींना मनःपूर्वक धन्यवाद !

ॅ ❑

## वृत्तविशेष

महाराष्ट्रीय कलोपासक या जुन्या नाट्य-संस्थेचे एक आधारस्तंभ श्री. भगवानराव पंडित यांचे १ फेब्रुवारीला दीर्घ आजाराने निधन झाले. गेली काही वर्षे ते आजाराने व्यग्र होते. त्या अर्थाने त्यांनी नाट्यसंन्यास घेतला होता. त्यामुळे अलिकडच्या कलाकार पिढीला त्यांच्याविषयी माहिती असण्याची शक्यता खूपच कमी. भगवानराव हे स्वतः उत्तम नट होते. नटाला अपेक्षित असणारे देखणे व्यक्तिमत्त्व त्यांना लाभले होते; पण त्यांनी आपले आयुष्य केवळ नट म्हणून प्राधान्याने व्यतीत केले नाही तर रंगभूमी संबंधात अनेक महत्त्वाच्या गोष्टींना साह्य केले. महाराष्ट्रीय कलोपासकसारख्या हौशी नाट्यसंस्थेला स्थिरता देण्याचे, उत्तम नाट्य-निर्मितीला प्रोत्साहन देण्याचे, अनेक उत्तम कलाकारांना एकत्रित आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. रंगभूमी संदर्भातल्या अनेक गोष्टींच्या नोंदी केलेल्या डायऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांचा उपयोग रंगभूमी इतिहास लिहिणाऱ्या व्यक्तींना निश्चितच होणार आहे. रंगभूमीतले एक संघटक म्हणून त्यांचा लौकिक होता. पुणे आकाशवाणीवर त्यांनी बराच काळ नोकरी केली होती. तिथूनच ते निवृत्त झाले. अप्पा बळवंत चौकात मोतीवाले पंडित म्हणून जे प्रसिद्ध होते त्यांचे हे भाऊ. गर्भ श्रीमंत असलेला हा माणूस अतिशय अबोलपणाने रंगभूमीसाठी खूप काही करून गेलेला आहे. ते कार्य प्रसिद्धीच्या झोतात नव्हते. आता तरी त्यांच्या कार्याला प्रसिद्धी लाभावी हीच त्यांना श्रद्धांजली.

❑

पुण्याच्या ॲक्टिव्ह थिएटर्स या संस्थेने 'अशी पाखरे येती' या निम-व्यावसायिक प्रयोगानंतर आता एक नवे नाटक हाती घेऊन 'अंतरंग' या नाटकाचा मुहूर्त जब्बार पटेल यांच्या हस्ते नुकताच केला. नाटकाचे लेखक आहेत विवेक लागू. दिग्दर्शक आहेत अमोल पालेकर. यामधले कलाकार आहेत रिमा-विवेक लागू, स्वाती-अविनाश देशमुख स्वरूपा खोपकर आणि दिलीप कुलकर्णी.

❑


# राजहंसचे नवे प्रकाशन

# कुंपण आणि आकाश

मंगला गोडबोले

वीस रुपये

बाईच सुख ? तिला दुःख आहेच कुठे ?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे
खरं तर या दोन टोकांमध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न !

# सागर कुणाच्या मालकीचे ?

● डॉ. सुभाषचंद्र सारंग ●


अध्यक्ष रेगन यांच्या एका घोषणेनुसार अमेरिकी किनाऱ्यापासून २०० सागरी मैलांच्या हद्दीत खनिजे आणि मच्छिमारी बाबतचे सर्व हक्क अमेरिकेकडे राहतील हे स्पष्ट झाले आहे. पॅसिफिक व कॅरेबियन सागरातील अमेरिकी नियंत्रणाखाली असलेल्या बेटांचाही त्यामध्ये समावेश आहे. रेगन यांच्या या दाव्यामुळे अमेरिकेला सुमारे ४० लक्ष सागरी मैलामध्ये उत्खननाचे आणि मच्छिमारीचे सर्वाधिकार मिळाले आहेत. सागरीप्रवाह आणि वारे यापासून ऊर्जा निर्माण करण्याच्या अधिकाराचासुद्धा त्यात समावेश आहे. अशा प्रकारच्या सागरी भागाला आर्थिक सागरीपट्टा किंवा एक्स्क्लूझिव्ह इकॉनॉमिक झोन ( EEZ ) असे म्हणतात. अमेरिकेचा हा आर्थिक सागरीपट्टा त्या देशाच्या क्षेत्रफळाच्या दीडपटीपेक्षा जास्त आहे. . . .

## सागरी मालकीच्या कराराची गरज

'man marks the earth with ruin, his control stops with the shore', ही बायरनची उक्ती केव्हाच निरर्थक ठरली आहे. मानवाला दिवसेंदिवस त्याच्या अनेकविध गरजांसाठी सागरावर अवलंबून रहावे लागत आहे. वाहतूक, व्यापार, मासेमारी, खनिजसंपत्ती या दृष्टीने सागरांचे महत्त्व निर्विवाद आहे. भूभागापेक्षा सागरामध्ये जीवसृष्टी अधिक समृद्ध असून मानवाची भविष्यकालीन अन्नाची गरज भागविण्यासाठी केवळ शेतजमीन पुरी पडणार नाही, तर त्यासाठी सागरीजीवांचा वापर करणे भाग पडणार आहे. जपानने सागरामध्ये मत्स्यशेतीला सुरुवात केली आहे. गेल्या २० वर्षांमध्ये जपानने माशांच्या किमान ५० विविध जातींचे संगोपन सागरतळावर कृत्रिमरीत्या केले आहे. जपानच्या एकूण मासेमारीपैकी २ टक्के मासे या प्रकारच्या मत्स्यशेतीमधून मिळतात. उत्तरोत्तर हे प्रमाण वाढत जाणार आहे. औद्योगिक व नागरी सांडपाणी, केरकचरा व इतर टाकाऊ वस्तू प्रचंड प्रमाणावर फेकण्यासाठी सागरांचा वापर केला जातो. अन्यथा अधिक उंचाई असलेल्या भूभागावर या कचऱ्याचे ढीग वाढून मानवी वास्तव्याला जागाच उरणार नाही. हवामानावर सागरांचा प्रभाव असतोच, शिवाय पृथ्वीच्या पर्यावरणाच्या संतुलनावर सागरांचे नियंत्रण असते. भरती-ओहोटी, सागरी लाटा व सागरीप्रवाह यांचा ऊर्जा निर्मितीसाठी उपयोग करता येतो. सागरतळावरील धातूंच्या गोट्यांचे मोल लक्षात आल्यापासून प्रत्येक राष्ट्राला जास्तीतजास्त सागरीभागावर आपला अधिकार प्रस्थापित करण्याची घाई झाली नाही तरच नवल; पण त्यामध्ये विकसित राष्ट्रांचेच प्रमाण जास्त असणार हे उघड आहे. तिसऱ्या जगातील अनेक राष्ट्रांना सागराचे रत्नाकर–रूप जाणवलेले नाही, ज्यांना जाणवले आहे त्यांचे हात तेथवर पोहोचत नाहीत. अशा परिस्थितीमध्ये बड्या शक्तींनी सागर आपापसात वाटून घेतले तर भविष्यकाळात तिसऱ्या जगाची केविलवाणी अवस्था होईल.

## UNCLOS III

सागरांच्या मालकीचा नवा आंतरराष्ट्रीय करार करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांची परिषद



एप्रिल ते डिसेंबर १९८२ या काळात पार पडली. या परिषदेमध्ये प्रामुख्याने विकसनशील राष्ट्रांचे हितसंबंध जपण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले. जिनिव्हा, न्यूयॉर्क व किंगस्टन येथे टप्प्याटप्प्याने पार पाडलेल्या या परिषदेमध्ये (थर्ड युनायटेड नेशन्स कॉन्फरन्स ऑन द लॉ ऑफ द सी UNCLOS III) सागरी मालकी व सागरतळावरील खनिजांचे उत्खनन याबाबतचा नवा करार करण्यात आला. १३० सदस्य राष्ट्रांनी या करारावर सह्या केल्या. या राष्ट्रामध्ये आशिया व आफ्रिका खंडातील सर्व विकसनशील राष्ट्रांप्रमाणेच जपान, फ्रान्स, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, चीन व स्वित्झरलँड इ. देशांचा समावेश होता. २१ राष्ट्रांनी या करारावर सह्या केल्या नाहीत. त्यापैकी संयुक्त संस्थाने, तुर्कस्थान, इस्रायल व व्हेनेझुएला या चार राष्ट्रांनी विरोध केला तर ब्रिटन व प. जर्मनीसह सात युरोपीय देश व सोविएट युनियनसह नऊ साम्यवादी देशांनी तटस्थपणाची भूमिका स्वीकारली. आणखी सुमारे साठ सदस्य राष्ट्रांची कराराला मान्यता मिळाल्यानंतर करार सर्वमान्य होऊन प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होऊ शकली असती. तथापि या कराराच्या बाबतीत अमेरिकेची नकारात्मक भूमिका चिंताजनक आहेच; पण तितकीच साम्यवादी राष्ट्रांची तटस्थ भूमिकासुद्धा.

दरम्यानच्या काळात रेगन प्रशासनाने आपण या करारावर सह्या करणार नसल्याचे जाहीर करून २० राष्ट्रांच्या वतीने सागरी मालकीबद्दलच एक स्वतंत्र करार मांडला. या करारावर सह्या करणाऱ्या देशामध्ये अमेरिका, ब्रिटन, प. जर्मनी हे देश अग्रेसर होते. त्याबरोबरच अमेरिकेने आपल्या आर्थिक सागरीपट्ट्याची घोषणा केली. जपानने अमेरिकेच्या या स्वतंत्र कराराबद्दल नापसंती व्यक्त केली. अमेरिकेच्या सवत्यासुभ्यामुळे इंटरनॅशनल सी-बेड ॲथॉरिटीच्या अधिकारक्षेत्राला मर्यादा पडल्याच; पण सागरसंपत्तीच्या वापराच्या बाबतीत परस्पर विरोधी असे दोन स्वतंत्र करार निर्माण होऊन दोन्ही करारांची अंमलबजावणी करावयाची झाल्यास मोठीच अडचणीची परिस्थिती निर्माण झाली.

## नव्या कराराची वैशिष्ट्ये

युनोच्या सागरी मालकीविषयक करारामध्ये एकूण ३२० कलमे व ९ परिशिष्टे आहेत. या करारानुसार सागरांच्या वापराबद्दल नियंत्रण, वाहतूक, सामुद्रधुनीतून जाणारे मार्ग, सागरी जैविक व अजैविक संपत्ती-साधनांचा वापर, मासेमारी, उत्खनन, तेलखाणी, धातूंचे गोटे, ऊर्जा निर्मिती या सर्व बाबतीत निश्चित धोरण ठरविण्यात आले आहे. UNCLOS III नुसार निश्चित करण्यात आलेली सागरी संपत्तीच्या वापराबद्दलची काही महत्त्वाची तत्त्वे पुढीलप्रमाणे. देशाच्या किनाऱ्यापासून १२ सागरी मैलापर्यंतच्या सागरी विभागावर त्या देशाचे सार्वभौमत्व राहील. (एक सागरी मैल म्हणजे ६०८०! सागरी मैल जमिनीवरील मैलाच्या सुमारे १.११ पट असतो.) किनाऱ्यापासून २०० सागरी मैलापर्यंत त्या देशाचा आर्थिक सागरी पट्टा EEZ असेल. या सागरी विभागातील जैविक व अजैविक सामुग्रीवर त्या देशाचाच हक्क राहील. किनाऱ्यापासून २०० सागरी मैलापलीकडे मात्र खुला सागर विभाग राहील. या विभागालाच समाईक वारसा क्षेत्र - Common Heritage of Mankind असे संबोधले जाते. या विभागामध्ये मासेमारी, पाईपलाइन्स व केबल्स टाकणे, खनिजे मिळविणे व संशोधनाचे अधिकार सर्वांना खुले राहतील. भविष्यकाळात मानवाला या समाईक वारसाक्षेत्रावर अधिकाधिक अवलंबून रहावे लागणार असल्याने समाईक वारसाक्षेत्राची जपणूक करणे ही काळाची गरज आहे. अमेरिकेच्या स्वतंत्र करारामुळे समाईक वारसाक्षेत्राचा संकोच होणार आहे. देशाची समुद्रबुड जमिनीवरील मालकी २०० सागरी मैला पलीकडेसुद्धा असू शकते. नव्या करारामध्ये २,५०० मीटर्स खोल पाण्यापलीकडे १०० मैलापर्यंत किंवा खंडाच्या सागरातील अखेरच्या सीमेपर्यंत ही मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. अशा प्रकारे किनाऱ्यापासून २०० सागरी मैलापलीकडे अथवा समुद्रबुड जमिनीपलीकडे खुल्या सागरामध्ये संशोधन व धातुंच्या गोटयांच्या संकलनाबद्दल नव्या करारामध्ये निश्चित नियम करण्यात आले आहेत. विशेषतः एखाद्या राष्ट्राने अशी क्षेत्रे विकसित केली तर त्यातील ५० टक्के क्षेत्रे युनो व विकसनशील राष्ट्रांसाठी राखून ठेवावीत, असे ठरविण्यात आले. सागरतळावरील खनिजांचे संकलन केल्यामुळे त्या देशांचे भूक्षेत्रावर उत्खनन करणाऱ्या राष्ट्रावर दुष्परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेण्याची उपाययोजना नव्या करारात आहे. सागरी खाणक्षेत्रांचा वापर करण्यासाठी स्वतंत्र आंतरराष्ट्रीय महामंडळ, सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधीमंडळ व या संदर्भातील तंटयांचा निर्णय देण्यासाठी स्वतंत्र लवादाची निर्मिती याबद्दलचे स्पष्ट उल्लेख करारामध्ये आहेत. त्याचबरोबर १५ वर्षांनंतर सागरी उत्खननाच्या बाबतीत मूल्यांकन व पुनर्विचार करण्याची तरतूदसुद्धा करारामध्ये आहे. आर्थिक सागरी पट्ट्यामध्ये मासेमारीला परवानगी, समुद्रबुड जमिनीच्या मालकीचा निश्चिती ही नव्या कराराची वैशिष्ट्ये आहेत. शिवाय खोल सागरातील उत्खननाच्या संदर्भात तपशीलवार विचार या करारामध्ये करण्यात आला आहे. विकसित व विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांच्या हितसंबंधांचे सारखेच रक्षण करणारा व भू वेष्टित देशांनासुद्धा दिलासा देणारा हा नवा करार १५ वर्षानंतरच्या पुनर्विचाराची व मूल्यांकनाची तरतूद करतो ही स्वागतार्ह घटना आहे.

दोन राष्ट्रामधील सागरी सीमांची निश्चिती, समोरासमोर किनारे असलेल्या देशामध्ये सागरांची वाटणी, सागरी पर्यावरणाचे संधारण, सागरसशोधन तंत्रज्ञानाचे हस्तांतर अशा इतर महत्त्वाच्या बाबींचा उहापोह नव्या करारात आढळतो. भू वेष्टित राष्ट्रे, भौगोलिक प्रतिकुलता असलेली राष्ट्रे, द्वीपसमूह इ चे हितसंबंध सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने नव्या कराराने प्रगती केली आहे तर सागरी मालकीबद्दलच्या तंटयांच्या सोडवणुकीसाठी निश्चित नियम केले आहेत. अंटार्क्टिका व त्या लगतच्या सागरीक्षेत्राचा विचार मात्र नव्या करारात करण्यात आलेला नाही.

## भारताला झुकते माप

नव्या करारामध्ये भारताला मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळाला आहे. भारताला ५,७०० कि. मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे तर लहानमोठी १२८० बेटे भारताच्या मालकीची आहेत. आर्थिक सागरी

पट्ट्यामुळे भारताला सुमारे २० लक्ष चौ. कि. मी. सागरी क्षेत्रावर, सागरी संपत्तीच्या वापराचा अधिकार मिळाला आहे. हे क्षेत्र भारताच्या एकूण क्षेत्रफळापेक्षा थोडेसे जास्तच आहे. भारताच्या पूर्व किनाऱ्यापासून ३५० सागरी मैल व अंदमान–निकोबार बेटांच्या किनाऱ्यापासून ३५० सागरी मैल क्षेत्रावर भारताला हक्क देऊन, अशा प्रकारे बंगालच्या उपसागरामध्ये सामान्य नियमाला अपवाद करण्यात आला आहे सामान्यपणे २०० सागरी मैलापलीकडे समुद्रबुड जमिन-क्षेत्रात एखादा देश खनिजांचा शोध लावतो, तेव्हा त्या देशाने तेथील खनिज उत्पादनाच्या ७ टक्के भाग इंटर नॅशनल सी–बेड अॅथॉरिटीला देणे बंधनकारक आहे. मात्र विकसनशील देश व ज्यांना त्या खनिजांची आयात करावी लागते. अशा देशाचा अपवाद करण्यात आल्याने भारताला ही सवलत मिळेल.

## पूर्वेतिहास

भारताला अरबी समुद्रात व प्रामुख्याने बंगालच्या उपसागरात सागरी मालकीबाबत झुकते माप मिळाले असले तरीही नव्या करारात समाईक वारसाक्षेत्रामध्ये धातूंचे गोटे गोळा करणाऱ्या 'पायोनीयर इन्व्हेस्टर' देशांच्या यादीत भारताचा समावेश करण्यात आला हे भारताच्या दृष्टीने योग्य झाले नाही. प्रत्येक पायोनीयर इन्व्हेस्टर देशाने समाईक सागरी क्षेत्रात प्रत्येकी दोन उत्खनन क्षेत्रे विकसित करून त्यामधील एक विकसनशील देशांसाठी राखून ठेवावे असे बंधन आहे. गेल्या दशकामध्ये संयुक्त संस्थाने, सोविएत युनियन, फ्रान्स, जपान, ब्रिटन, प. जर्मनी, कॅनडा, नेदरलॅंडस्, बेल्जियम व इटाली हे देश खोल सागर तलावावरील धातूंचे गोटे गोळा करण्यासाठी योग्य क्षेत्रे शोधण्यात अग्रेसर आहेत. त्यांच्या तुलनेने भारत प्रायोगिक अवस्थेतच आहे असे म्हणावे लागेल. पायोनीयर इन्व्हेस्टर्स देशांच्या यादीत भारताचे नाव असणे अभिमानाचे असले तरीही त्यामुळे त्या बाबतीत विकसनशील देशांना मिळणाऱ्या सवलतींना भारत मुकणार आहे. त्याचबरोबर भारताला या क्षेत्रात विकासाची निश्चितच संधी आहे. भारताने एखादे जरी उत्खनन क्षेत्र विकसित केले तरी देशाची निकेल, तांबे व कोबाल्ट या धातूंची येत्या २५ वर्षांची गरज भागेल.

सागरी मालकीबद्दलचे जुने करार आता कालबाह्य ठरले आहेत. नवा करार ही विकसित व विकसनशील राष्ट्रांची निकडीची गरज आहे. नव्या कराराचा विचार करताना सागरी सीमा निश्चितीबद्दलचा थोडासा पूर्वेतिहास जाणून घेणे आवश्यक आहे. सागरी मालकी निश्चित करताना एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यावी लागते ती म्हणजे या बाबतीत जगातील सर्व राष्ट्रे भौगोलिक दृष्ट्या समान दर्जाची नाहीत. सुमारे २२ देशांना केवळ भू–सीमाच लाभल्या आहेत. या भू वेष्टित देशामध्ये नेपाळ, स्विस्झर्लंड, अफगाणीस्तान तसेच आफ्रिका, द. अमेरिका व पूर्व युरोपमधील काही देशांचा समावेश होतो. या उलट जपान, मॅलागसी, श्रीलंका फिलिपाईन्स, न्यूझीलंड, तैवान, आइसलॅंड व क्यूबा इ. देशांना फक्त सागरी सीमा लाभल्या आहेत. इराक व जॉर्डन या देशाना नाममात्र समुद्रकिनारे आहेत. इतर सर्व देशांना भू–सीमेप्रमाणेच सागरी किनारेसुद्धा लाभले आहेत. अशा सर्व राष्ट्रांना समाधानकारक असा करार निश्चित करणे ही एका परीने तारेवरची कसरत आहे. कारण आता सर्वच देश या बाबतीत जागरूक होत आहेत; पण १६ व्या शतकामध्ये स्पेन व पोर्तुगाल या देशांनी पृथ्वीवरील बहुतेक सर्व महासागरावर आपले सार्वभौमत्व असल्याचा दावा केला होता. जॉन सेल्डनने ब्रिटन भोवतालचे सर्व सागरी क्षेत्र फक्त ब्रिटनच्या मालकीचे असल्याचा निर्वाळा दिला होता. ह्यूगो ग्रोशियस या डच कायदे पंडीताने मात्र खुला समुद्र कुणा एका देशाच्या मालकीचा असूच शकत नाही अशा प्रकारचे प्रतिपादन केले होते. सागरीकिनारा लाभलेल्या देशांच्या संरक्षणाच्या दृष्टीने किनाऱ्या लगतचा समुद्र त्या देशाच्या मालकीचा असावा हे सर्वानाच मान्य होते; पण किती समुद्रावर सार्वभौम मालकी असावी याबद्दल एकमत नव्हते. पुढे किनाऱ्यावरून बंदुकीने गोळी झाडल्यास ती जितक्या दूर समुद्रात पडेल तेवढ्या रुंदीच्या समुद्रावर त्या देशाची सार्वभौम सत्ता असावी हा विचार सर्वमान्य झाला. पुढे बंदुकीची जागा तोफानी घेतली; पण किती ताकतीच्या तोफा, किनाऱ्यावरील कोणत्या ठिकाणावरून तोफ डागून ती निश्चिती करावी याबद्दल स्पष्टपणा नव्हता. आजच्या क्षेपणास्त्रांच्या युगात हा 'कॅनॉट शॉट रूल' हास्यास्पद वाटत असला तरीही शत्रूच्या जहाजावर किनाऱ्यावरून मारा करता यावा अथवा शत्रूला सागरातून किनाऱ्यावर गोळीबार करता येऊ नये एवढाच त्या नियमाचा मर्यादित उद्देश होता. सर्वच देशांनी तीन मैल सागरी क्षेत्रावरील सार्वभौमत्व मान्य केले. राष्ट्राराष्ट्रांनी तडजोडीने आपआपसात सागरी हद्दी ठरवून घेतल्या. कॅनडा व सं. संस्थाने, ब्रिटन व नार्वे इ. देशातील सागरी हद्दींचे प्रश्न तडजोडीने मिटले पण जपान व सोविएत युनियन, ऑस्ट्रेलिया, कोरिया तसेच ब्रिटन व आईसलॅंड या देशामध्ये मात्र सागरी मालकीवरून संघर्षाची स्थिती निर्माण झाली जपान व ब्रिटनने गनबोटींचे संरक्षण घेऊन आपल्या सागरी क्षेत्राबाहेर मासेमारीला सुरुवात केली. इ. स. १९५२ पर्यंत वेगवेगळ्या देशानी ४ मैलापासून ३० मैलापर्यंतच्या सागरी क्षेत्रावर सार्वभौमत्वाचा दावा केला.

समुद्रबुड जमिनीची मालकी हा सुद्धा एक गुंतागुंतीचा विषय होता. काही खंडांच्या किनाऱ्यावर समुद्रबुड जमीन ५ कि. मी. पेक्षा अरुंद आहे तर काही ठिकाणी ती ६०० कि. मी. पेक्षाही रुंद आहे. द. अमेरिकेतील देश त्या काळात २०० मैल समुद्रबुड जमिनीवर हक्क सांगत होते; पण प्रत्यक्षात त्यांची समुद्रबूड जमीन ४० मैलापेक्षा अरुंद होती. १९५८ मध्ये सार्वभौम मालकीचे सागरी क्षेत्र, खुला समुद्र, मासेमारी व समुद्रबुड जमिनीच्या मालकीबद्दल आंतरराष्ट्रीय करार करण्यात आला; परंतु त्यामध्ये सागरी संपत्ती विशेषत: उत्खननाचा विचार करण्यात आला नव्हता. १९६७ मध्ये माल्टा या भूमध्य समुद्रातील छोट्या राष्ट्राने सागरसंपत्तीच्या वापराबद्दल युनोने निश्चित धोरण ठरवावे अशी मागणी केली. त्यानुसार १९६८ ते ७० या काळात युनोची 'सी–बेड कमिटी' स्थापन होऊन सागरांच्या मालकीच्या नव्या कराराचे सूतोवाच झाले. सर्व सदस्य राष्ट्रांच्या सूचनांचा विचार करून दीर्घकाळ चर्चा केल्यानंतरच नव्या कराराचा मसुदा तयार करण्यात आला आहे. बदलत्या परिस्थितीनुसार सागरांच्या मालकीबद्दल निश्चित स्वरूपाच्या आंतरराष्ट्रीय कराराची गरज होती. UNCLOS III ने ती पूर्ण होणे शक्य असताना मूठभर प्रगत व स्वार्थी राष्ट्रांचे धोरण कराराच्या आड येत आहे ही सर्व मानव जमातीच्या भवितव्याच्या दृष्टीने मोठी आशादायक घटना आहे असे म्हणता येणार नाही. ☐

# । नवे राजहंस प्रकाशन । पूर्णत्वाचे प्रवासी ।

**लेखक : प्रा. शरद कुलकर्णी**

## निवडक अभिप्राय

**डॉ.** कुलकर्णी यांच्या पुस्तकाचे नाव आहे ' पूर्णत्वाचे प्रवासी '. माणूस जन्मत: अपूर्ण आहे; पण त्याची धाव सतत पूर्णत्वाकडे आहे. तसे नसते तर ढोलीत राहणारा केसाळ, नंगा मानवच आजही दिसला असता. आम्ही जीवनाच्या गरजांकडे संशोधक दृष्टीने पहातो आणि पुढे पुढे सरकत चंद्रापर्यंत भराऱ्या मारू लागलो आहोत. ही झाली भौतिक भरारी; पण आमची अध्यात्मिक भरारीसुद्धा चालू आहे. आम्ही कोण आहोत ? कोठून आलो ? कोठे जाणार ? जगाचा निर्माता कोण ? त्याचे उद्देश काय ? आणि शेवटी आम्हीही या जगाच्या निर्मात्याचेच अंश आहोत. हे ओळखण्याचे मार्ग कोणते ? साक्षात्कार कसा होईल ? म्हणजे आम्ही ' नराचे नारायण, नारीची नारायणी ' कसे होऊ ? या दृष्टीनेही मानवाचे प्रयत्न चालूच आहेत. मानवाचा पूर्णत्वाकडे जाण्याचा प्रवास अखंड चालू आहे. या प्रवासात मार्गदर्शक दीप–स्तंभ म्हणून या पुस्तकाचा चांगला उपयोग होणार आहे.

### श्रीमती अनुताई वाघ

संचालिका, ग्राम बाल शिक्षा केंद्र, कोसबाड.

आणि आजच्या युवक-युवतींनो, डॉ. शरद कुलकर्णी यांनी शाम आणि आनंद यांच्या बालमूर्तींना पुढे ठेवून ही पत्रे लिहिली आहेत. हे दोघे मोठे व्हायला अवकाश आहे; पण त्यांच्या ज्या वयासाठी हे पुस्तक लिहिले आहे त्या वयाचे आजचे युवक-युवती यांनी हे पुस्तक आताच वाचावे. आतील विचारांचे मनन करावे व शक्य तितके आचरणात आणावे. अनेकांना वाचून दाखवावे व या दिशेने स्वत: पण काही लिहीत रहावे. आज या गोष्टींची फार जरूरी आहे. यासाठी आमच्या माध्यमिक शाळा, महाविद्यालये, अध्यापक विद्यालये व गावातील वाचनालये यांनी हे पुस्तक आपल्या संग्रही अवश्य ठेवावे; पण ते नुसते कपाटात राहून चालणार नाही. अनेकांच्याकडून ते वाचले गेले पाहिजे. मनात विचारांचे भक्कम भांडवल असल्यावर त्या दृष्टीनेच आचरण पण होते. डॉ. शरद कुलकर्णी यांनी आजच्या सांस्कृतिक विचारांमध्ये ' पूर्णत्वाचे प्रवासी ' या पुस्तकाची मोलाची भर घातली आहे.

**प्रा.** शरद कुलकर्णी हे स्वभावत:च तत्त्वचिंतक. त्यामुळे त्यांनी एम. ए. या पदवीसाठी तत्त्वज्ञान हा विषय निवडणं साहजिकच होतं. त्यातही प्राचार्य सोनोपंत दांडेकरांचे आवडते विद्यार्थी होण्याचं भाग्य त्यांना लाभलं. या सर्वांचा योग्य तोच परिणाम झाला. सोनोपंतांच्या सान्निध्यात जीवनविषयक दृष्टीची बैठक लाभली. त्यानंतर गेली अनेक वर्षे प्रा. कुलकर्णी यांनी जीवनव्यवहाराचा व भारतीय संस्कृतीचा जो सातत्याने सखोल अभ्यास केला त्याचा परिपाक म्हणजे त्यांचा ' पूर्णत्वाचे प्रवासी ' हा मौलिक ग्रंथ होय. या ग्रंथातून केवळ भारतीय संस्कृतीचा मूलभूत गाभा आणि त्यातील विचारधारा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे एवढा एकच उद्देश न ठेवता त्याच्या जोडीला आजच्या प्रगत अवस्थेतील मानसशास्त्र व समाजशास्त्र यांच्या अभ्यासकांनी पूर्ण मानवाची जी संकल्पना मांडली आहे तिचे भारतीय पूर्णपुरुषत्वाच्या विचारधारेशी असणारे साम्य स्पष्ट करून दाखविणे हाही उद्देश

### डॉ. ना. के. उपासनी

निवृत्त डायरेक्टर ऑफ एज्युकेशन, शिक्षणतज्ज्ञ, पुणे

साध्य करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यात ते यशस्वी झाले आहेत. तत्वज्ञानासारखा अवघड विषय हाताळण्यासाठी त्यांनी माध्यम घेतले आहे शाम आणि आनंद या त्यांच्या नातवंडांना उद्देशून लिहिलेल्या पत्रांचे. या लहानग्यांनासुद्धा आपण काय म्हणत आहोत ते कळावे म्हणून पत्रांची भाषा आवर्जून सोपी आणि ओघवती अशी वापरली आहे. त्याचप्रमाणे वरच्या पातळीवरील काही आदर्श संकल्पनांचा परिचय करून देताना उदाहरणे घेतली आहेत ती स्वत:च्या कुटुंबातील वडिलधाऱ्यांची, त्यागी वृत्तीने वावरणाऱ्या जवळच्या नातेवाईकांची आणि ज्यांच्या जीवनकार्याचा ठसा आपल्या मनावर उमटला अशा देवत्वाच्या पातळीवर पोहोचलेल्या समाजपुरुषांची.

..............

उद्योगप्रधान समाजात येऊ पाहाणाऱ्या वैफल्यवादाची लाट थोपविण्याची किती निकडीची गरज आहे हे ध्यानात घेऊन त्यावर

मात करण्यासाठी या पत्रांचा प्रा. कुलकर्णी यांनी जो समयोचित प्रपंच केला आहे त्याबद्दल त्यांचे आणि राजहंस प्रकाशनाने हा सुवर्णमोलाचा ग्रंथ छापण्याचे सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. भारतीयांच्या पूर्वदिव्याचा परिचय करून देत असतानाच यानंतरचा भविष्यकाळही उज्ज्वल रहावा या आंतरिक भावनेने केलेला हा प्रयत्न हमखास यशस्वी होईल यात शंका नाही. अर्थात हे घडण्यासाठी अनेक कुटुंबांतून या पत्रांचे वाचन मनन आणि चिंतन होणे आवश्यक आहे. तसा प्रतिसाद मिळेल याची खात्री वाटते.

## डॉ. आनंद यादव

प्राध्यापक, मराठी विभाग, पुणे विद्यापीठ
मराठीतले ख्यातनाम ललित लेखक व समीक्षक

संस्कृतीचे नुसते श्रद्धेने गोडवे गाणारे ग्रंथ आपल्याकडे काही कमी नाहीत; पण संस्कृतितीर्थांचे मर्म समजून घेऊन, त्यांचा विचार, तिन्ही काळ एकत्र जोडून करण्याचा एक अतिशय विशाल मनाचा प्रांत या लेखनातून मला विस्तीर्णपणे पसरलेला दिसला. म्हणून या लेखांचे महत्त्व मला आजच्या विकीर्ण झालेल्या, फाटून चिंध्या झालेल्या, आडवे-उभे तडे जाऊन तुकडे पडू लागलेल्या समाजाच्या संदर्भात विशेष वाटते. महाराष्ट्रीयांच्या व प्रत्येक भारतीयाच्या घरी यांची (या लेखांची) चिकित्सकबुद्धीने व भावनेने पारायणे व्हावीत अशी त्यांची योग्यता आहे.

लेखकाने या लेखांना पत्ररूप दिले किंवा या लेखांसाठी पत्ररूप स्वीकारले हे बरे झाले. नातवंडांना उद्देशून ही लेखने केल्यामुळे जणू ती 'आपल्याच' घरच्यांना उद्देशून केल्यासारखी आत्मीय झाली आहेत. सगळे लेख वाचल्यावर वाटते की, लेखकाची ही नातवंडे म्हणजे उद्याच्या सगळ्या मराठी पिढ्या व भारतीय पिढ्याच आहेत. एवढेच नव्हे तर उद्याच्या जागतिक पिढीलाच आपली मानून तिला उद्देशून भारतीय संस्कृती लेखक समजून सांगत आहे, तिची मर्मस्थळे दाखवून देऊन जणू त्यांचे आदर्श सर्वांना अनुसरण्यास सांगत आहे.

आजची व उद्याची लेखकाची ही नातवंडे कोणत्या एका देशाची, कोणत्या एका पक्षाची, कोणत्या एका संस्कृतीची म्हणून अभिप्रेत नाहीतच पुढे त्यांनी कोणताही देश, पक्ष वा संस्कृती यांचा स्वीकार केला तरी त्यांना 'पूर्णत्वाचेच प्रवासी' झाले पाहिजे, हेच लेखकाने 'आनंद-श्याम'ला उद्देशून जणू उद्याच्या पिढीला सांगितले आहे.

लेखकाची ही छोटी नातवंडे एकदम कोऱ्या पाटीसारखी, निष्पाप-निरागस असल्यामुळे व त्यांना उद्देशून लेखकाने तितक्याच जिव्हाळ्याने, ममत्वाने, प्रांजळपणे लिहिले असल्याने या लेखांना स्वदेश, स्वसंस्कृती, स्वधर्म, हिंदु तत्त्वज्ञान यांच्या श्रेष्ठत्वाचा, स्वाभिमानाचा उपरा वास येत नाही. हे 'पत्र-रूप' स्वीकारल्यामुळे सहजपणे होऊन गेले आहे. राम-कृष्णावरचे लेख तर अप्रतिम झालेले आहेत. मला ही भाष्ये वेगळ्या दृष्टीची आणि नवीन वाटली. मराठी साहित्यात ती अतिशय मोलाची भर घालणारी आहेत.

## वा. रा. सोनार

कवी व लेखक, अमळनेर

दोन पिढ्यांतील 'संघर्ष' हा नेहमीच सुजाणांच्या चिंतनाचा, चर्चेचा विषय होत आला आहे. या चर्चेतून पुष्कळदा अभिनिवेश डोके वर काढतो, प्रासंगिकता विषयांची व्याप्ती ग्रासून टाकते. दोषारोपांची खैरात होते. 'मया जितम्'चा क्षणिक आनंद उभय पक्षांना भुरळ घालतो आणि एका नव्या अनिर्णयाशी हा विषय पुन्हा 'पुनश्च हरि ओम्' स्वरूपात प्रकट होतो.

श्री. कुलकर्णी यांनी विषयाचे सखोल चिंतन केले ते या सांकेतिक संघर्षाची चर्वणा करण्यासाठी नव्हे तर एकूणच अस्तित्वाच्या मूलाधाराच्या दिशेने संयतपणे शोध घेण्याच्या भूमिकेतून आणि त्यामुळेच सांस्कृतिक परंपरेच्या वैभवी गुहेशी, त्यांना या प्रवासाच्या मार्गातला एक टप्पा म्हणून पहाण्याची आत्मीय ओढ लागली, जी अपरिहार्य होती. अशा भूमिकेच्या आव्हानातूनच त्यांना मूल्यांच्या पुनर्प्रतिष्ठापनेचा संदर्भ शोधून काढणे आवश्यक वाटले. 'पूर्णत्वाच्या प्रवासाचे' हे प्रस्थान म्हणूनच एका वेगळ्या दृष्टिकोनाच्या संपादनरूपात पहाताना आनंद तर होतोच; पण सांकेतिक चर्चातून अडकलेल्या या 'संघर्षा'ला वेगळे परिमाण लाभण्याची शक्यता दृढ होण्याची संधी या लेखनातून निर्माण होणार आहे. हे फार महत्त्वाचे आहे.

यासाठी त्यांनी निवडलेली श्रद्धेये भारतीय मनात खोलवर रुजलेली अशी असूनही या सर्व व्यक्ती पुन्हा वेगळ्या चैतन्याने सळसळत असणाऱ्या, आनंद देणाऱ्या झालेल्या आहेत.

सुदैवाने श्री. कुलकर्णी यांना एकाच वेळी तत्त्वज्ञानाची आणि व्यवस्थापन-शास्त्राची बैठक लाभली आहे. नातवांशीच हितगुज करण्याच्या पवित्र्यातून एक ममत्वाचे सहृदय अधिष्ठान मुळातच आहे.

'चिंता करतो विश्वाची' ही अंतर्यामीची भूमिका घेऊन कुलकर्णी दूर डोंगर-कपारीतून चिंतनासाठी न जाता भोवतालच्याच अंधार-दऱ्यातून स्वतःसह उद्याच्या सहप्रवाशांशी मुक्तपणे उघळून बोलत आहेत आणि असे करताना स्वतःच्याच मर्यादित अनुभव-विश्वाचे हवाले न देता या सर्व पिढ्यांच्या मनोभूमीत खोल रुजलेल्या महापुरुषांच्याच प्रवासाची तपासणी आपल्यासाठी घेताहेत. हे सारेच महत्त्वपूर्ण तर आहेच आहे; पण आपल्या व्यक्तित्वाच्या संपन्नतेत भर घालणारे आहे.

काळाच्या उदरात निवांत झालेल्या व्यक्तिरेखा आपल्या प्रतिभेने स्पर्शित करून पुन्हा नव्याने उभ्या करण्याचे कलावंताचे भान फार तर स्तिमित करते. त्या त्या व्यक्तिरेखा आणि 'मी' म्हणून अस्तित्व असलेली कुणीही सामान्य व्यक्ती यातील अंतर तसेच कायम तरी राहते, पुष्कळदा सोयिस्करपणे दुरावतेही. या लेखनाचा विशेष असा की, महापुरुषांच्या लोकोत्तर व्यक्तित्वाशी सुरू झालेला प्रवास काळाच्या अमर्याद व्याप्तीतूनही पुन्हा आजच्या जगातील त्या अखंड प्रवासाचा धागा जुळवणाऱ्या लोकोत्तर-व्यक्तित्वाशी

अगदी सहज येतो आणि या लेखनाच्या भूमिकेचे वैशिष्ट्यपूर्ण परिणाम अर्थपूर्ण करतो. जगण्याच्या प्रेरणांना चैतन्यमय करतो. कुतूहल जागे करतो. म्हणूनच येथे भेटणाऱ्या 'आई'चे रूप बघता बघता ताराबाई मोडकांचे होते ! बापाचे व्यक्तिमत्त्व ब्रह्मचारी सोनोपंत दांडेकरांत प्रतिबिंबित होते.

अशा या लेखनाला ग्रंथरूप लाभते आहे हे उत्तमच. हे प्रकाशन करताना लेखकाचा हेतू – 'उद्योगप्रधान समाजात माणूस Alienate होत चालला आहे. त्याला आपले जीवन अर्थशून्य वाटू लागले आहे. त्यातून तो निष्क्रिय वा drug addict बनतो. हे टाळण्यासाठी, घराघरातून संवाद व्हायला हवेत. या संवादांना निमित्त व्हावे म्हणून हा पत्रांचा संग्रह'–अवश्य सिद्धीस जाईल अशी खात्री आहे. – कारण अजूनही रखरखीत दिसणाऱ्या मातीखाली थोडी ओल शाबूत आहे.


# ॥ पूर्णत्वाचे प्रवासी ॥

प्रा. शरद कुलकर्णी

किंमत : रुपये पन्नास

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ

पुणे : ४११ ०३०

फोन : ४४ ३४ ५९

¤

जोशी वाडी, ४१, भवानीशंकर रोड,

चितळे पथ कॉर्नर, दादर,

मुंबई : ४०० ०२८

फोन : ४२२ ५४ ५५